# "आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती "

(कवी विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' कवितासंग्रहाच्या संदर्भात)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कला विद्याशाखेअंतर्गत

एम.फिल. (मराठी) या पदवीकरिता सादर करण्यात आलेला

## लघुशोध-प्रबंध


संशोधक विद्यार्थिनी

**गारोळे वर्षा शिवदिगंबर**

मराठी विभाग,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद.

मार्गदर्शक

**डॉ.दासू वैद्य**

प्राध्यापक, मराठी भाषा व वाङ्मय विभाग,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद.


२०१८

Scanned with CamScanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## मराठी भाषा व वाङ्मय विभाग

**डॉ. दासू वैद्य**
प्राध्यापक
मराठी भाषा व वाङ्मय विभाग

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१ ००४


दिनांक- ०४/०८/२०१८

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **गारोळे वर्षा शिवदिगंबर** यांनी **"आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती " (कवी विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' कवितासंग्रहाच्या संदर्भात)** हा लघुशोध प्रबंध एम.फिल.(मराठी) पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला आहे.

हा लघुशोध प्रबंध त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेला असून तो यापूर्वी कुठल्याच पदवीसाठी कोणत्याही विद्यापीठास सादर केलेला नाही. करिता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**ठिकाण:-** औरंगाबाद
**दिनांक:-** ०४/०८/२०१८

मार्गदर्शक
**डॉ.दासू वैद्य**
प्राध्यापक, मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.



Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक असे निवेदन करते की, "आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती" (कवी विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' कवितासंग्रहाच्या संदर्भात) हा लघुशोध प्रबंध मी स्वतंत्रपणे लिहिलेला असून तो यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी कोणत्याही विद्यापीठास सादर केलेला नाही.

मी हा शोधप्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे एम.फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करीत आहे.

संशोधिका

**ठिकाण:-** औरंगाबाद

**दिनांक:-** ०४/०८/२०१८

**गारोळे वर्षा शिवदिगंबर**



Scanned with CamScanner

# ऋणनिर्देश

**प्रस्तुत** प्रबंधिका सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत प्रबंधिकेसाठी मी जरी प्रयत्न व परिश्रम केलेले असले तरी त्याला सार्थकी लावण्याचे सर्व श्रेय माझे मार्गदर्शक डॉ.दासू वैद्य यांनाच दिले पाहिजे. कारण त्यांच्या समर्थ व सकस मार्गदर्शनामुळेच माझ्या प्रयत्नांना व परिश्रमाला योग्य दिशा मिळाली आणि मी ही प्रबंधिका सादर करू शकले. 'परिस्थितीजन्य गतिरोधकाला समजून घेऊन उपाय शोधण्याची त्यांच्यामधील क्षमता माझ्यासाठी नवसंजीवनी ठरली.'

आजच्या आधुनिक तंत्र-यंत्राच्या जगात या समाजातील तळागाळात असणाऱ्या समाजबांधवांना म्हणजेच आदिवासींना सामील करून घेणे ही काळाची गरज आहे. शतकानुशतके आपली संस्कृती जिवापाड जपणाऱ्या आदिवासींचे खरे जीवनदर्शन घडते. नेत्यांच्या कथांमधून, स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समाज नागरी भागाशी जोडला गेला आहे. परंतु म्हणावा तेवढा नाही. आता त्यांच्यावर नागरी समाजाच्या जीवनाचे पडसाद उमटताना दिसू लागले आहेत.

माणूस जीवनामध्ये अनेक ऋणानुबंधांत स्वत:ला बांधत असतो. तो त्याच्या जीवन शैलीचा एक भाग असतो. काही माणसे सातत्याने आपल्या पाठीशी असतात. या संशोधन कार्यात प्रारंभीच्या काळापासून शेवटपर्यंत माझे संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत माझी प्रेरणा बनून राहिलेली, मला वेळोवेळी सहकार्य करणारी व माझ्या विचारांना दृढ करणारी अनेक माणसे आहेत. आपल्या जीवन प्रवाहात अपूर्ण ते पूर्ण करणारे आणि अधिक महत्त्व देणारे असे मार्गदर्शक किंवा आयुष्यात सुदैवाने प्रत्येक क्षेत्रात असे मार्गदर्शक मिळालेले अलौकिक कर्तव्य असलेल्या व्यक्ती दैनंदिन जीवनातून तर कधी ग्रंथातून मला भेटल्या.

संशोधनासाठी हा विषय निवडताना त्यात असणारा जिव्हाळा तर माहीत होताच. पण, हा विषय सुचविण्याचे काम ज्या सरांनी केले ते म्हणजे डॉ.बोथीकर सर ,डॉ.राम गायकवाड सर व डॉ.मुनेश्वर सर यांचेही मी मनापासून आभार मानते. परंतु संशोधनासाठी जो कवितासंग्रह निवडला त्या कवीच्या सहकार्यामूळे प्रबंधिका पूर्णत्वास येऊ शकली असे माझे कवी प्रा.विनोद कुमरे सरांचेही मी मनापासून आभार मानते.

जीवनात चांगले मित्र-मैत्रिणी मिळणे हा देखील व्यक्तीचा दैवयोग असतो माझ्या संशोधक मैत्रिणी कु.सखू मारकळ, कु.कोंडाबाई दांडेगावकर, श्रीमती संगीता बहिरम,



Scanned with CamScanner

कु.कौशल्या बागूल,कु.लता गावीत तसेच श्री.दळवी सर, श्री.अहिरे सर व श्री.बळवंते सर यांनी मला वेळातला वेळ काढून व प्रत्येक अडचणीत सहकार्य केले त्यांचेही मी ऋण व्यक्त करते.

माझ्या आयुष्यात चार क्षण आनंदाचे यावेत म्हणून काबाड कष्ट करून, स्वत:च्या इच्छा बाजूला ठेवून रात्रंदिवस शेतात राबून मला शिक्षण दिले. कधीही न संपणारी शिदोरी देणारी माझी आजी, आई,पप्पा,मदन बाबा,किसन बाबा,किरण आई ,सविता ताई,भाऊ यांच्या चरणी ही प्रबंधिका अर्पण करून त्यांचा आशीर्वाद मागते.

संशोधन पूर्ण झाले असताना सहकार्यासाठी अनेक हात पाठीवर, कोणाची तरी कौतुकाने मिळालेली शाबासकी,मायेच्या ओलाव्याने,जिव्हाळ्याने मित्रत्वाच्या नात्याने ज्यांनी शेवटपर्यत साथ दिली त्या सर्वाचे ऋण मान्य करताना स्वनिर्मितीचा जो अनुभव ,आनंद असतो तो चिरंतन टिकणारा असतो. हा आनंद खूप काही सांगून जातो. प्रत्येक गोष्ट घडून येण्याचा काळ ठरलेला असतो, ठरलेली वेळ असते.त्यावेळीही आपण कळतनकळत सामोरे जातो. या परिस्थितीच्या प्रवाहातून पुढे जाता-जाता आपल्या पाठीशी किती व्यक्तींनी आपली जपणूक केली हे पाहिल्यावर वळवाच्या पावसाच्या थेंबासारख्या कृतज्ञतेच्या भावनांची मनात खूप गर्दी होते. कुठे तरी हव्याहव्याशा वाटणाऱ्या शृंखलांमध्ये अडकलेले आपले मन पहाटेच्या थंडगार वाऱ्याबरोबर कानावर पडणाऱ्या थेंबाने जाग येते आणि आपल्या पाठीशी असणाऱ्या जिवलगांना पाहून मन भारावून जाते. ही सर्व जडलेली जिवाभावाची नाते नाजूक सुगंधित आठवणींचे स्मरण करून देणारे हे ऋणानुबंध यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा, आभार मानून मोकळे होण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहणे मला पसंत आहे.

संशोधिका

**गारोळे वर्षा शिवदिगंबर**



Scanned with CamScanner

## प्रास्ताविक:-

**मराठी** साहित्यामध्ये १९६० नंतर वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह आले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी आणि आदिवासी हे महत्त्वाचे प्रवाह म्हणून ओळखले जातात. परंतु या साहित्याच्या क्षेत्रात ग्रामीण, दलित आणि स्त्रीवादी या प्रवाहाचे साहित्य मराठी साहित्यामध्ये भरपूर प्रमाणात लिहिलें गेले. त्या तुलनेत आदिवासी समाज परंपरेचे लेखन सर्वच वाङ्मय प्रकारांत कमी प्रमाणात लिहिले गेले आहे.

साहित्यामध्ये या जमातीचा असावा असा प्रवाह उमटला नाही. याचे कारण असे की, भारतातील आदिवासी समाज हा पूर्वीपासूनच जंगलामध्ये राहतो आणि आजही तो तिथेच राहत आहे.त्यामुळे त्यांचा समाजाच्या प्रवाहात असावा तेवढा सहभाग नाही. समाजाशी पूर्वीपासूनच दूर वेगळ्या भूमिकेतून पाहिल्यामुळे त्यांचा गावाशी संबंध आला नाही."आदिवासी" ही संकल्पना समाजानेही कधी समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु पारतंत्र्य,ब्रिटिश राजवट संपली आणि भारतीय लोक स्वतंत्र झाले. भारताने लोकशाही स्वीकारली व घटनेने जनतेला स्वातंत्र्याचे हक्क बहाल केले. तसा आदिवासी समाज सामाजिक प्रवाहात येण्यास हळूहळू सुरूवात झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात साहित्यास पुन्हा नव्याने एक नवीन उत्तेजना मिळाली. यामध्ये अनेक साहित्यांचे प्रवाह सुरू झाले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, बालसाहित्य आणि त्याचबरोबर आदिवासी साहित्यही लिहिण्यास सुरवात झाली. ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनातील प्रश्न, समस्या चालीरीती, परंपरा, राजकारण, पारावरील गप्पा गोष्टी इत्यादी साहित्यात येऊ लागले. दलित साहित्यात दलित माणसाचे जीवन, त्यांच्यावर झालेले अन्याय, अत्याचार, दलित म्हणून समाजाने केलेली पिळवणूक, असह्य वेदना, भयानक चीड, आणणारे दाहक जीवनाचे चित्रण, गावच्या पाटलाचा वचक, आई-बहिणीच्या शरीराची लूट करणारे गावातील पोकळ प्रतिष्ठा असणारे पाटील असे एक ना अनेक पैलू वाचकांसमोर येऊ लागले.

स्त्रीवादी साहित्यातही त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार स्त्री म्हणून वाट्याला आलेले लाचारीचे जीवन, समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन, घटनेने स्वातंत्र्य बहाल करूनही स्त्रीला पुरूषी सत्तेत किती गौण स्थान आहे. त्याचबरोबर स्त्रीने काय करावे, काय करू नये हे ठरवणारा समाज, स्त्री म्हणून आणि त्यातही दलित स्त्रीच्या वाट्याला दलित म्हणून आलेले दु:खाचे जीवन, समाजात आणि कुटुंबात तिला किती दुय्यम स्थान आहे. या आणि अशा कित्येक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम स्त्रीवादी साहित्याने वाचकांसमोर,समाजासमोर आणले.

वरीलप्रमाणे उल्लेख केलेल्या साहित्याच्या प्रवाहाप्रमाणेच आदिवासी साहित्यामध्ये आदिवासी समाजातील अनेक समस्या, त्यातील प्रश्न, अडचणी, समाजापासूनचे अलिप्तपण आणि स्त्रियांच्या मानसिकतेचे चित्रण या सर्व प्रश्नांवर साहित्यामध्ये म्हणावा तसा प्रकाश पडला नाही. साहित्याच्या दृष्टीने सर्वच गोष्टी साहित्यामध्ये आलेल्या नाहीत. याचे कारणही तसेच आहे. समाजाचे आणि आदिवासी माणसाचे कधी सूत जमले नाही.



Scanned with CamScanner

समाजातील घडामोडी, व्यवहार, चर्चाविनिमय या माणसाच्या वाट्याला कधी आलेलेच नाही. शाळेचे आणि आदिवासी माणसाचे फारसे जमत नाही. अगदी आजचा विचार केला तरी शिक्षणापासून कितीतरी हा माणूस लांबच आहे. आजसुध्दा पूर्णपणे शिक्षण खेड्यापाड्यांपर्यंत पोहचले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची घटना लिहिली. समाजातील सर्व स्तरांतील जनतेला डोळ्यांसमोर ठेवूनच आपले कार्य पार पाडण्याचे येथील व्यवस्थेला सांगितले. परंतु ते आजही आदिवासी माणसापर्यंत येथील व्यवस्थेने पोहचू दिले नाही.

महात्मा गांधी यांनी "खेड्यांकडे चला" हे सूत्र सर्वांना सांगितले. कारण भारत देशाची जनता ही ८०% खेड्यांत राहते. खेड्यांतील जनतेचा विकास होत नाही. म्हणून त्यांना प्रवाहात जोपर्यंत आपण सहभागी करून घेत नाही तोपर्यंत या देशाचा विकास होणार नाही. हे सांगितले होते. डॉ.बाबासाहेबांच्या चळवळीने व त्यांच्या विचाराने दलित समाज सुधारला. बाबासाहेबांनी आदिवासी समाजासाठीही प्रयत्न केले. घटनेत आरक्षणाची सुविधा निर्माण करून दिली. परंतु भारतीय समाजातील काही उच्चभ्रू वर्गातील लोकांनी त्यांच्या नावांखाली आपल्याच पोळीवर तूप ओढण्याचे काम केले. परिणामी आदिवासी समाज जंगलांत राहत असल्यामुळे समाजात काय चालू आहे. याची किंचितही माहिती त्यांना लागली नाही आणि लागू दिलीही नाही. याचा साहित्यावरही परिणाम झाला. नुसता परिणामच झाला नाही तर आदिवासी साहित्याची पोकळी भरून निघण्यास वावच राहिला नाही.

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाला भाषा दिली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बहुजनांना अभिव्यक्तीचे बळ दिले. दलित साहित्याचा हुंकार प्रथमतः कवितेतूनच प्रकट झाला. दलित कविता ही विसाव्या शतकातील एक ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच वाङ्मयीन सत्य वस्तुस्थिती जगण्याच्या संदर्भात समता हे जीवनाचे मूल्य असावे. या मुल्यांच्या पायावर समाजरचना उभी राहावी ; या प्रेरणेतून व उद्दिष्टांतून दलित कवितेची निर्मिती झाली.

दलित कविता पारंपरिक मुल्यांना जशी नाकारते तसे आदिवासी कवितेमध्ये आढळून येत नाही. आदिवासी कविता देव, धर्म, निसर्गपूजा, पारंपरिक मूल्ये यांना जपत आत्मविकासाची भाषा करते. दलित कविता व आदिवासी कविता यामधील वेगळेपण जाणून घेण्यासाठी आदिवासींच्या अस्तित्वाचे प्रश्न, समूहाची वेदना, सांस्कृतिक अतिक्रमण, धर्मांतर इत्यादींचा कवी विनोद कुमरे यांच्या "आगाजा" कवितासंग्रहातील कवितेच्या अंगाने अभ्यास करावयाचा आहे.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणांची शीर्षके | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | आदिवासी समाज, साहित्य आणि संस्कृती | १-२९ |
| २. | आदिवासी कवितेची निर्मिती प्रेरणा, विकास आणि सद्यस्थिती | ३०-५४ |
| ३. | आदिवासी कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती ('आगाजा'च्या संदर्भात) | ५५-७९ |
| ४. | 'आगाजा'तील आदिवासी कविता: वाङ्मयीन मूल्यमापन | ८०-९५ |
| ५. | निष्कर्ष | ९६-१०१ |
| | संदर्भ ग्रंथसूची | १०२-१०४ |




Scanned with CamScanner

# प्रकरण पहिले

# आदिवासी समाज, साहित्य आणि संस्कृती



Scanned with CamScanner

## प्रकरण पहिले
## आदिवासी समाज, साहित्य आणि संस्कृती

१.१ आदिवासी संकल्पना
१.२ आदिवासी समाज जीवन
१.३ आदिवासी साहित्य
१.४ आदिवासी जनसमूहाचे स्वरूप
१.५ आदिवासी संस्कृती



Scanned with CamScanner

# प्रकरण पहिले

# आदिवासी समाज, साहित्य आणि संस्कृती

## १.१ आदिवासी संकल्पना

समाजामध्ये असे काही लोक आहेत की, ज्यांच्या समोर 'आदिवासी' हा शब्द उच्चारल्याबरोबर त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. आदिवासी शब्दाचा अर्थ काय ? आदिवासी कोणाला म्हणायचे असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतात. जेव्हा ते आदिवासी शब्दाची माहिती वाचायला सुरूवात करतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, आदिवासी हा शब्द आदि + वासी = आदिवासी या पध्दतीने निर्माण झाला आहे. 'आदि' म्हणजे अगोदरचा, 'वासी' म्हणजे वास्तव्य करणारा म्हणजेच आदिवासी होय. आदि-वासी मधील 'आदि' हा शब्द संस्कृत भाषेतला आढळतो. तो मूळ निवासी यांच्या बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये नाही, म्हणजे आदिवासी हे नामसंबोधन आर्यांच्या बोलीभाषेतून आले आहे हे स्पष्ट होते.

"व्युत्पत्तिशास्त्रानुसार 'आदिवासी' हा शब्द 'ट्रायबल' या शब्दापासून तयार झाला आहे. रोमन लोकांच्या मते जमात हा एक राजकीय विभाग होता. भारताप्रमाणेच पश्चिमी देशांमध्ये 'आदिवासी' शब्दाचा अर्थ आज जसा प्रचलित आहे, त्यापेक्षा वेगळा होता. जमात हे अनेक जिल्हे मिळून बनलेला एक वर्ग होता. त्यात कुळांचा समावेश असे भारताचे नाव भरत जमातीवरून पडले असावे असे मानले जाते. तसेच ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात उगम पावलेल्या मत्स्य राजसत्तेचा संबंध मत्स्य जमातीशी होता. राजस्थान आणि मध्यप्रदेशात आढळणारी मीना जमात मत्स्य जमातीचे वंशज मानली जाते. मीना जमातीचा विश्वास आहे की, मत्स्य/मीन म्हणजे मासा, हा विश्वाचा मूळ स्रोत आहे. आजही असे अनेक प्रदेश आहेत. त्यांची नावे स्थानिक जमातीवरून पडलेली आहेत. ईशान्य भारतात मिझोराम, नागालॅंड आणि त्रिपूरा राज्यांची नावे मिझो, नाग आणि त्रिपुरी जमातीवरून पडलेली आहेत. तसेच झारखंडमधील संथाल परगणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशचा भाग मिळून बनलेला गोंडवाना आणि हिमाचल प्रदेशातील लाहौल, स्वांगला आणि किन्नोर ही नावे त्या भागातील संथाल, गोंड, लाहौल आणि किन्नर जमातीवरून पडली आहेत."[१] भारतात झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा, गुजरात, मिझोराम, केरळ, नागालॅंड, मेघालय, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व लक्षद्वीप, दीव-दमण, दादर नगरहवेली इत्यादी राज्यात व केंद्रशासित प्रदेशात आदिवासी जमातीचे अस्तित्व आढळून येते. भारतामध्ये एकूण ९३०



Scanned with CamScanner

अनुसूचित जमाती आहेत. महाराष्ट्रामध्ये आंध, बैगा, बारडा, भिल्ल, कोलाम, कोकणा इ. एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. या जमातीपैकी काही जमातींचा शैक्षणिक,आर्थिक विकास झाल्याचे आढळून येते.

आदिवासी समाज जीवनाचे स्वरूप, त्यांचे नातेसंबंध, भौगोलिक प्रदेश, सांस्कृतिक संरचना व उदरनिर्वाह करण्याच्या पध्दतीमुळे त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. मूळवासी, आदिम, आदिम जमाती व टोळ्या, वन्यजाती, गिरिजन, वनवासी वा पाहाडी अशा नावांनी ओळखले जाते. तसेच भारत भूमीवर सर्वप्रथम आदिम वस्ती करून राहू लागल्यामुळे त्यांना 'भूमिपुत्र', 'धरतीची लेकरे' असे संबोधले जाते. आदिवासी समाज अतिप्राचीन काळापासूनच हिंदूस्थानामध्ये अप्रगत जीवन जगत आल्यामुळे 'मागासलेले हिंदू' नावानेही ओळखला जातो. असे असले तरी भारतीय संविधानाने आदिवासींना 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes) नावाने संबोधले आहे. मानववंशशास्त्रज्ञानी आदिवासींना अप्रगत, जंगली, रानटी, बुडत असलेली जमात किंवा मागास हे शब्दप्रयोग केले तर योग्य ठरणार नाही. कारण सांस्कृतिकीकरण व वैश्विकीकरणाचा स्वीकार करून आदिवासी समाजाने आपला सामाजिक दर्जा उंचावला आहे. तसेच औद्योगिकीकरण, तांत्रिकीकरण व शिक्षणाच्या प्रभावामुळे आदिवासी समाजामध्ये बदल होत चाललेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचा विकास झाला आहे.

भारतामध्ये सर्व प्रथम रहिवास असलेल्या मानव समूहाला 'आदिवासी' असे संबोधले जाते. त्यांना 'मूल निवासी' असेही संबोधतात. 'आदिवासी' ही संकल्पना गेल्या काही वर्षांपासून अधिक प्रचलित झाली. 'आदिवासी' या शब्दाची व्याख्या अनेक विचारवंतांनी केल्या. पण त्याबाबत अजूनही एकमत झाल्याचे आढळून आलेले नाही. भूतकाळातील विशिष्ट कालखंडाचा विचार केला तर आदिवासींना वेगवेगळ्या नावांनी संबोधले गेल्याचे आढळते.

ऋग्वेदपूर्व काळात 'कुयव', 'पणी', 'दास', 'दस्यू', 'वृत्र', 'मृध्रवाच', 'मृध', 'अव्रत', 'अयज्वन', 'असुन्वत', 'शिश्नदेवा', 'मुरदेवा', 'यातुधाना', 'यातव' इ. नावांनी संबोधल्याचा इतिहास ऋग्वेदावरून समजतो. रामायण, महाभारताच्या काळापासून जुन्या वाङ्मयात त्यांचे वर्णन 'कावळ्यापेक्षा काळे', 'धरतीचे पापी प्राणी', 'खुजे', 'चपट्या नाकाचे', 'लुटारू', 'राक्षस', 'नरभक्षक' वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी



Scanned with CamScanner

केलेले आढळते. तर अलीकडच्या काळात आदिवासींना 'आदिम','वनवासी' असेही संबोधले जाते.

आदिवासी जगाच्या बहुतेक सर्व भागांत राहतात. विविध देशांत त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. ऑस्ट्रेलियात 'अबोरिजिन्स' युरोपीय देशांमध्ये 'जिप्सी' अमेरिकेत 'रेड इंडियन्स' असे म्हटले जाते. आफ्रिका, आशियाई देशांमध्ये 'आदिवासी' नावाने ओळखतात. जगात आफ्रिका खंडानंतर आदिवासींच्या लोकसंख्या व जमातीबाबत भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

मुळातच गैरसोय हीच एक सोय समजून जगणारा आदिवासी समाज पुढारलेल्या समाजाच्या संपर्कात न आल्यामुळे या समाजाविषयी अनेक गैरसमज निर्माण झालेले दिसून येतात. भारतातील अनेक नागरिक असे मानतात की, सर्वच आदिवासी जंगलवासी असतात ; किंबहुना जंगलांत राहणारे सर्वच आदिवासी असावेत असाही गैरसमज आढळून येतो. कितीतरी आदिवासी इतिहासाच्या कोणत्यातरी कालखंडात दर्यावर्दी असावेत व इतर देशांतही त्यांची फिरती होत असावी, असेही पुरावे मिळतात. काही आदिवासी जमाती भटक्या, काही स्थिर, काही फार बुध्दिमान, काही साहसी व कल्पक, काही शेतीशी निगडित तर काही व्यवसाय-व्यापार करणाऱ्या आहेत या साऱ्या वैविध्यपूर्ण पार्श्वभूमीवर भारतातील आदिवासींची एक किंवा सर्वसामान्य व्याख्या करणे अशक्यच आहे. कवी भुजंग मेश्राम आदिवासी ही संकल्पना स्वीकारतात त्यांच्या मते 'Indigineous' म्हणजे मूळचा या अर्थाने हे नामसंबोधन आहे पण आदिवासीबाबत 'आदिम' हे संबोधन त्यांना मान्य नाही. आज बहुसंख्य आदिवासींनी 'आदिवासी' हे संबोधन स्वीकारलेले आढळते. भुजंग मेश्राम यांना हे संबोधन अधिक अर्थपूर्ण वाटते. काही मानववंश अभ्यासकांनी व विचारवंतांनी आदिवासी या संकल्पनेला व्याख्येत मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ. सुधाकर जाधव यांनी आपल्या 'भारतातील आदिवासी समाज' या ग्रंथात 'आदिवासी' संकल्पनेच्या व्याख्या संकलित केल्या आहेत, त्यानुसार खालीलप्रमाणे व्याख्या -

### १.१.१ <u>विचारवंतांच्या व्याख्या</u>

**१) डब्ल्यू .जे . पेरी यांच्या मते,** " समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच भू-प्रदेशावर राहणाऱ्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात. "[२]



Scanned with CamScanner

(*A tribe is a group speaking common dialect and inhabiting a common territory.* -- ***W.J.Perry*** )

२) **डॉ. रिव्हर्स यांच्या मते,** " आदिवासी समाज हा साधा व सरळ सामाजिक समूह आहे की, ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात व युध्द वगैरेंच्या पूर्ततेसाठी एकसंघपणे झटतात. " [३]

(Tribe is social group of a simple kind, the members of which speak common dialect act together in such common purposeas wartare -- Dr.Rivers)

३) **गिलीन आणि गिलीन यांच्या मते,** " आदिवासी समाज म्हणजे एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानीय गटांचा समुच्चय होय. " [४]

(Any collection of preliterate local groups which occupies a common general territory, spells a common language and practices a common culture is a tribe --***Gillin and Gillin***)

४) **मदन व मजुमदार यांच्या मते,** " समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या एकत्रित उल्लेख 'आदिवासी समाज' म्हणून करतात. " [५]

( A cluster of village communities which share a common territory, language and are economically interwoven is often also designated as tribe -- ***Madan and Mujumdar*** )

५) **डॉ.डी.एन.मजुमदार यांच्या मते,** " समान नाव धारण करणाऱ्या एकाच भू-प्रदेशावर राहणाऱ्या, एकच भाषा बोलणाऱ्या, विवाह व व्यवसायाबाबत समान निषेध नियम पाळणाऱ्या व परस्पर कर्तव्याच्या दृष्टीने निश्चित अशी सुसूत्र पध्दत स्वीकारणाऱ्या कुटुंबांचा समूह म्हणजे आदिवासी समाज होय. " [६]

( A tribe is a collection of families or group of families bearing a common name. members of which occupy the same territory, speak



Scanned with CamScanner

the same language and observe certain taboos regarding marriage, prodession or occupation and have developed a well assessed system of reciprocity and mutuality of obligations -- *Dr. D.N. Majumdar*)

६) **बोगार्डस यांच्या मते,** " सुरक्षिततेची जरूरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला असतो " [७]

७) **बाओस या समाजशास्त्रज्ञाच्या मते,** " आदिवासी म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असा समूह की जो एकच भाषा बोलतो आणि इतर लोकांपासून संघटितपणे आपले संरक्षण करतो. " [८]

८) **विनिक -** " विशिष्ट भू-प्रदेशात राहणारा,विशिष्ट बोली बोलणारा, सांस्कृतिकदृष्ट्या एकात्म असलेला समाजगट म्हणजे जमात ही सामाजिक, धार्मिक, नात्यागोत्यांच्या आणि रक्ताच्या संबंधांनी बांधलेली असतात. " [९]

९) **डॉ. घुर्ये मानववंशशास्त्रज्ञ -** " भारतीय आदिवासी हे मागासलेले हिंदू आहेत. सपाट प्रदेशात राहणाऱ्या हिंदूंप्रमाणेच आदिवासींमध्येही जाती प्रथा असते. " [१०]

वरील व्याख्यांचा विचार केला तर असे लक्षात येते की, आदिवासी समाज हा एक प्राचीन समाज असून त्यांचे वास्तव्य एका निश्चित भू-प्रदेशावर असते. अनेक विचारवंतांनी समान बोलीभाषा व समान संस्कृती असलेल्या मानवी गटाला आदिवासी म्हटलेले आहे पण प्रत्येक आदिवासी जमातीची वेगळी बोलीभाषा आहे व त्यांच्या संस्कृतीमध्येही तफावत आढळून येते. म्हणून समान बोलीभाषा बोलणारा व समान संस्कृती असणारा मानवी गट आदिवासीच आहे असे म्हणता येणार नाही. आदिवासी हा साधा व सरळ सामाजिक समूह असल्याचे व्याख्यांवरून समजते.

### *१.१.१.१ सर्वसामान्य व्याख्या*

१) आदिवासी म्हणजे अनादी काळापासून वास्तव्यास असलेला जनसमूह होय.

२) "मानवाचा इतिहास जेथून सुरू होतो त्यापूर्वी ज्यांची पावले या देशाच्या भूमीत उमटली गेली. त्या मानवी समूहाला आदिवासी म्हणतात."[११]

३) " आदिवासी समिती परिषद शिलाँगनुसार - आदिवासी म्हणजे एक समान भाषा बोलणारा, एका पूर्वजांपासून उत्पत्ती झाली असे सांगणारा, एका विशिष्ट भू-प्रदेशात



Scanned with CamScanner

वास्तव्य करणारा, तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्त संबंधांवर आधारित सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एकजिनसी गट होय. "[१२]

४) " आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंबहुना बाहेरील देशांतून येऊन सुध्दा वने व पर्वत आदींच्या आश्रयाने स्थानिक झालेल्या जमातींना वन्य किंवा आदिवासी म्हणतात. "[१३]

५) " पशुपाल जगात, पशुपूजक जगात, पहाडी-जंगली जगात, प्राचीन जगात राहणारे गिरिजन वनवासी म्हणजे आदिवासी. "[१४]

वर सांगितलेल्या आदिवासी समाजाच्या विशिष्ट व्याख्यांवरून आदिम समाजाची लक्षणे स्पष्ट होतात. आदिम समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीनी वेगळा असल्याचे आपल्या लक्षात येते. विशिष्ट भू-प्रदेश, एकाच रक्तसंबंधांवर आधारित, स्वतःची बोलीभाषा ; पण लिपीचा अभाव, वेगळी जीवन पध्दती, साधी अर्थव्यवस्था, सीमित तंत्रविद्या, समान धर्म, सामाजिक एकजिनसीपणा इत्यादी वैशिष्ट्यांनीही आदिम समाजाचे, संस्कृतीचे वेगळेपण आपल्या लक्षात येते.



Scanned with CamScanner

## १.२ आदिवासी समाज जीवन

अनेक संशोधन कार्यामुळे आदिवासी जीवनाबद्दल इतर समाजाला माहिती झाली आहे. इतर समाजाशी आदिवासींचा संपर्क आलेला आहे. आचारविचारांची देवाणघेवाण त्यांच्यामध्ये वाढली आहे. समाजामध्ये वेगवेगळ्या आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक जमातीचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यक्रम, चालीरीती, धार्मिक मूल्ये यामध्ये सारखेपणा नाही. प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन त्यांच्या भौगोलिक, आर्थिक आणि परंपरागत चालत आलेल्या वैशिष्ट्यांनी बनलेले आहे.

आदिवासी हा अबोल, भोळा, प्रामाणिक, दैववादी, सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेणारा निसर्गाच्या सान्निध्यात रमणारा, स्वच्छंदपणे जीवन जगणारा आहे. डोंगरकपारीत राहणारा असला, तरी त्याचे स्वच्छ, साधे राहणे व आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहणारा हा समाज आहे. आदिवासी समाजाची खरी संपत्ती जल, जंगल, जमीन आहे. डोंगरकपारीत वास्तव्य असल्याने रस्ते नाहीत. दळणवळण साधनांअभावी केलेल्या वस्तू बाजारपेठांपर्यंत पायी न्याव्या लागतात. बाजारपेठेत वस्तू विकून हव्या त्या वस्तू खरेदी करायच्या. अशा पध्दतीने आदिवासी दैनंदिन व्यवहार करत असतो. आदिवासी ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणचे नाव तेथील डोंगर, प्राणी, भौगोलिक स्थान, देव यावरून ठेवले जाते. उदाहरण- डोंगरवाडी, देववाडी, डोंगरगाव, जांभूळपाडा इत्यादी.

आदिवासी पुरूष कमरेला लंगोट, गुडघ्यापर्यंत धोतर, अंगात कोपरी, उपरणे असते. स्त्रियांचा पोशाख मात्र प्रत्येक जमातीनुसार वेगवेगळा असतो. डोक्यावर 'फडकी' नावाचे वस्त्र घेतात. हे वस्त्र लाल रंगाचे असते. त्यावर डिझाइन केलेले असते. भिल्ल जमातीतील स्त्रिया नऊवारी लुगडयाचे दोन तुकडे करून एक तुकडा नेसतात, तर दुसरा तुकडा डोक्यावर घेतात. प्रत्येक जमातीतील स्त्रियांचा पेहराव वेगवेगळा असतो.

आदिवासी जमातीपैकी माडिया-गोंड, कोलाम कातकरी, पारधी या जमातींचे आर्थिक, सामाजिक जीवन अजूनही सुधारलेले नाही. आदिवासीमध्ये बोलीभाषेचा प्रश्न शिक्षणाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये आदिवासी जमाती निरनिराळ्या बोलीभाषा बोलतात. त्यामध्ये काही मराठीच्या बोलीभाषा आहेत. तर काही स्वतंत्र बोलीभाषा आहेत. मोजकेच आदिवासी चांगल्या प्रकारे मराठी भाषा बोलणारे आणि समजणारे आहेत. दुर्गम भागामध्ये राहणाऱ्या कोरकू, भिल्ल, कोलाम या जमातींना मराठी बोलता येत नसल्याने त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होतात. आचार-विचारांचे आदान-



Scanned with CamScanner

प्रदान कमी-प्रमाणात होते, त्यांची मुले शाळेत जाऊ लागली की, भाषेची अडचण प्रामुख्याने जाणवते. त्यामुळे त्या मुलांचे शाळेमध्ये लक्ष लागत नाही व शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते. मराठी बोलता येत नसल्यामुळे त्या मुलांचा आत्मविश्वास कमी असतो. त्यातून त्यांची शिक्षणाची आवड कमी होते.

### १.२.१ आदिवासी जीवनातील कल्पवृक्ष

आदिवासी समाज जंगलांत राहत असल्याने त्यांना रानावनात उपलब्ध असणाऱ्या साधनांआधारे उपजीविका भागवावी लागते. लाकडाचा कोळसा, दारू, मध, डिंक, तेंदूची पाने, चारोळ्या, बिब्बा, टोया, गवत इत्यादी त्यांची अर्थार्जनाची साधने आहेत. यात मोहाच्या झाडाचा सिंहाचा वाटा आहे. मोहाच्या फुलांपासून दारू, पानापासून मुडे, बियांपासून खाद्यतेल, तर लाकडापासून कोळसा, सरपण मिळते. मोहाची दारू आरोग्यासाठी लाभदायक असल्याने तिला मोठी मागणी असते. एकूणच पाने, फुले, बिया व लाकूड हे सर्वच उपयोगी पडत असल्याने मोहाचे झाड आदिवासींसाठी कल्पवृक्ष ठरते. याबरोबरच पळसाच्या पानांपासून पत्रावळी व द्रोण, मुळापासून दोर, निवाऱ्यासाठी झोपडी बांधताना पळसाच्या झाडांचा वापर होतो. परंतु जंगले नष्ट होत आहेत, त्यामुळे हा आधार काहीसा संपत चालला आहे.

आदिवासी समाजामध्ये ज्यांच्याकडे शेती आहे, तो पारंपरिक पध्दतीने शेती करतो. पण कमी शेती, वेळेवर पाऊस नाही, सुधारित बियाणे मिळत नाही, यामुळे उत्पादन कमी होते. शासन अनेक योजना राबवते. मात्र, त्या आदिवासींपर्यत पोहोचतच नाहीत, यातच बाजारभावाबद्दल फारसी माहिती नसते. यामुळे अडीअडचणीत कर्ज घेतल्याशिवाय पर्याय नसतो व सावकाराकडे कोणताच कागदोपत्री व्यवहार करण्याची गरज नसल्याने सावकाराकडून कर्ज घेतले जाते. पीक आल्यावर सावकार कमी भावाने त्यांच्या धान्याची खरेदी करुन भरपूर व्याज वसूल करतो. त्यांची ही फसवणूक आयुष्यभर चालू राहते. निसर्गाच्या सान्निध्यात, पक्ष्यांच्या किलबिलाटात राहणारा आदिवासी स्वत:ला सुखी समाधानी समजतो. आपल्या जमातीबद्दल, प्रदेशाबद्दल त्यास आपुलकी आणि सांस्कृतिक मूल्ये काळजीपूर्वक जपत आल्याचे दिसून येते. काटकपणा, संयम, चपळता, सहजता, स्वच्छंदता, करारीपणा ही वैशिष्ट्ये निसर्गत: आदिवासींमध्ये रुजलेली आहेत.



Scanned with CamScanner

### १.२.२ आदिवासी जीवनातील समस्या/प्रश्न

आदिवासींना जीवन जगताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कारण आदिवासी जास्त प्रमाणात डोंगरांत, दऱ्या-खो-यांत, कड्या-कपारीत, पाड्यांवर वस्त्या करून राहतो त्यामुळे त्यांच्या कित्येक गरजा पूर्ण होत नाहीत. अनेक प्रश्न समोर उभे राहतात आणि काही जमातींमध्ये शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांच्या समस्या वाढतच जातात.

**१) आरोग्य :**

आदिवासी जमातींमध्ये प्रमुख समस्या आरोग्याची असते. कारण कंदमुळे, आंबिल, फळे यांवर उदरनिर्वाह करताना कधी कधी दोन दोन दिवस उपाशीच राहावे लागते. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहत नाही. तसेच निकृष्ट दर्जाचा आहार, जंगलातले अस्वच्छ पाणी याचा त्यांच्या आरोग्यावर हानिकारक परिणाम होतो. हिवताप, सर्दी, खोकला, पोटाचे विकार, हगवण, उलट्या होणे यामुळे शरीरावर वाईट परिणाम होतो. ते या सर्व रोगांच्या उपचारांबद्दल उदासीन असतात. घरामध्ये एका बाजूला गुरे, शेळ्या, कोंबड्या असतात, तर दुसऱ्या बाजूला ते स्वतः राहतात. पाळीव प्राण्यांच्या मलमूत्राचा निश्चितपणे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. पण त्यांना हे सर्व लक्षात येत नाही. गरोदर स्त्रियांना रूग्णालय उपलब्ध नसते. बाळासाठी कुठलीच लस दिली जात नाही. गरोदर स्त्रीला मासिक औषध, गोळ्या कधीच दिल्या जात नाहीत. दुर्गम भागात आदिवासी समाज राहत असल्याने त्या ठिकाणी रूग्णालयाची सोय नसते. ज्या आदिवासी भागामध्ये शासनाची शासकीय रूग्णालये आहेत, त्यामध्ये दाखल करून घेण्यास डॉक्टर टाळाटाळ करतात, बहुतेक वेळा अशा भागातील रुग्णालयात डॉक्टर नियुक्त नसतात, तर कधी असूनही हजर नसतात, कारण त्या भागावर शासकीय नियंत्रण सुध्दा कमी असते.

**२) दळणवळणाची समस्या :**

आदिवासी डोंगरात, दऱ्या-खो-यांत, कड्याकपारीत, पाड्यांवर राहत असल्यामुळे त्यांच्यापर्यंत दळणवणाची साधने पोहचत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासमोर दळणवळणाची समस्या निर्माण होते. दळणवळणाचे साधन नसल्याने बाह्य जगाशी संपर्क येत नसतो, यामुळे विकासाला गती मिळणे शक्य होत नाही. रस्ते नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. बाजारपेठ उपलब्ध होत नाही. त्यामुळे पाड्यांवरच दलाल त्यांच्या मालाची कमी



Scanned with CamScanner

भावाने खरेदी करतात म्हणून त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. म्हणून आरोग्याप्रमाणेच दळवळणाची समस्या देखील गंभीर आहेत असे म्हणता येईल.

### ३) शैक्षणिक समस्या :

आदिवासी समाज दऱ्या-खो-यांत राहत असल्यामुळे त्यांना शिक्षण घेता येत नाही. त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयीची उदासीनता आढळून येते. निसर्गात मुक्त जीवन जगणारी मुले-मुली चार भिंतीच्या आतील शिक्षणाला नकोच म्हणतात. तसेच पालकांना शिक्षणाचे महत्त्वच माहीत नसते व आर्थिक समस्या असल्यामुळे पालक पाल्यांना शिक्षण घेण्यासाठी पाठवायला तयार नसतात. यामुळे हा समाज आजही मागास राहिला आहे. शासनाने यावर उपाय म्हणून आदिवासी भागामध्ये आश्रमशाळांची निर्मिती केली, परंतु शाळांवर नियंत्रण अपुरे असल्याने त्या शाळांचे कामकाज व्यवस्थितपणे चालत नाही. शाळेतील शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग शाळेत न राहता शहरांतून ये जा करतात. त्यामुळे ते शाळेत कधी तरीच हजर राहतात. त्यामुळे आदिवासींचा विकास होण्यात अडथळे निर्माण होतात.

आदिवासी समाजामध्ये ज्ञान व माहितीच्या साधनांचा वापर कमी प्रमाणात करत असल्याचे आढळून येते. त्याचे मुख्य कारण शैक्षणिक मागासलेपणा व भाषेची अडचण आहे. आदिवासी समाजामध्ये विशिष्ट बोलीभाषा असल्यामुळे त्यांना मराठी भाषेचेही फारस ज्ञान नाही. इंग्रजी येणे तर फारच दूरचे आहे. त्यामुळे या साधनांचा वापर करणे आदिवासी समाज शक्यतो टाळतो.

### ४) शेती व तिचे प्रश्न :

आदिवासी समाजाला जीवन जगताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यापैकीच एक समस्या शेती व तिचे प्रश्न आहे. आदिवासींची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन पारंपरिक शेती आणि जंगलातील संपत्ती हेच आहे. शेती करताना अनेक अडचणी येतात. त्यामध्ये आर्थिक व नैसर्गिक अडचण यामुळे शेतीमध्ये हवे तेवढे उत्पन्न होत नाही. त्याबरोबरच बहुतेक शेतकरी कर्जात बुडाल्याने सावकारांनी त्यांच्या जमिनी आपल्या नावे करून घेतल्या. शासकीय स्तरावरून जंगलतोडीस प्रतिबंध केल्यामुळे जंगलांवरील त्यांचा हक्क संपला. त्यामुळे आदिवासी समाज अधिकच अडचणीत आला. अपुऱ्या शेतीवर आपल्या कुटुंबाच्या गरजा कशा पूर्ण करायच्या हा मोठा प्रश्न आदिवासी समाजासमोर उभा आहे. शेतमजुरी करायचे जरी



Scanned with CamScanner

ठरवले तरी वर्षभर शेतमजुरी मिळत नाही. शेतीव्यतिरिक्त दुसरा व्यवसाय म्हणजे लाकडापासून कोळसा तयार करणे. मध, डिंक, तेंदूची पाने, मोहाची फूले इत्यादीमधून आपला उदरनिर्वाह करण्यास मदत होते, परंतु वन विभागाच्या कृपेने त्यांचा जंगलातील शिरकावच बंद झाला आहे. शासनाकडून बऱ्याच उद्योग-व्यवसायची आदिवासीकरिता निर्मिती केली जाते, पण योजना आदिवासी पाडयांपर्यंत पोहचतील असे नाही.

### *१.२.३ आदिवासी जीवनात दायीची भूमिका*

आदिवासी जीवनात दायीची महत्त्वाची भूमिका आहे असे म्हणता येईल. कारण आदिवासी समाज ज्या भागामध्ये राहतो तेथे सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध असतील असे नाही म्हणून पाड्यांवर पारंपरिक पध्दतीने बाळंतपण करणारी दायी असते. दायी ही आदिवासी समाजातील स्त्रियांची 'डॉक्टर' असते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तिने बाळंतपणाचे शिक्षण पारंपरिक पध्दतीने घेतलेले असते, बाळाची नाळ विळ्याने कापली जाते. होणाऱ्या वेदना मानसिक आधार देऊन कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. कापलेली नाळ घरातच पुरून टाकतात. पाचव्या दिवशी विधिवत पाचवी केली जाते. तोपर्यंत त्या घरामध्ये दायीचे अधिकार चालतात. दायीच्या मदतीने पाचवीचा कार्यक्रम केला जातो. कार्यक्रम आटोपल्यावर तिला दक्षिणा, मानपान देऊन तिची बोळवण करण्यात येते.

### *१.२.४ आदिवासी जीवनाचे विविधांगी वेगळेपण*

**१) निसर्गपूजा :**

आदिवासी जमाती या निसर्गपूजक आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात राहिल्यामुळे सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर झालेला दिसून येतो. निसर्ग, सूर्य, चंद्र, तारे, मेघ, वाघ, वृक्ष, वेली ही त्यांची देवते आहेत. घराच्या भिंतीवरही वाघ, सूर्य, अशी चित्रे काढलेली असतात. मुख्य देव म्हणजे डोंगरदेव, यमदेव, नद्या, पितृदेव, भूमी, जल, वायू, आकाश यांना ते महत्त्व देतात. आदिवासी समाज हा मूर्तिपूजेपेक्षा निसर्गपूजेवर जास्त विश्वास ठेवल्याचे आढळून येते. आदिवासी जमाती या विविध वैशिष्ट्यांनी नटलेल्या दिसून येतात. साधेपणा, रेखिवपणा, सुंदरता ही आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये आहेत.

**२) आदिवासी जमातींचे वास्तव्य :**

आदिवासी जमातींचे वास्तव्यावरून देखील वेगळेपण लक्षात येते. इतर समाजाप्रमाणे आदिवासी जमातींना शहरांमध्ये राहायला आवडत नाही तर त्यांना सपाट मैदानी भागात,



Scanned with CamScanner

डोंगरमाथ्याच्या भागात, दऱ्या-खोऱ्यांत राहायला आवडते. आदिवासी जमातींच्या वास्तव्यानुसार त्यांची तीन वर्गामध्ये विभागणी करता येते.

- सपाट मैदानी भागात वास्तव्य करणारे आदिवासी
- डोंगरमाथ्यांच्या भागातील आदिवासी
- दऱ्या-खोऱ्यांत राहणारे आदिवासी

**३)विवाह पध्दती :**

आदिवासी जमातीमध्ये विवाह पध्दती ही वैशिष्ट्यपूर्ण असते, या जमातीमध्ये वराला वधूपित्यास वधूमूल्य द्यावे लागते. यामुळे त्यांना मुलगी झाल्यास आनंद होतो. हे वधूमूल्य वेगवेगळ्या स्वरूपात देता येते. आदिवासी अर्थव्यवस्थेत श्रमिकाचे फार महत्त्व असते. मुलीचे लग्न झाले तर घरातील एक श्रमिक कमी होतो. वधूमूल्य देण्याची ऐपत नसल्यास ते फिटेपर्यंत मुलास सासरीच काम करण्यासाठी राहावे लागते, परंतु ही विवाह पध्दती सर्वच आदिवासी जमातीमध्ये सारखी नाही. आंध आदिवासी जमातीमध्ये वधूपित्यास वधूमूल्य न देता वरपित्यास वरमूल्य द्यावे लागते. आदिवासी जमातींमध्ये विवाह पध्दती सारखी नाही असे स्पष्टपणे सांगता येईल. माडिया गोंड आदिवासीमध्ये गोटूलची प्रथा आहे. या ठिकाणी तरूण-तरूणी एकत्र येतात, त्यातूनच त्यांचा परिचय होऊन लग्न जमते, हे गोटूल म्हणजे आदिवासी संस्कृतीची उगमस्थाने आहेत.

**४) देव्हारा :**

आदिवासी लोक घरामध्ये एका कोपऱ्यात देवासाठी जागा सोडतात, तेथे पांढऱ्या मातीने सारवले जाते. त्यावर सूर्य, नदी अशी आदिवासी ज्यांची पूजा करतात त्यांची चित्रे काढली जातात. घर व अंगण शेणाने सारवले जाते. देव्हारा उंचावर असतो. देव एकत्र ठेवण्यासाठी एक परडी असते. देवाच्या पूजेसाठी हळद-कुंकू, अगरबत्ती, फुले यांचा वापर करतात. सूर्य, नद्या, डोंगर, विंचू, साप यांची पूजा आदिवासी करतात.

**५) पोषाख :**

आदिवासी जमातींचा पोशाख साधा सोपा असतो. आहाराप्रमाणेच आदिवासी जमातीमध्ये पोशाखामध्येही थोड्या फार फरकांनी फरक पडलेला दिसून येतो. आदिवासी पुरूष गुडघ्यापर्यत धोतर, लंगोटी घालतात तर अंगात सदरा, कोपरी घालतात, तर स्त्रिया या लुगडी, चोळी घालतात. काही जमातीमध्ये स्त्रिया डोक्यावरून पदर घेतात तर काही



Scanned with CamScanner

जमातीमध्ये घेत नाहीत. माडिया गोंड या जमातीच्या स्त्रिया जाड्या-भरड्या पांढऱ्या रंगाच्या लाल किनार असणाऱ्या साड्या गुडघ्यापर्यंत गुंडाळतात, तर भिल्ल व कोकणा स्त्रिया कमरेला एक व डोक्यावर एक असे नऊवारी लुगड्याचे दोन तुकडे घालतात. आजच्या परिस्थितीचा आदिवासी पोशाखांवर परिणाम झाल्याचे लक्षात येते. आदिवासी समाजामध्ये जमातीनुसार पोशाखात भिन्नता असल्याचे दिसून येते.

**६) अलंकार :**

समाजातील इतर स्त्रियांप्रमाणेच आदिवासी स्त्रियांना देखील अलंकारांची आवड आहे. आदिवासी स्त्रिया या कानात कथल्याच्या किंवा चांदीच्या बाळ्या घालतात, नाकात नथ घालतात, गळ्यात हसली घालतात तर पायामध्ये गोल कडे असते. याप्रमाणेच बाजारामध्ये मिळणारे दागदागिने, मण्यांच्या माळा, काचेचे दागिने, विविध रंगाची फुले, बिया यापासून तयार केलेली दाग-दागिनेही त्या वापरतात. माडिया गोंड या जमातीच्या स्त्रिया कमरेला कंबरपट्टा वापरतात. मनगट्या, पैंजण, जोडवे असे अलंकार त्या वापरतात. निसर्गात असणाऱ्या, मिळणाऱ्या विविध रंगबेरंगी माळा, फुले यांचा वापरही या स्त्रिया नटण्यासाठी करतात. आपल्या सौदर्यात भर पडावी म्हणून आदिवासी स्त्रिया वेगवेगळ्या प्रकारचे दागिने वापरतात.

**७) सणवार व उत्सव :**

आदिवासी जमातीचे मुख्य सण म्हणजे दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत, शिमगा हे होय. होळी हा सण आदिवासी लोक फार उत्साहाने साजरा करतात. होळी या सणाची तर आदिवासी वाट बघतच असतात. सणाच्या वेळी रंगबेरंगी नवे कपडे, दागदागिने घालून हे स्त्री-पुरूष नृत्यासाठी तयारच असतात. लेझीम, नृत्य, टिपऱ्या अशा प्रकारे वेगवेगळे समूह नृत्य करून आदिवासी सण मोठ्या आनंदाने साजरे करतात. आदिवासी समाजामध्ये छोट्या छोट्या गावांमध्ये वेगवेगळ्या देवांच्या नावाने यात्रा भरवल्या जातात. त्यामध्ये सर्व गावकरी समूहाने यात्रेचा आनंद घेतात.

**८) वस्ती व घरे :**

आदिवासी जमातीमध्ये प्रामुख्याने घरे ही कुडांची, कौलारू, कारवीची असलेली दिसतात. आदिवासी समाज हा प्रामुख्याने डोंगराळ भागात राहत असल्यामुळे त्यांची घरे पक्की असतात. आदिवासीचे जीवन हे स्थिर नसते, त्यांची घरे व वस्त्या या तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात. घरातही फारसे सामान नसते. अगदी जरूरीइतकेच सामान वस्तू



Scanned with CamScanner

त्यांच्या घरात असतात. दहा-बारा झोपड्यांच्या वस्तीला पाडा म्हणतात तर असे दहा-वीस पाडे मिळून एक खेडे तयार होते. पाड्यांना प्राण्याचे नाव, वनस्पतीचे नाव दिले जाते. उदा. आंबे पाडा, बोरी पाडा इत्यादी.

आदिवासींची ही गावे गटागटाने व एकाच जमातीची असतात. आदिवासींच्या घरात मातीची भांडी असतात. त्यांना कणकुली म्हणतात. घराच्या भिंती या बांबूच्या, लाकडांच्या बनलेल्या असतात. त्यावर गवताचे छप्पर असते, घरात जनावरे असतील तर त्यांची सोय घराच्या एका बाजूला केलेली असते. आदिवासी हे नेहमी आजारी पडायला लागले किंवा त्यांची गुरेढोरे आजारी पडायला लागली की, ते राहते गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी राहायला जातात. असे पूर्वीपासून चालत आलेले आहे. पण आजच्या काळात आदिवासी समाजाच्या वस्त्या, घरे यांच्यात बऱ्याच प्रमाणात बदल झालेला आढळतो. अशा बऱ्याच आदिवासी जमाती आहेत ज्या एका ठिकाणी स्थायिक झालेल्या आहेत.

**९) विशिष्ट वंश :**

प्रत्येक आदिवासी जमात ही विशिष्ट वंशाची असते. एका भू-भागावर राहणाऱ्या अनेक जमाती या एका वंशाच्या असू शकतात, तर कधी एका भू-भागावर अनेक वंशाच्या जमातीसुध्दा राहतात.

**१०) कला :**

आदिवासी लोक हे कलात्मक पध्दतीने जीवन जगत असतात. आदिवासी लोकांच्या कला या धर्म, जादू यांच्याशी निगडित असतात. उपयुक्त वस्तूंना कलात्मक रूप देण्याची प्रवृत्ती आदिवासींमध्ये आढळते. होडी, वाद्ये, मुखवटे, मातीची, लाकडांची भांडी, दागिने इत्यादीमधून त्यांच्या कलेचे दर्शन घडते. अशा प्रकारे आदिवासी लोक अत्यंत खडतर व कष्टाचे जीवन जगतात. या कलेचा त्यांना आर्थिक लाभ मिळतो म्हणून त्यांना त्यांचा उदरनिर्वाह करता येतो.

**११) आहार :**

आदिवासी जमातीच्या आहारामध्ये वेगळेपण आढळून येते. आदिवासींचा शहराशी संपर्क येत नाही. शहरांत अगदीच कमी प्रमाणात ते राहतात. याबरोबरच आदिवासी लोकांच्या गरजाही अगदी मर्यादित आहेत. त्यांना मिळणारे उत्पन्न हे कमीच आहे. त्यांना दोन वेळेला पुरेल एवढेच त्यांना मिळते. त्यामुळे ते त्यांची उपजीविका रानावनांत मिळालेले



Scanned with CamScanner

कंदमुळे, फळे यावरच भागवतात. आदिवासी लोक एकंदरीत खूपच कष्टाचे व खडतर जीवन जगतात. त्यांच्या गरजा एवढ्या मर्यादित असूनही त्या पूर्ण करण्यासाठी त्यांना भटकंती करावी लागते. आदिवासी जमातीमध्ये प्रत्येक जमातीमध्ये त्यांच्या आहारामध्ये थोड्या फार प्रमाणात फरक जाणवतो. काही जमाती या मासे, शिकार करणे यावर अवलंबून असतात. तर काही जमातीमध्ये ज्वारी, नागली, भात, दाळ हा आहार घेतात. मटन, मासे, अंडीही आदिवासी खातात. मोहाची दारू पिणे तर त्यांना अधिकच आवडते.

Scanned with CamScanner

## १.३ आदिवासी साहित्य

मराठी साहित्यात १९६० नंतर वेगवेगळे वाङ्‌मयीन प्रवाह आले. त्यापूर्वी दोन-तीन दशके जडणघडणीत गेली असे म्हणता येईल. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी या साहित्यप्रवाहांनी मराठी साहित्यात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. परंतु ग्रामीण, दलित, स्त्रीवादी या साहित्याएवढी व्यापकता आदिवासी साहित्याला निर्माण करता आली नाही. कारण आदिवासी लेखक, कवी निर्माण होण्यास वेळ लागला. आदिवासींनी कविता लेखनाने साहित्य चळवळीची सुरूवात केली. त्या अगोदर काही आदिवासी मराठी साहित्यिकांनी आदिवासी जीवनावर साहित्य निर्माण केले होते; त्यात श्री.व्यं.केतकर, वि.वा.हडप, प.त्रि.सहस्रबुध्दे, व्दा.भ.कर्णिक, दुर्गा भागवत, गो.नी.दांडेकर, अनिल सहस्रबुध्दे आदी लेखकांचा उल्लेख येतो. आज आदिवासी साहित्याचे दालन समृध्द होत आहे. कवितेच्या विश्वात भुजंग मेश्राम, विनायक तुमराम, वाहरू सोनवणे, उषा किरण आत्राम, माधव सरकुंडे, कुसुम अत्राम, कृष्णकुमार चांदेकर, वामन शेळमाके, वसंत कनाके, सुनील कुमरे, प्रभू राजगडकर,बाबाराव मडावी, गोपाळ गवारी, चामूलाल राठवा, रवी कुरसंगे, पुरूषोत्तम शेडमाके, वाल्मीक शेडमाके, संघजा मेश्राम, जनार्दन बेशटकर, विश्राम वळवी, सुभाष आडे, रत्ना गोटले, पोरेश्वर वेदाम, कुसुम बोंबले व विनोद कुमरे यांनी आदिवासी काव्याचा प्रवाह व्यापक केला आहे.

आदिवासी समाजातील माणसाचे जीवन, त्यांचे दुःख, वेदना हा साहित्याचा विषय होऊ शकतो. नागरी समाजापासून अलिप्त असणाऱ्या आदिवासींनाही साहित्य आहे? या प्रश्नांची दखल पहिल्या आदिवासी संमलेनाने या समाजातील प्रस्थापितांना घ्यायला लावली. आणि 'आदिवासी साहित्य' हे नाव हळूहळू मराठी साहित्यात उदयास येऊ लागले. हे साहित्य ज्यांचे आहे तो भल्यामोठ्या स्वरूपाचा मानवी समूह प्राचीन काळापासून निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गातील फळे, फुले, कंदमुळे, भाज्या खाऊन वेळप्रसंगी शिकार करून मासेमारी करून अर्धनग्न अवस्थेत आपले जीवन जगतो आहे. आदिवासी जीवनाची माहिती आदिवासी साहित्यातून सर्वांसमोर आली आहे. कोणत्याही समाज व्यवस्थेतील समाज प्रगत असो की, अप्रगत असो किंवा आदिम असो. त्यात 'साहित्य' हा घटक आलेला आपणास दिसून येतो. साहित्य हा मानवी संस्कृतीचा एक अविभाज्य घटक असतो.

आदिवासी साहित्यामध्ये अनेक विशेष आहेत. आदिवासींच्या परंपरा, चालीरीती, धार्मिक, देवदेवतांच्या कल्पना, अंधश्रध्दा, सावकार, भ्रष्ट शासकीय अधिकारी यांच्या



Scanned with CamScanner

जाळ्यात आदिवासी सापडल्यामुळे त्यांची प्रगती थांबली, तरीसुध्दा त्यांची जगण्याची सततची धडपड चालूच आहे. आदिवासी साहित्य संस्कृतीची एक विशेष बाब म्हणजे नृत्य आणि गाणी यांची आवड जन्मल्यापासून मरेपर्यंत प्रत्येक आदिवासी स्त्री-पुरूषांमध्ये असते. वारली लोकगीत, शिमगा नाच, ढोल-नृत्य, बोहाडा नृत्य, तारपा नृत्य, ठाकर नाच असे नृत्य प्रकार विशेष आहेत. आदिवासींच्या विविध भाषा अर्थातच त्यांच्या जमातीनुसार वेगवेगळ्या बोलीभाषा आहेत. हे एक आदिवासी साहित्याचे विशेष आहे.

आदिवासी समाजामध्ये जीवनाकडे बघण्याचा साधा सरळ दृष्टिकोन, भावभावना, आशा-आकांक्षा, श्रध्दा-अंधश्रध्दा, समज-गैरसमज, रूढी, परंपरा, निसर्ग यांचे प्रतिबिंब कलेचे विशेष आहेत. आदिवासी नृत्याच्या वेळी रंगीबेरंगी फुलांनी विशेष सजविले जाते. त्यावेळी मोहाची दारू घेतली जाते, पण सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. सर्व स्त्रिया-पुरूष एकत्र नाचतात, ढोल वाजविला जातो. आदिवासी कलावंत त्याची कल्पनाशक्ती, निर्मळ स्वच्छ मनाचा आविष्कार यातून आजही साहित्य परंपरा, विवाह-प्रसंगाची गीते, प्रणयगीते, शिकारीच्या वेळेची गीते, अंगाईगीते, लोककथा, देवतांच्या कथा, प्राणीकथा, शौर्यकथा, म्हणी, उखाणे, नक्षीदार कोरीव काम इत्यादी विशेष आहेत.

### ***१.३.१ आदिवासी जीवन अभ्यासाला मर्यादा***

आदिवासी समाजातील बहुतेक जमाती जंगलांत राहत असल्यामुळे आदिवासी जीवन अभ्यासाला अनेक मर्यादा निर्माण पडतात.

**१) बोलीभाषा :**

आदिवासी जीवनाचा अभ्यास करताना सर्वात मोठी अडचण निर्माण होते ती बोलीभाषेची. आदिवासी जमातींची वेगवेगळी बोलीभाषा असल्यामुळे त्यांच्याशी संवाद साधणे अवघड होते. त्यांची बोलीभाषा समजत नसल्यामुळे त्यांच्या जीवनाची माहिती मिळवणे कठीण जाते. काही आदिवासी जमातींना मराठी बोलता येत नाही म्हणून ते आपल्या सोबत विचारांची देवाणघेवाण करू शकत नाहीत. त्यामुळे आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यामध्ये अडचण निर्माण होते.

**२) अबोल वृत्ती / उदासीनता :**

आदिवासी जमातींमध्ये शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांच्यामध्ये उदासीनता निर्माण होते. त्यामुळे आदिवासी लोक अभ्यासकांशी संवाद साधत नाहीत. शिक्षणाचे महत्त्व माहिती



Scanned with CamScanner

नसल्यामुळे ते अभ्यासकांना हवा तेवढा प्रतिसाद देत नाहीत. आदिवासी समाजामध्ये जास्त प्रमाणात अबोल वृत्तीचे लोक आढळतात. ते काही बोलतच नसल्यामुळे त्यांच्या जीवनाची कथा आपल्यापर्यन्त पोहचतच नाही. त्यामुळे आदिवासी जीवन अभ्यासाला मर्यादा निर्माण होते.

**३) वास्तव्य :**

आदिवासी जमाती डोंगर, दऱ्यांत राहतात. त्यामुळे त्यांच्यापर्यन्त पोहचणे सहसा शक्य होत नाही. त्यांच्यापर्यत जाणे शक्य होत नसल्यामुळे त्यांच्या जीवनाची माहिती मिळवणे अवघड जाते.

**४) दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा :**

आदिवासी जमाती दऱ्या-खोऱ्यांत राहत असल्यामुळे त्यांना दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ते जेथे राहतात तेथपर्यत पोहचणे कठीण होते. तेथे पोहचता न आल्यामुळे त्यांच्या जीवनाची माहिती घेता येत नाही.

**५) सुविधांचा अभाव :**

आदिवासी जमाती ज्या भागामध्ये राहतात त्या भागामध्ये वेगवेगळ्या साधनांचा अभाव असतो. जर एखादा अभ्यासक माहिती रेकॉर्ड करण्यासाठी विजेवरच्या साधनांचा वापर करणार असेल तर त्याला तो वापर करता येईलच असे नाही कारण त्या भागामध्ये वीज पुरवठा असेलच असे नाही..अशा अनेक कारणांमुळे आदिवासी जीवन अभ्यासाला मर्यादा निर्माण होते.

**६) अपुरे साहित्य :**

आदिवासी समाजाबद्दल माहिती मिळत नसल्यामुळे आदिवासी समाजावर जास्त प्रमाणात साहित्य निर्माण झालेले नाही. आदिवासी समाजातील लोक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असल्यामुळे जास्त प्रमाणात आदिवासी साहित्य निर्माण झाले नसल्याचे आढळते. म्हणून आदिवासी जीवनाची आवश्यक तेवढी माहिती मिळत नाही. पण सध्या आदिवासी साहित्यामध्ये वाढ होत असल्याचे दिसते.



Scanned with CamScanner

## १.४ आदिवासी जनसमूहांचे स्वरूप

मूलनिवासी किंवा भूमिपुत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी समाजाचे वास्तव्य हे प्रगत समाजापेक्षा भिन्न भू-भागावर असल्यामुळेच त्यांचे सामाजिक जीवन इतरांपेक्षा वेगळे आहे. आदिवासी जनसमूहांचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये अभ्यासावी लागतील.

**१) सामान्य भू-प्रदेश :**

मानवी समाजाच्या निश्चित लक्षणांपैकी एक महत्त्वपूर्ण लक्षण म्हणजे निश्चित भू-प्रदेश होय. आदिवासी समाज हा देखील एक प्राचीन मानवी समाज असून तोही एका सामान्य भू-प्रदेशावर वास्तव्य करीत असतो. आदिवासी समाजाबाबतची वैशिष्ट्ये म्हणजे हा समाज बहुतेक करून डोंगराळ प्रदेशात विसावलेला असतो. डोंगरदऱ्यांच्या आश्रयाने जीवन जगणारा आदिवासी समाज म्हणूनच 'वनवासी' वा 'गिरिजन' नावाने ओळखला जातो. पांढरपेशीय समाजाच्या संपर्कापासून अलिप्त असणाऱ्या आदिवासी भू-भागावर बहुतांशी दळणवळणाच्या साधनांचा अभाव असतो. प्रतिकूल भू-प्रदेशाच्या प्रभावामुळे आदिवासी समाजास जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठाही वेळेवर होत नाही. सातपुड्याच्या आदिवासींना मतदानाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मतदान साहित्याची ने आण करण्यासाठी बहुतेक ठिकाणी खेचरांची मदत घ्यावी लागते. गुजरातच्या डांग जिल्ह्यातील आदिवासी, महाराष्ट्राच्या सहयाद्री व सातपुडयातील महादेव कोळी आणि भिल्ल, गडचिरोली जिल्ह्यातील 'माडिया', अमरावती जिल्ह्यातील 'कोरकू', नंदुरबार जिल्ह्यातील 'पावरा भिल्ल' व ठाणे जिल्ह्यातील 'वारली' आदिवासी हे एका सामान्य भू-प्रदेशावर विसावलेले दिसतात.

**२) सामान्य संस्कृती :**

प्रत्येक आदिवासी समाजाची एक सामान्य संस्कृती विकसित झालेली असते, यात आदिवासी समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, ज्ञान, श्रध्दा, मूल्ये व निषेध नियमनांचा समावेश होतो. याशिवाय भौतिक संस्कृतीचा एक भाग म्हणून आदिवासींची घरे-दारे, शस्त्र-अस्त्रे, भांडी-कुंडी व घरांच्या रचनेतही एक समानता आढळून येते. विविध आदिवासी व्यक्तींच्या केशभूषा व वेशभूषेवरून आपणास याची ओळख होते. आदिवासी स्त्री-पुरूषांच्या अंगावरील दागिनेही हे संस्कृतीच्या प्रभावानेच अंगीकृत झालेले असतात. गोफण वा तिरकामठ्याने



Scanned with CamScanner

प्राण्यांची शिकार करणे, विविध धार्मिक प्रसंगी बोकडाचा बळी देणे. या सर्व बाबी आदिवासींच्या आचरणाचा एक भाग म्हणून स्वीकारल्या जातात. सांस्कृतिक अंगाने नगर वा ग्राम समुदायापेक्षा आदिवासी समाजात खूपच भिन्नत्व दिसून येते. म्हणूनच बहुतेक आदिवासी समाजात मातृसत्ताक कुंटुंब व विवाह प्रसंगी वराकडून वधूस मूल्य देण्याची प्रथा दिसून येते.

**३) साधी अर्थव्यवस्था :**

यंत्र तंत्राचा अभाव असलेली आदिवासींची अर्थव्यवस्थाही भविष्याधारित नसून वर्तमानकालीन गरजपूर्तीवर आधारलेली दिसते. केवळ उदरनिर्वाहासाठी शिकार करणे, कंदमुळे फळे गोळा करणे व स्थानांतरित शेती कसण्याचे कार्य आदिवासी समाज करतो. डोंगराळ भागात बागायती शेतीचा अभाव असतो. दळणवळणाच्या साधनांच्या अभावामुळे अशा प्रदेशात उद्योग-धंदे उभारले जात नाहीत, म्हणून आदिवासी व्यक्तीस वर्षातील बराच काळ बेरोजगार राहावे लागते. स्वाभाविक त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी त्यास सावकारी कर्ज काढावे लागते वा रोजगाराच्या शोधासाठी शेजारील प्रदेशात स्थलांतर करावे लागते. आदिवासींची शेती ही परंपरागत पध्दतीने होत असल्यामुळे शेतातून मिळणारे उत्पन्नही अत्यल्प असते. शिवाय निरक्षर आदिवासी वेठबिगार मजूर म्हणून राबत असल्यामुळे त्यांच्या जीवनात नफा वा संचय दिसून येत नाही.

**४) भाषिक मर्यादा व लिपीचा अभाव :**

आदिवासी समाज हा प्रामुख्याने निरक्षर समाज म्हणून ओळखला जातो. अक्षरांचा अभाव असल्यामुळे आदिवासी भाषेची स्वतंत्र लिपी विकसित होऊ शकली नाही. असे असले तरी प्रत्येक आदिवासी जमातीची एक स्वतंत्र बोलीभाषा दिसून येते. भारतातील आदिवासीत जवळपास ४३० प्रकारच्या भाषा आढळून येतात. आदिवासी समुदायाच्या नावावरून भाषेला नाव प्राप्त होते. जसे गोंडी, भिलोरी, डांगी व पावरी यांशिवाय आदिवासी समाज ज्या भू-प्रदेशाच्या किंवा समाजाच्या सतत संपर्कात येतो. त्या समाजाची भाषिक वैशिष्ट्ये आदिवासींच्या भाषेत आहिराणी भाषेचा, पावरी बोलीभाषेवर हिंदी भाषेचा, कोकणी बोलीभाषेवर मराठी भाषेचा तर मावची बोली भाषेवर गुजराती भाषेचा प्रभाव दिसून येतो.



Scanned with CamScanner

**५) समान धर्म :**

आदिवासी समाज हा निसर्गपूजक असतो. वृक्ष, वेली, नद्या-नाले व डोंगर दऱ्यात देवाचा वास असतो, तेच आपल्यावर नियंत्रण ठेवतात अशी सर्व आदिमांची श्रध्दा असते. निसर्गात घडणाऱ्या घटनांच्या संदर्भात कार्यकारण भाव लावण्यास आदिवासी समाजाला मर्यादा आल्यामुळे त्याने नैसर्गिक घटकांना देवत्व बहाल केले आणि त्यातूनच समस्त आदिवासी समाज निसर्गपूजक म्हणून ओळखला जाऊ लागला. दैनंदिन जीवन जगताना आदिवासी समाज अनेक धार्मिक क्रिया व विधींची पूर्तता करतो. वृक्षपूजा, बांधपूजा, खेतपूजा, शिवारपूजासारख्या विधीसमयी बोकडाचा बळी देणे किंवा गावावर अरिष्ठ आल्यावर होलिकादेवीला नवस बोलण्याची प्रथा सर्व आदिम समाजात दिसून येत असल्यामुळे हा समाज एकजिनसी दिसून येतो.

**६) जमात प्रमुख :**

आदिवासी समाजात 'जमात प्रमुखाला' खूप महत्त्वपूर्ण स्थान असते. संपूर्ण समुदायाचा, गटाचा किंवा वस्तीचा तो नेता असल्यामुळे समाजात त्याचा दर्जा मोठा वा उच्च स्वरूपाचा असतो. ग्रामीण भागातील सरपंचास जेवढे महत्त्व गावात असते तेवढेच महत्त्व जमात प्रमुखास आदिवासी जमातीत असते. आदिवासी जमातीचा प्रमुख हा शक्यतोवर ज्येष्ठ नागरिक दर्जाचा अर्थात वयस्कर,धाडसी किंवा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा व्यावहारिक ज्ञानात पारंगत असावा लागतो. जमातीच्या प्रमुख हा बहुधा इतर कुटुंबापेक्षा धनाढ्य असतो. दु:खद प्रसंगी इतरांना मदत करणे हे जमात प्रमुखाचे आद्य कर्तव्य मानले जाते. जमातीच्या सदस्यांचे संरक्षण करणे, न्यायदान करणे, गुन्हेगाराला शिक्षा आणि योग्य कामाला बक्षीस देणारा जमात प्रमुख समुदायाच्या सर्व प्रसंगांत प्रभावी नेता म्हणून वावरतो. म्हणून त्यास 'नाईक', 'कारभारी', 'पाटील' अशा विविध नावांनी ओळखले जाते.

**७) जमात पंचायत :**

राजकीय संघटनाचा एक अविभाज्य भाग म्हणून प्रत्येक आदिवासी जमातीत 'जमात पंचायत' कार्यरत असते. किमान पाच व कमाल सात सदस्य एकत्र येऊन जमात पंचायतीचे कार्ये चालत असते. वयोवृध्द व अनुभवी लोकांचा समावेश यात होत असतो. समूहातील सभासदांना सुरक्षा बहाल करणे, अन्यायी व्यक्तीला न्याय मिळवून देणे, दोषी व्यक्तील शासन वा दंड करणे, गैर सामाजिक कृत्य करणाऱ्या व्यक्ती वा कुटुंबास समाज बहिष्कृत



Scanned with CamScanner

करणे व सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्ये सुरळीतपणे पार पाडणे ही प्रमुख कार्ये जमात पंचायतीच्या उपस्थितीत होतात. यात श्रीमंत किंवा प्रभावी व्यक्ती जमातीचा प्रमुख तर पोलिस पाटील, प्रतिष्ठित लोक (पंच) शक्यतोवर गाव भक्ताचा समावेश असतो.

**८) कुल संघटन :**

कुल संघटन हे आदिवासी समाजाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाते. एका कुळात अनेक कुटुंबाचा समावेश होत असतो. एका सामान्य काल्पनिक पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या कुटुंबाचा समावेश एका कुळात होतो. समान कुळाच्या व्यक्ती या रक्तसंबंधीय मानल्या जात असल्यामुळे परस्परांत विवाह होत नसतो. प्रत्येक कलाचे एक कुलचिन्ह किंवा प्रतीक निश्चित केलेले असते. कुल चिन्हांचा आदिवासी समाजात नेहमी आदर केला जातो. कुलप्रतीकाची स्थापना बहुधा सर्व कुटुंबात केलेली असते. एकाच कुळाच्या व्यक्ती परस्परांना सहकार्य करतात. अयोग्य, अनिष्ट व अपवित्र घटना व क्रियांपासून कुल सदस्यांत एकात्मता टिकून राहते. प्रत्येक जमातीत वेगवेगळ्या कुल कुटुंबाचा समावेश होतो. संथाल जमातीत जवळपास शंभर तर भिल्ल जमातीत सत्तर कुलांचा समावेश असल्याचे दिसून येते.

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण 'गाव तेथे शाळा', 'खडू फळा मोहीम', 'वनवासी कल्याण कार्यक्रम' अशा शासकीय योजना आणि दळणवळणाच्या साधनांचा विकास, प्रसार माध्यमांचा प्रभाव, सांस्कृतिकरण, औद्योगिकीकरण, वनौषधी वनस्पतीचे वाढलेले बाजारमूल्य अशा विविध कारकांच्या प्रभावामुळे आदिवासी समाजाचा बाह्य जगताशी संपर्क वाढल्यामुळे विसाव्या शतकाचा उत्तरार्धातील आदिवासी समाज विकासाच्या दिशेने झेपावत असल्याचे मत डॉ.गोविंद गारे यांनी व्यक्त केले आहे.



Scanned with CamScanner

## १.५ आदिवासी संस्कृती

आदिवासी समाज हा निसर्गपूजक असल्यामुळे आदिवासी संस्कृतीमध्ये निसर्ग जास्त प्रमाणात येतो. पारंपरिक पध्दतीने जीवन जगण्यास आदिवासींनी जीवनावर निसर्गाची सोबत ठेवली आहे. आदिवासींच्या जीवनावर निसर्गाचा ठसा उमटला आहे. आदिवासी माणसाचे निसर्गावर अतूट प्रेम आहे. ही आपलेपणाची भावना त्यांच्यात रूजली आहे; म्हणून निसर्ग, दऱ्या-खोऱ्यांत आदिवासी स्वत:ला सुरक्षित समजतो. त्यामुळे आदिवासींना आपली संस्कृती, वैशिष्ट्ये वेगळी ठेवता आली. आदिवासी लोकांची एक वेगळी प्राचीन संस्कृती आहे. डॉ. इरावती कर्वे यांनी संस्कृतीच्या संदर्भात म्हटले आहे, "मनुष्याचे बाल्य फक्त शरीर विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते असे नव्हे तर वरच्या पिढीच्या ज्ञानाचा लाभ त्याला या दशेत होत असतो. वरील पिढीच्या अविरत सान्निध्याने पुढच्या आयुष्यातील सर्व क्रियांना वळण लागते. दोन पिढ्यांचे साहचर्य व त्यात एकीकडून दुसरीला ज्ञान संक्रमण ही क्रिया सर्व मानवी संस्कृतीचा पाया आहे." कोणत्याही राष्ट्रामध्ये लोकांच्या वसाहतीचे कालानुक्रमे अनेक स्तर असलेले दिसून येतात. बाहेरून येणारे समाज आधीच्या स्थायी झ ालेल्या समाजापेक्षा सुधारलेला असतो. तेव्हा त्यांच्या पुढे आदिम समाज मागे पडतो. आदिम समाज हा समाजापासून दूरवर रानावनात राहतो व आपले जुने-विचार रुढी, परंपरा, संस्कृती टिकवून ठेवतो.

आदिवासी आणि निसर्ग यांचा जवळचा संबंध आहे. निसर्ग हा त्यांचा देव आहे. त्यांची संस्कृती ही त्यांच्या आनंदाचा स्रोत आहे. आदिवासी समाज हा निरक्षर असलेला दिसेल, पण तो असंस्कृत नाही. त्यांची स्वत:ची बोली, संस्कृती, रूढी, प्रथा, परंपरा, रीतिरिवाज, दैवते, धर्मविधी, सणसमारंभ वेगळे आहेत.

आदिवासी जमातींना नागर संस्कृतीचा संपर्क न झाल्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण चालिरीती जपणारी संस्कृती आदिवासींमध्ये आढळते. आदिवासी संस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये निसर्गाचा फार मोठा वाटा आहे. पारंपरिक पध्दतीने जीवन जगण्यास निसर्गाने आदिवासींची संगत केली. आदिवासींच्या धार्मिक रूढी या निसर्ग पूजेतून निर्माण झालेल्या आहेत. निसर्गात जे जे गूढ, अनाकलनीय आहे, ते ते सर्व पूजनीय असे आदिवासी मानतात. आकाश, वीज, सूर्य, चंद्र, ढग, झाडे, सिंह, साप, विंचू अशा नैसर्गिक प्राण्यांची ते पूजा करतात. डोंगरदेव, गावदेव, हिरवा चित्ता, कणसारी यांची देव-देवता म्हणून भगत, मांत्रिक यांच्यावर विश्वास ठेवतात. आदिवासी हे निसर्गाच्या सान्निध्यात राहतात त्यामुळे



Scanned with CamScanner

त्यांच्या जीवनावर सभोवतालच्या वातावरणाचा ठसा उमटलेला दिसतो. या परिस्थितीत त्यांनी त्यांची संस्कृती सोडली नाही तर दिवसेंदिवस ते त्यांच्या संस्कृतीचे जतन करत आहेत. नैसर्गिक घटनांशी सतत तडजोड करून हीच त्यांची जीवन पध्दती व संस्कृती आहे. त्यांचे जीवन अतिशय खडतर व निरस आहे. द्रारिद्र्याने त्यांच्या जीवनाला संघर्षाचे स्वरूप आलेले आहे आणि त्यांचा स्वभाव घडविला आहे. तो जंगल, नदी, डोंगर-दऱ्यांनी निसर्गाच्या आणि वास्तव्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे आदिवासींची संस्कृती हजारो वर्षांपासून जपण्यास मदत झाली. आदिवासी समाज डोंगर-दऱ्या, नद्यांची खोरी, जंगल अशा वातावरणात राहतो. डोंगरांचा, नदी-नाल्यांचा, जंगलांचा, पशू-पक्षी, शेती, सण-समारंभ, नृत्य, नाचगाणी, बाजार, लग्नविधी, अंत्यविधी, यात्रा, जातपंचायत या सर्वाचा संस्कृतीमध्ये समावेश होतो.

रूढी-परंपरा,सण-उत्सव,अंधश्रध्दा,निसर्गपूजा,पितृपूजा,कुलदैवत,कलाविष्कार,घरबांधणी, लग्नातील पध्दती यामध्ये आदिवासींची संस्कृती दडलेली आहे. बांबूपासून वेगवेगळी वाद्ये, दुरड्या, डालगे, मुखवटे, लग्नखांब, लाकडावरील कोरीव काम, दैनंदिन वापरातील आकर्षक वस्तू बनविणे यामध्ये त्यांची संस्कृती आढळून येते.

## नृत्य संस्कृती :

आदिवासी जमातीमध्ये नृत्य तीन प्रकारची आहेत. जीवनातील आनंद साजरा करण्यासाठी,दुःख,नैराश्य घालविण्यासाठी,मन प्रफुल्लित करण्यासाठी जोशपूर्ण नृत्य आदिवासी मध्ये आढळून येतात.

## वीर नृत्य :

ही नृत्ये नेहमीच आक्रमणाच्या छायेत वास्तव्य करणाऱ्या आदिवासी जमातीमध्ये सादर केली जातात. यामध्ये नागा, खासी, मिझो या जमाती येतात. त्यांच्या नृत्यांमध्ये नर्तक मृत व्यक्तीस आदरांजली वाहतात. नृत्यांमध्ये तालबध्द हालचाली असतात आणि त्या हालचाली ठराविक पध्दतीनेच केल्या जातात. नृत्य करताना स्त्रियांच्या नजरा खाली असतात, तर पुरूष आरडाओरडा करीत उड्या मारत नृत्य करतात. या नृत्यांमध्ये खासी जमातीचे आदिवासी ढोल, पावा, पाईप ही वाद्ये वापरतात.



Scanned with CamScanner

महाराष्ट्रामध्ये माडिया, भिल्ल, ठाकर या जमातींमध्ये वीर-नृत्य, शिकार नृत्य सादर केली जातात. यामध्ये शिकार करतानाचे धाडस, बेधुंदता, आनंद या नृत्यामधून उभा केला जातो.

## धार्मिक नृत्य :

हा नृत्य प्रकार धार्मिक प्रसंगात साजरा केला जातो. या मागे भूतबाधा, देवीचा कोप, जादूटोणा होऊ नये हा हेतू असतो. हे नृत्य देवाच्या मूर्तीभोवती, एखाद्या झ ाडाभोवती, देवासाठी बळी देण्यासाठी ठरविलेल्या बकऱ्याभोवती केले जाते. शेतामध्ये चांगले पीक यावे, पाऊस पडावा म्हणूनही नृत्ये केली जातात. ठराविक जागेवरती नृत्य केल्यावर मनोकामना पूर्ण होते. सणानिमित्त केलेले नृत्य हे धार्मिक नृत्याचाच एक भाग आहे. लग्न, समारंभांतील नृत्य, बारशाचे नृत्य हाही धार्मिक नृत्याचा एक भाग आहे. डोंगरदेव, देवखळे, अद्‌भुतशक्ती पूजा, डिंडण नृत्य, भिवसन पूजा व गाव बाधण्याच्या पूजाप्रसंगी नृत्य सादर केले जाते. ही सर्व धार्मिक नृत्ये आहेत.

## आदिवासी कलासंस्कृती :

लाकडावरील कोरीव काम, भिंतीवरील चित्रकला, दागिने बनविण्याची कला, धातूच्या आणि देवदेवतांच्या कोरीव मूर्ती, बांबूपासून दैनंदिन उपयोगात येणाऱ्या वस्तूंची कलात्मक निर्मिती, शिकारीसाठी लागणारे वाघूर, जाळे व हत्यारे आदिवासी आपल्या हातानेच तयार करतात. दंडार नृत्यामधील ढोल हाताने बनविलेला असतो. त्या ढोलास मांदोळ म्हणतात. शहनाई, तिळबुळी, ढोलकी, संबळ, डफ, तुणतुणे इत्यादी वाद्ये तयार करतात.

मूर्तिकलेमध्ये दगडाची मूर्ती, मंदिर, स्मारक, प्राण्याची प्रतिकृती, हुतात्मा वीरांचे चित्र दगड कोरून तयार करणे. त्यामध्ये सूर्य उगवत असल्याचे वीराच्या दोन्ही बाजूस कमळ कोरलेले, घोडा, अश्वारूढ वीर, तलवारीचा हात उभारलेला, घोडा दौडत असल्याचा प्रसंग इत्यादी कोरीव काम आदिवासी संस्कृतीमध्ये दिसून येते. धातूंच्या मूर्ती, लाकडावर कोरून तयार केलेली मूर्ती यामध्ये साती आसरा, म्हसोबा, मरीआई, पोचीमाय, बहिरोबा, महादेवाची पिंड, नंदी, सटवाई, अप्पादेव इत्यादी देवदेवतांच्या मूर्ती लाकडांवर कोरीव नक्षीकाम करून तयार केलेल्या आहेत. हे कोरीव काम आदिवासी संस्कृतीमध्ये प्राचीन काळापासून दिसून येते. शरीरावर गोंदण्याची परंपरा आदिवासी स्त्री-पुरूषांमध्ये आजही



Scanned with CamScanner

आढळून येते. यात्रा, बाजारपेठ येथे गोंदणारी माणसे उपलब्ध असतात. हातावर, दंडावर, कपाळावर इत्यादी ठिकाणी गोंदवून घेतले जाते. हे गोंदवून सुईने, काट्याने आणि आता यंत्राच्या साह्याने केले जाते. माणसाच्या अवयवांनुसार गोंदवनाचे प्रकार असतात. गोंदवणे हे पारंपरिक पध्दतीने आतापर्यंत चालू आहे. तो आता संस्कृतीचा एक भाग बनला आहे.

अशा प्रकारे आदिवासी संस्कृती ही सगळ्या समाजाच्या संस्कृतीपेक्षा वेगळी असलेली दिसून येते. वेगळ्या संस्कृतीचे जतन आदिवासी लोक दिवसेंदिवस करत आले आहेत. अशी आदिवासींची प्राचीन संस्कृती आहे.



Scanned with CamScanner

# संदर्भसूची


१) डॉ.बोथीकर सुधाकर, आदिवासी कविता रूप आणि बंध, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१३, पृ.क्र. १०.

२) डॉ.जाधव सुधाकर, भारतातील आदिवासी समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१२, पृ.क्र. १४.

३) तत्रैव, पृ.क्र. १५.

४) तत्रैव, पृ.क्र. १५.

५) तत्रैव, पृ.क्र. १५.

६) तत्रैव, पृ.क्र. १५.

७) डॉ.बोथीकर सुधाकर, उनि, पृ.क्र. १३.

८) चव्हाण ज्योती, प्रकाशित आदिवासी साहित्याचा विवेचक अभ्यास, अप्रकाशित प्रबंध, पृ.क्र. २३.

९) तत्रैव, पृ.क्र. २४.

१०) तत्रैव, पृ.क्र. २४.

११) डॉ.बोथीकर सुधाकर, उनि, पृ.क्र. ९.

१२) डॉ.जाधव सुधाकर, उनि, पृ.क्र. १५.

१३) डॉ.वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - २००९, पृ.क्र. ५

१४) तत्रैव, पृ.क्र. ६.




Scanned with CamScanner

# प्रकरण दुसरे

# आदिवासी कवितेची निर्मिती प्रेरणा, विकास आणि सद्यः स्थिती



Scanned with CamScanner

# प्रकरण दुसरे

## आदिवासी कवितेची निर्मिती प्रेरणा, विकास आणि सद्य: स्थिती

---

२.१ आदिवासी साहित्याचे स्वरूप

२.२ आदिवासी साहित्य प्रवाहाची संकल्पना

२.३ आदिवासी साहित्य निर्मितीमागील पार्श्वभूमी

२.४ आदिवासी साहित्याची प्रेरणा

२.५ आदिवासी कविता निर्मितीमागील प्रेरणास्रोत

२.६ आदिवासी जीवनाची साहित्य अभिव्यक्ती



Scanned with CamScanner

# आदिवासी कवितेची निर्मिती : प्रेरणा, विकास आणि सद्य: स्थिती

## २.१ आदिवासी साहित्याचे स्वरूप

भारतात अनेक जाती-जमातीचे लोक राहतात. म्हणून भारत हे अनेक जाती-जमातीचे, धर्म-पंथांचे, संस्कृतीचे, संप्रदायांचे माहेरघर आहे. तसेच महाराष्ट्रात आदिवासींच्या ४७ जमाती आहेत. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे हा समाज शिक्षण घेऊन पुढे येण्याचा प्रयत्न करत आहे.

" भारतीय स्वातंत्र्य व लोकशाही गणराज्य प्रणालीमुळे संपूर्ण देशामध्ये विविध राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन घडामोडींचा परिणाम म्हणून प्रथम दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य या वाङ्मयीन प्रवाहांबरोबरच १९७० च्या दशकानंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचा स्वतंत्र, परिवर्तनवादी आणि जोरकस साहित्य प्रवाह निर्माण झाला. मराठीतील मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजातील साहित्यिकांनी आपल्या अनुभवांच्या कक्षा विस्तारित करून कणव व सहानुभूती म्हणून आदिवासी जमातींचा काहीसा जीवनालेख रेखाटण्याचा प्रयत्न प्रारंभी केला आहे. आदिवासी साहित्य प्रवाहातील जातिवंत आदिवासी जमातीत जन्म घेऊन आदिम जमातीचे आत्यंतिक वास्तववादी जीवनचित्रण कथा, कविता, कादंबरी, आत्मकथन या साहित्य प्रकारांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे आदिम जमातीतून संवेदनशील, सृजनशील, जागृत, आत्मभान प्राप्त झालेली साहित्यिकांची पिढी निर्माण झाली."[१]

### आदिवासी साहित्य म्हणजे काय ?

आदिवासी जमातींच्या धर्म, परंपरा, रूढी, रीतिरिवाज, विवाहसंस्था, जातपंचायत, सण, उत्सव त्यांच्या जीवनातील दारिद्र्य, भूक, विषमता, अन्याय, अत्याचार, त्यांचा व्यवसाय, उद्योगधंदा, त्यांचे आरोग्य, अंधश्रध्दा या सर्वांबाबत जन्मजात आदिम जमातीमध्ये जन्म घेऊन संवेदनशीलतेने साहित्य निर्मिती करणारे प्रतिभावंत आदिवासी साहित्यिक आहेत. मानवतावादी दृष्टिकोनातून, सहानुभूती म्हणून, आदिम जमातींबद्दलचा कळवळा



Scanned with CamScanner

म्हणून अनेक आदिवासीत्तर साहित्यिकांनी आदिवासी जीवनविश्व आपल्या साहित्यकृतींचा विषय केलेला आहे. आदिवासी साहित्याबाबत अनेक अभ्यासकांची मते खालीलप्रमाणे -

**१) डॉ. शरच्चंद्र गोखले म्हणतात,** " दलित व आदिवासीच्या भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासींना समृध्द संस्कृतीची चौकट आहे. आदिवासींच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे. त्यामुळे आदिवासी साहित्य ही दलित साहित्याची नक्कल न होता त्याला स्वतःच असं वळण व शैली असली पाहिजे. "[२]

डॉ. गोखले यांच्या व्याख्येतून अस लक्षात येत की दलित व आदिवासी साहित्य स्वतंत्र आहे.

**२) डॉ. विनायक तुमराम म्हणतात की ,** " आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य आहे. रानावनांतील वंचितांचे ते साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही. अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे. येथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिम समूहाचे ते मुक्तिसाहित्य आहे. "[३]

या व्याख्येतून असे लक्षात येते की, आदिवासी साहित्य व वनसंस्कृतीचा जवळचा संबंध आहे. तसेच सावत्रपणाची वागणूक देणाऱ्या अन्यायी, अमानुष प्रस्थापित व्यवस्थेने आदिवासींना हीन लेखले आहे.

**३) श्री. लक्ष्मण ढवळू टोपले म्हणतात की ,** " आदिवासींच्या व्यथा, वेदना, हर्ष, विहर्ष ज्यातून प्रकट होतात ते साहित्य आदिवासी होय. ज्यातून त्यांच्या कोंडलेल्या भावनांना वाट मिळेल. त्यांच्या उपेक्षित जीवनाचे अंतरंग प्रकट होईल ते साहित्य आदिवासी असेल. भूमीतून नैसर्गिकरीत्या अंकुर फुटावा तसे हे साहित्य त्यांच्या आत्मविष्कारातून प्रकट झाले पाहिजे. " [४]

सहज व उत्कटपणे आत्मनिष्ठ भूमिकेतून आदिम मनातून पसरलेले लेखन म्हणजे आदिवासी साहित्य होय.

**४) प्रा. वामन शेळमाके म्हणतात की,** " आदिवासी साहित्य म्हणजे प्रामुख्याने गोंड, राजगोंड, परधान, माडिया, कोलाम, महादेव कोळी, भिल्ल, कोरकूं, वारली, आंध, पारधी,



Scanned with CamScanner

थोटी, बरडा, गावीत, धनवार, पावरा, वसावे, ओराँव अशा विविध जमातींचा समावेश आहे. आदिवासी म्हणविणाऱ्या या जमातीची गुणवैशिष्ट्ये अभ्यासनीय आहेत. यांच्या जीवनावर जे साहित्य आहे. यास आम्ही आदिवासी साहित्य म्हणतो. " ५

महाराष्ट्रातील प्रमुख व उपजमातीचं जीवन चित्रण करणारे वाङ्मय म्हणजे आदिवासी साहित्य होय.

वरील व्याख्यांच्या अनुषंगाने म्हणता येईल की, प्रस्थापित, मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभव विश्वापेक्षा, मध्यमवर्गीय परिघाबाहेरील जीवन विश्वाचा वेध आदिवासी साहित्य घेते. ग्रामीण परिवेशातील वेशीच्या, गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम, दऱ्या-खोऱ्यांत, जंगल-पहाडांत, निसर्ग आणि जंगलांच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती-जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर म्हणजे आदिवासी साहित्य होय. अर्वाचीन मराठी साहित्याच्या ज्या प्रेरणा-प्रवृत्ती आहेत त्या या साहित्य प्रवाहांच्या नाहीत. इंग्रजी, फ्रेंच, बंगाली इत्यादी विविध भाषांतून अर्वाचीन काळात अनुवाद, भाषांतर, रूपांतर या विविध प्रकारांत साहित्य निर्मिती झाली. आदिवासी साहित्याच्या प्रेरणा-प्रवृत्ती मात्र अस्सल मराठी आहेत. मराठी मातीचा सुगंध, आदिमतेचं भान, आदिमतेची वैशिष्ट्ये प्राप्त झालेले हे साहित्य आहे. शेकडो वर्षांच्या साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे जीवन कधी साहित्याचा विषयच झाला नाही, अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती-जमातींतील जनसूहांच्या आक्रोशाचा शाब्दिक आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

मध्यमवर्गीय जाणिवेतून डोंगराच्या कपारीवर किंवा डोंगरांवर भटकंतीच्या निमित्ताने, पर्यटन, प्रवासानिमित्ताने डोंगरावरून मराठी साहित्यिकांची नजर आदिम जीवनाकडे वळली. त्यातून सहानुभूतीने जे साहित्य निर्माण झाले ते सुध्दा या संकल्पनेत गुंफावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात मध्यमवर्गीय जाणिवेतून आणि दलित व आदिम, खास अस्सल जाणिवेतून जे साहित्य निर्माण झाले ते सुध्दा या संकल्पनेत अंतर्भूत आहेत. आदिम जाणिवेने समाजातील द्विस्तरीय रचनेतून आदिवासीविषयक जे लेखन झाले, त्याचा अंतर्भाव या संकल्पनेत होईल. जे परिवर्तन व बदलाला सामोरे जाऊन नवसमाज निर्मितीचा आदर्श घालून देणारे साहित्य आदिवासी साहित्य आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पिढीतील आदिवासी तरुणांच्या ठिकाणची निर्मितीशीलता शाबूत राहिली. यातूनच या नवशिक्षित आदिवासी तरुणांनी आपल्या भावनिक, आंतरिक ऊर्मीला नैसर्गिक व अकृत्रिमपणे वाट मोकळी करून जे निर्माण झाले ते म्हणजे आदिवासी साहित्य होय.



Scanned with CamScanner

" महाराष्ट्राच्या विविध भू-प्रदेशांतील महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या ४७ मुख्य जमाती व १४२ उपजमातींचे वास्तववादी जीवन चित्रण करणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. गोंड, महादेव कोळी, भिल्ल, कोरकू, वारली, मावची या प्रमुख आदिम जमातींतून पहिल्यांदा आदिवासी साहित्य निर्माण झाले. या प्रमुख जातींतील लोकांनी लिहिलेले साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. " [६]



Scanned with CamScanner

## २.२ आदिवासी साहित्य प्रवाहाची संकल्पना

आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य होय. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य होय. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या सावत्र समाज व्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही, अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे. इथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिवासी समूहांचे ते मुक्ती साहित्य होय. " आदिवासींचे घायाळ आयुष्य ज्या संस्कृतीच्या कुसाआड राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाला कुळारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे, जाणिवेचे शब्दरूप होय. " [७]

आदिवासी साहित्याच्या रूपाने नवा विद्रोह दिवसागणिक आकार घेत आहे. वनवासमुक्तीचा नवा संकल्प या साहित्याच्या रूपाने आदिवासींच्या मनामनांत दृढावत आहे. आदिवासी भारताच्या नवनिर्माणाचे स्वप्नबीज आदिवासी साहित्याच्या रूपाने अंकुढित होऊ लागले आहे. " पहाडांच्या कुसाकुसांत आणि काटेरी झुडुपांच्या वस्त्या-वस्त्यांत ज्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण बेडीबंद झाला अशा आरण्यकांना मुक्तीचा दिलासा देणारे साहित्य होय." [८] त्यांच्या वनवासातील अंधार जिने कधी वेचलाच नाही त्या वर्णव्यवस्थेशी निर्णायक युध्द मांडणारे हे साहित्य आदिवासींच्या सर्व तक्रारी सोबत घेऊन युगप्रवासाला निघाले आहे.

या साहित्यात वेदना, विद्रोह आहे. आदिपुत्रांना रानावनांत, गिरीकुहरात, जंगल-जिव्हाऱ्यात डांबणाऱ्या व्यवस्थेला दिलेला जाणीवपूर्वक नकार आहे. एका उज्ज्वल परंपरेचे आपण पायिक असल्याची जाणीव आहे. सांस्कृतिक संघर्षात बळी गेलेल्यांच्या कुटुंबाशी आपले रक्तनाते आहे, हा भावनिक सूर त्यात आहे. आपल्या दु:खद जिंदगीचे गाणे स्वत:च गाण्याची तयारी आहे. आणि आपल्या वैचारिक कुवतीने रानातल्या मौनाला बोलते करण्याच्या शपथाही त्यात आहेत. त्यात सुजाणता आहे ; संयम आहे आणि आपल्या पराभवाचा मागोवा घेणारे शहाणपणही आहे. आदिवासींना मानसिक बळ देणारे वैचारिक संकेत त्यात आहेत. आदिवासी साहित्यातील एकूणच वातावरण हे आदिवासी जीवनातील दु:खाचा शोध घेणारे, आदिवासी हुंकारांनी भडकलेले आणि अंधाराशी झगडणारे आहे. आदिवासींच्या अंतर्मनाचा तळतळाट या वातावरणाने जोपासला आहे.



Scanned with CamScanner

आदिवासी साहित्य हे जीवनवादी साहित्य आहे. आदिवासींच्या सर्वांगीण उत्थानाचा प्रश्न घेऊन हे साहित्य प्रस्थापित समाज व्यवस्थेला हाक मारू लागले आहे. सोबतच आदिवासींच्या सामाजिक बांधणीचा आणि एकात्म जीवनाचा विचारही ते मांडू लागले आहे. वर्णरहित, जातीरहित समाजव्यवस्था आदिवासी समूहांमध्ये नांदावी, हे या साहित्याचे स्वप्न आहे. जी आदिवासींची जीवन मूल्ये कधी नव्हतीच त्यांचा स्वीकार हे साहित्य कदापि करणार नाही.

## २.२.१ आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये

साठोत्तरीत विविध वाङ्मय प्रवाहांची जी वैशिष्ट्ये आहेत. त्यात आदिवासी साहित्याचा प्रवाहसुध्दा अपवाद नाही. मध्यमवर्गीय, पांढरपेशा, सदाशिव पेठेतील अनुभवविश्वातून सत्य-शिव-सुंदर, परात्मभाव, लालित्य, सौंदर्य, अस्तित्व, विपन्नता, निरागसता, व्यक्तिवाद, आत्मप्रौढी, आत्माविष्कार या सर्व मराठी साहित्यातील वैशिष्ट्यांपेक्षा आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये आदिम जीवनाशी नागरी, शहरी, आधुनिक जीवनापासून शेकडो मैल अरण्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींचे वास्तव जीवन रेखाटणारी वैशिष्ट्ये जाणवतात. ती खालीलप्रमाणे

१. " दलित साहित्याच्या वैशिष्ट्यांप्रमाणे हजारो वर्षांपासून आदिम जमाती शोषितपणाचे जिणे जगत आहे. उदाहरणार्थ, ' जेव्हा माणूस जागा होतो ' या गोदावरी परूळेकरांच्या ग्रंथातून ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी शेतकऱ्यांवर तेथील जमीनदार, भांडवलदार वर्गाकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचे वर्णन आहे. " [९]

२. " आदिम जमातींच्या दु:ख, व्यथा चित्रित करणारे हे साहित्य आहे. " [१०]

३. " जुन्या गावगाड्याच्या रचनेत अस्पृश्य जातींसारख्या वेदनाही आदिवासींना सहन कराव्या लागतात. " [११]

४. " दलित साहित्याप्रमाणेच आदिवासी साहित्यसुध्दा भारतातील प्रस्थापित व्यवस्था नाकारते. भारतीय जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्म, संस्कृती नाकारून भेदरहित, धर्म-जातीविरहित संस्कृती अपेक्षित आहे. " [१२]

५. " आदिम जमातींचा शेकडो वर्षांचा आक्रोश, संताप, छळ, पिळवणूक अभिव्यक्त करणारा हा साहित्य प्रवाह आहे. " [१३]



Scanned with CamScanner

६. "वेदना हीच विद्रोहाची, बंडाची जननी आहे हे गृहीतत्व या साहित्य प्रवाहालाही लागू पडते. म्हणून आज सुशिक्षित आदिम जमातींतील तरुणांनी, नवशिक्षित तरुण व आदिवासी लेखकांनी मराठी साहित्यात विद्रोह परिपुष्ट केला आहे. " [१४]

७. "स्वातंत्र्य, समता, बंधुता या नव्या आधुनिक मूल्यांची मांडणी करणारे हे साहित्य आहे."[१५]

८. "स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात मानवतावादी, भूतदयावादी, सहानुभूतीने आदिमतर विविध संस्था व व्यक्ती आणि समाजसुधारणावादी धुरिणांनी आदिवासी जीवन बदलण्याचा प्रयत्न केला. यातून आदिवासींच्या शोषणमुक्तीची चळवळ निर्माण झाली. आदिवासी मुक्ती चळवळीच्या यशस्वितेसाठी नंतरच्या कालखंडात भारतीय राज्यघटनेने खतपाणी घातले. " [१६]

९. " भारतीय राज्यघटना व लोकशाही स्वातंत्र्यामुळे नवशिक्षित आदिवासी तरुणांना आत्मभान ('स्व' भान) प्राप्त झाले. दलितांसारखी त्यांची सुध्दा आदिम अस्मिता जागृत झ ाली. " [१७]

१०. " आदिम अस्मितेचा शब्दरूप आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय. " [१८]

११. " हजारो वर्षे मूक, अबोल असलेला धरतीचा पुत्र प्रथमच स्वातंत्र्योत्तर काळात साहित्याच्या माध्यमातून बोलता झाला. " [१९]

१२. " आदिवासी गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्यास हे साहित्य सिध्द झाली आहे. " [२०]

१३. " आदिवासींच्या अन्यायग्रस्तांच्या, आदिवासी विस्थापितांच्या बाजूने उभे राहणारे हे साहित्य आहे. " [२१]

१४. " वर्ण आणि जातिधर्माचा निषेध करणारे हे साहित्य आहे. " [२२]

१५. " स्वातंत्र्यपूर्व काळापासून युगानुयुगे पिळल्या गेलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळात जमीनदार, भांडवलदार, शेठ-सावकार, बडे शेतकरी यांच्यापासून नाडलेल्या, नागवलेल्या आदिमांचे प्रकट मनोगत म्हणजे आदिवासी साहित्य होय. " [२३]

१६. " भारतीय समाज जीवन व्यवस्थेतील आत्यंतिक उपेक्षित जीवन स्तरातील सामाजिक दुर्दशा आदिम साहित्यातून जाणवते. " [२४]



Scanned with CamScanner

१७. " आदिम जीवन संघर्ष व आदिम जीवनाची वाताहत सांगणारे हे साहित्य आहे. " [२५]

१८. " मराठी साहित्यातील कलावाद, तंत्रवाद, सौंदर्यवाद टाळून समाजभिमुख, समाजसन्मुख आदिवासी साहित्य आहे. " [२६]

१९. " आदिम समाजाची वेदना, व्यथा, आक्रोश, संताप व्यक्त करणारे हे साहित्य आहे " [२७]

२०. " आदिवासी जमातींच्या बोलीभाषेत, ग्रामीण बोलीभाषेत हे साहित्य प्रकट होते. हे आदिवासी साहित्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. " [२८]

२१. " दलित साहित्य व आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये समसमान आहेत. दोन्ही साहित्य प्रवाहाचं ध्येयही समान आहे. " [२९]

२२. " आदिवासींच्या बोली नागर वाचकांना ज्ञात नसल्याचे संवाद आदिवासींच्या बोलीत किंवा प्रदेश विशिष्ट ग्रामीण बोलीत आणि निवेदन मात्र प्रमाण भाषेत केलेले दिसते. " [३०]

२३. " दलित आणि आदिवासी साहित्य प्रवाहांमध्ये मित्रत्वाचं नातं आहे. "



Scanned with CamScanner

## २.३ आदिवासी साहित्य निर्मितीमागील पार्श्वभूमी

आदिवासी साहित्य निर्मितीमागील पार्श्वभूमी लक्षात घेताना महाराष्ट्रातील समाज व्यवस्था आणि आदिवासी, आदिवासींविषयक मध्यमवर्गीय दृष्टिकोन, आदिवासी चळवळ आणि आदिवासी साहित्य, आदिवासी साहित्याची व्याप्ती इत्यादी उपघटकांचा विचार करावा लागेल.

### *१) महाराष्ट्रातील समाज व्यवस्था आणि आदिवासी*

" प्राचीन महाराष्ट्राचा विचार केला तर गोंड, भिल्ल, कातकरी, कातोडी, वारली हेच या भूभागातील आद्य 'वसाहत'कार होते, असा महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास सांगतो. "[३२] असे मत डॉ. श्री.व्यं. केतकरांनी नोंदविले आहे. डॉ.द.भि. कुलकर्णी या संदर्भात म्हणतात, " आधुनिक भारताचा समाजशास्त्रीय विचार करता बहुधा 'शहरी भारत' आणि 'ग्रामीण भारत' असे विभाजन केले जाते. असे विभाजन करताना एका महत्त्वाच्या समूहाकडे आणि परिसराकडे आपले दुर्लक्ष होत आहे हे ही अनेकदा अभ्यासकांच्या लक्षात येत नाही, हा 'तिसरा भारत' म्हणजे वनवासात राहणारा 'आदिम भारत' होय. आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल,पण तो असंस्कृत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याला स्वत:ची बोली आहे. रीतिरिवाज आहेत, दैवते आणि धर्मविधी आहेत, सणसमारंभ आणि साहित्यकलाही आहेत. शहरी दलित समाजापेक्षा या अरण्यवासी आदिम समाजाचे हे वैशिष्ट्य नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. हा समाज विभूतिपूजा, झुंडशाही आणि हिंसाचार या दुर्गुणांपासून अलिप्त आहे; याचे कारण त्याला लाभलेला सृदृढ सांस्कृतिक वारसा हेच होय. "[३३]

महाराष्ट्रातील १२ बलुतेदार व ६ अलुतेदार या अठरापगड जातीधर्माच्या पलीकडे, नुसते गावगाड्याबाहेरच नव्हे तर त्याही पलीकडे अत्यंत दुर्गम, डोंगरी, जंगलात वास्तव्य करणाऱ्या आदिम जमातीपासून हजारो वर्षे येथला गावकुसाआतील माणूस अलिप्त राहिला आहे. महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लेखकांनी आपल्या अनुभवांच्या कक्षा विस्तारित केल्या नाहीत. (अपवाद काहींचा- श्री.म.माटे, र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ इत्यादी.)

महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण मानसिकतेने आदिमांना राजकीय, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीमध्येच ठेवलेले होते. सामाजिक विषमता अबाधित ठेवण्याच्या हेतूने



Scanned with CamScanner

आदिम जमातींच्या व्यथा, वेदना, आक्रोश, छळ, अन्याय, अत्याचार प्रस्थापित व्यवस्थेला दिसलाच नाही. म्हणून महाराष्ट्रातील आदिम जमात उपेक्षित राहिली, आधुनिक युगात शिक्षणावरील विशिष्ट लोकांची मक्तेदारी नष्ट झाली. आज आदिम जमातीतील लोकांना, सुशिक्षित, जागृत, संवेदनशील तरुणांना आत्मभान प्राप्त होत आहे.

## २) आदिवासीविषयक मध्यमवर्गीय दृष्टिकोन

आदिम जमातीबद्दल या देशातला सर्वसामान्य व मध्यमवर्गीय सुशिक्षित लोकांचा दृष्टिकोन हा अत्यंत पूर्वग्रहदूषित, उपहासात्मक स्वरूपाचा आहे. याबाबत आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक डॉ.गोविंद गारे म्हणतात, " आदिवासी म्हणजे निर्बीड अरण्यात अर्धनग्नावस्थेत राहणारे नरभक्षक, कच्चे मांस खाणारे, शिकार करून जगणारे असेच त्यावेळी लोकांना वाटत होते. आदिवासी हे नावही त्यावेळी रूढ झालेले नव्हते. आदिवासी हे निषाद, किरात, वाल्या कोळी आणि शबरी यांचे वंशज आहेत व त्यामुळे ते दुराचारी, दुष्ट आणि क्रूर आहेत अशी लोकांची कल्पना होती. रामायण, महाभारताच्या काळापासून जुन्या वाङ्मयात त्यांचे वर्णन, 'कावळयापेक्षा काळे', 'धरतीचे पापी प्राणी', 'खुजे', 'चपट्या नाकाचे', 'लुटारू', 'राक्षस', 'नरभक्षक' वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते. साहजिकच लोकांमध्ये त्यांच्या संबंधाने गैरसमज पसरलेले होते."[३४]

आधुनिक युगात शिक्षणामुळे आदिम जमातीला, तरुणांना सत्व, स्वत्त्व, स्वाभिमान, अस्मिता, आत्मभान प्राप्त झाले. पूर्वीपेक्षा आज मध्यमवर्गीय त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघू लागले. एकूण जीवनाला सामोरे जाण्याचे बळ प्राप्त झाले आहे. मध्यमवर्गीयांच्या आदिमांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात मूलगामी परिवर्तन करण्याचा प्रयत्न विविध पातळीवर आज सातत्याने चालू आहेत. यामुळे आदिवासी जमातींचे आधुनिकीकरण, शहरीकरण काही प्रमाणात होत आहे.

## ३) आदिवासी चळवळ आणि आदिवासी साहित्य

मराठी साहित्यात स्वातंत्र्योत्तर १९६० नंतर दलितमुक्तीच्या चळवळीतून दलित साहित्य; ग्रामीण सुधारणेच्या चळवळीतून १९७७ नंतर ग्रामीण साहित्य चळवळ निर्माण झाली. स्वातंत्र्योत्तर सर्वच परिवर्तनवादी साहित्य प्रवाह हे कोणत्यातरी चळवळीचे अपत्य आहे. याला आदिवासी साहित्यसुध्दा अपवाद नाही. भारतीय स्वातंत्र्य, लोकशाही, गणराज्य प्रणाली, भारतीय राज्यघटनेने दिलेले हक्क व अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्यामुळे, औद्योगिक व



Scanned with CamScanner

भौतिक सुधारणेमुळे समाजातील दलित, ग्रामीण, स्त्री, आदिवासी, शेतकरी, भटके-विमुक्त या सर्वच समाज स्तरांतील घटकांची अस्मिता जागी झाली. अनेक वर्षांपासून गावकुसाच्याही अतिपलीकडे, आत्यंतिक दुर्गम भागात जे अतिशूद्र राहत होते, त्या आदिम जमातीला लोकशाही स्वातंत्र्यामुळे स्वभान प्राप्त झाले. शिक्षण, आरोग्य, राजकीय, सामाजिक, आर्थिक लाभांमुळे आदिवासींच्या उत्थानाची चळवळ १९७८-७९ दरम्यान सुरू झाली. त्यातून आदिवासी साहित्य परिषद व आदिवासी साहित्य संमेलनास प्रारंभ झाला. ही मराठी साहित्यातील तमाम आदिवासी जमातींच्या दृष्टिकोनातून क्रांतिकारी बाब आहे. यामुळे आदिवासी चळवळ व आदिवासी साहित्यपूर्व मराठी साहित्यातील बिगर आदिवासींनी आदिम जमातींचे जे धूसर, अस्पष्ट, केवळ आपल्या मुख्य कथानकाला शोभेल असे जीवन चित्रण घडविले. बिगर आदिवासी लेखकांनी भूतदयावादी, गांधीवादी दृष्टिकोनातून आदिम जमातींच्या जीवनाचा अस्पष्टसा उल्लेख केला आहे. यातून संपूर्ण आदिम जमातींचा विविध स्तरांवरील जीवनसंघर्ष व्यापक प्रमाणात येत नाही.

आदिवासी साहित्य चळवळीविषयी दिनांक २३, २४, मे १९८२ रोजी वणी जि. यवतमाळ येथील दुसऱ्या आदिवासी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना तत्कालीन उपमंत्री ना. शिवाजीराव मोघे म्हणतात, " निसर्गाशी समरस होऊन आदिवासी आनंदात राहतो. वाघाशी मुकाबला करताना भीत नाही. पण शहरातील उच्चभ्रू अधिकाऱ्यांची त्याला भीती वाटते. शेकडो वर्षापासून जपलेला साहित्यसाठा रानावनांत आहे. साहित्य संमेलनापासून प्रेरणा घेऊन त्यातील अनिष्ट ते काढून टाकून सोज्वळ व चांगले प्रकाशात आले पाहिजे. " [३५] तसेच कवी भुजंग मेश्राम म्हणतात की, " आपल्याला आपली वाट, आपली दिशा निश्चित करणे महत्त्वाचे आहे. आदिवासी साहित्य कृतिशील बनवून त्यास आत्मसन्मानाच्या चळवळीशी जोडणे आवश्यक आहे. आम्हाला आदिवासींच्या आत्मसन्मानाची चळवळ तीव्र करायची आहे. आदिवासी साहित्य हे तिचे एक अविभाज्य अंग आहे. " [३६]

### ४) आदिवासी साहित्याची व्याप्ती

आदिवासी साहित्याची व्याप्ती-ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक डॉ. आनंद यादव 'ग्रामीण' या संकल्पनेबद्दल म्हणतात की, " खेडेगाव तेथील जीवन पध्दती, तेथील अशा खास रीती, शेती तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवीपण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच



Scanned with CamScanner

प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या या साऱ्यांचा 'ग्रामीण' या संकल्पनेत अंतर्भाव होतो. "[३७] आनंद यादवांनी 'ग्रामीण' या संकल्पनेत आदिम संस्कृतीचा निसंदिग्धपणे उल्लेख ते करत नाहीत. त्यांच्या या संकल्पनेला ग्रामगत मर्यादा पडतात. वेशीच्या आतील जीवनाचा अतिशूद्रांशी विसंवादच निर्माण झाला आहे.

दलित साहित्य ज्या प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात विद्रोहाचा अंगार पेटवून उभे राहते. त्याच व्यवस्थेला आदिवासी साहित्याचा नकार आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्यायावर आधारित नवसमाज रचनेचे स्वप्न आदिवासी साहित्यसुध्दा पाहते.

आदिवासी साहित्याच्या व्याप्तीबाबत श्री.शिवाजीराव मोघे म्हणतात," आदिवासी साहित्याची चळवळ ही केवळ साहित्यापूरती मर्यादित नाही तर आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन मिळून त्याचा लाभ सर्वसामान्य आदिवासींना मिळावा."[३८] । कलेसाठी कला ' या साहित्य प्रयोजनासारखी आदिवासी चळवळ नसून ' समग्र आदिवासी विकास ' हे तिचे प्रयोजन असल्याचेच वरील मतातून लक्षात येते.

समाज जागृतीची अपेक्षा व्यक्त करताना आदिवासी चळवळीच्या व्यापकतेबद्दल नेताजी राजगडकर एका परिसंवादात म्हणतात, " आदिवासींचे जीवन रेखाटणे म्हणजे आदिवासी साहित्य नव्हे, ती सध्याच्या सर्व चळवळीत माझा आदिवासी कुठे आहे हे शोधणे अगत्याचे आहे. जे साहित्य समाज जागृतीचे कार्य करू शकणार नाही ते आदिवासी साहित्य होऊ शकणार नाही. "[३९] आदिवासी जमातींच्या 'स्व'अस्तित्वाचा शोध घेणे हे वरील मतात राजगडकरांनी गृहीत धरले आहे.

आदिवासी साहित्याचा सांस्कृतिक लढा आत्मपरीक्षणाचा आहे, हे सांगून वाहरू सोनवणे म्हणतात, " आमची लढाई ही अस्मितेची आणि आत्मसंशोधनाची आहे. आमचा लढा हा मानवमुक्तीचा लढा आहे. तो प्रस्थापितांविरूध्द आहे. तसाच स्वत:विरुध्दही आहे."[४०]



Scanned with CamScanner

## २.४ आदिवासी साहित्याची प्रेरणा

आदिवासी साहित्याच्या प्रेरणा कोणत्या? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आदिवासी समूहांच्या प्रेरणांचा विचार आधी करावा लागतो. आदिवासी हा निसर्गनिर्भर मानवसमूह आहे. तो ज्या पर्यावरणात राहतो, त्यातील बदलांचा परिणाम कमी-अधिक प्रमाणात त्याच्या अंतसृष्टीच्या संरचनेवर होत असतो. रानातील पशूपक्षी, फळे-फुले, नद्या-सरोवरे यांचे चिरसान्निध्य आदिवासींना लाभले आहे. गिरीकुहरात, जंगल जिव्हाऱ्यात त्यांचे स्वत्व दिलखुलासपणे वावरले आहे. निसर्गसान्निध्यात ते आनंदून गेले आहे. त्यामुळे त्यांचे निसर्गप्रेम हे विलक्षण व निसर्गनिष्ठा ही दृढ आहे. निसर्गाच्या सान्निध्यात त्यांना अकृत्रिम मोकळेपणा जाणवतो. निसर्ग हेच त्यांचे जीवन सर्वस्व असल्यामुळे त्यांची पहिली प्रेरणा जर कोणती असेल तर ती नैसर्गिक प्रेरणा होय.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित कल्याणार्थ विविध वैचारिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक लढे देऊन दलितांची मानसिक कोंडी फोडून दलित जनतेला पहिला शाब्दिक हुंकार देऊन त्यांची अस्मिता जागृत केली. त्यापाठोपाठ त्यांची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेच्या संरक्षक कवचाखाली आदिमतर व आदिवासी जमातीतील विविध संस्था, व्यक्ती, सुधारणावादी मंडळी या सर्वांच्या अथक प्रयत्नांतून आदिवासी मुक्तीची चळवळ प्रथम निर्माण झाली. त्यातून चळवळीचे अपत्य म्हणून १९७८-७९ नंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्याचा प्रवाह निर्माण झाला.

१) " महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनरी संस्थांचे शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्य, उदाहरणार्थ ठाणे जिल्ह्यातील कल्याण चर्च ऑफ दी ब्रेदेरेन मिशन या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडम एबी यांनी इ.स. १९०३ मध्ये वारली आदिवासींकरिता दवाखाना उघडला होता. १९२० मध्ये याच मिशनतर्फे पालघर व डहाणू तालुक्यांत शिक्षणाचे कार्य सुरू झाले. याशिवाय ठाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी ( राणीशिवगाव, पांचाली, आगवण, मुंडवाली, कैनाड, तलासरी इ. ) दवाखाने, प्राथमिक शाळा, वसतिगृह इत्यादी माध्यमांतून आदिवासी जमातींना जागृत करण्याचे कार्य केले आहे. याशिवाय पुणे, नाशिक, धुळे, विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली या सर्व प्रादेशिक भूभागात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सेवाभावी वृत्तीने त्यांच्या उत्थानाचे कार्य केले. या सर्व प्रक्रियेतून कळत-नकळत आदिवासी जागृतीची चळवळ अधिक विकसित होत गेली." ४१



Scanned with CamScanner

२) " नामदार गोपाळ कृष्ण गोखले ( भारत सेवक समाज ), ठक्करबाप्पा ( भिल सेवा मंडळ ), पालघरचे वि.वा.उर्फ बाबासाहेब दांडेकर, बोर्डीचे आचार्य भिसे (आदिवासी सेवा मंडळ, मुंबई), बाळासाहेब खेर, म.गांधीजींची समाजसेवेची प्रेरणा घेऊन काकासाहेब बर्वे, शंकरराव ठकार, दादासाहेब बीडकर, भाऊसाहेब हिरे, डॉ.ए.के.मोरे, कोंडू मारूती बोकड (जुन्नर), गोपाळराव कडू, ओंकार होळक्या पाडवी, मारोती महादेव केंगले, नागपूर विदर्भाकडील पंचमबाबू मडावी, तुकाराम मडावी, गुंडारामजी मसराम, थोर संत तुकडोजी महाराज, संत व भिडीधर्म प्रचारक पू. राघोबाजी विठोबाजी मडावी, क्रांतिवीर नारायणसिंह उईके, लखुजी गेडाम, बाबूरावजी मडावी, याशिवाय अलीकडील काळात आदिवासी जमातीत जन्म घेऊन समाजसेवेचा वसा घेणारे अनेक समाजसेवक व कार्यकर्ते यांनी आदिम जमातींना शैक्षणिक सुविधा पुरविल्या आहेत. महाराष्ट्रातील शासन संस्थेनेही आदिवासी उपयोजनेच्या माध्यमातून त्यांचा जीवन स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीच्या आश्रयाखाली घेऊन धुळे येथील शरद पाटील यांच्या मार्गदर्शनाने नजूबाई गावीत व वाहरू सोनवणेसारखी प्रतिभावंत लेखक मंडळी उदयास आली आहेत. वरील सर्वांच्या अथक परिश्रमांतून, समाजसेवेतून आदिवासी मुक्ती चळवळ आणि पर्यायाने आदिवासी साहित्य निर्माण झाले आहे. " [४२]

३) " भारतीय स्वातंत्र्य व लोकशाहीमुळे आदिवासींना सुध्दा राज्यघटनेने काही हक्क व अधिकार दिले, यातूनच आदिम समाज जागृत होऊन संवेदनशीलपणे साहित्य निर्मितीस धजला आहे." [४३]

४) " महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीपासून मार्क्सवादी जाणिवेतून आदिवासी साहित्य निर्मिती झालेली आहे. " [४४]

५) " आदिवासी जमातींचा धर्म व आदिवासी वीरपुरूषांचे ऐतिहासिक कर्तृत्व व बंडखोरी, इंग्रजी सत्तेच्या विरोधातील प्रचंड बंड व त्यांच्या मुक्तिसंग्रामाचे लढे, त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक योगदान आदिवासी साहित्याची प्रेरणा होऊ शकेल असे वाटते. " [४५]

६) " निसर्ग हेच आदिवासी जमातींचे जीवनसर्वस्व असल्यामुळे नैसर्गिक प्रेरणा ही पहिली प्रेरणा आहे. यात परिस्थितीसापेक्ष वैशिष्ट्यांची छाप आहे. प्राचीनतम व समृध्द संस्कृती हा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. अनेक सामाजिक वादळी परिवर्तनामुळे त्यांचे जीवन अविचल झाले आहे. आदिवासी जमातींची संस्कृती हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव आधार व प्रेरणास्रोत आहे. " [४६]



Scanned with CamScanner

७) " नवशिक्षितांच्या नागरीकरणामुळे आदिम समाजाच्या जीवन जाणिवांवर परिणाम होत असल्यामुळे त्यांच्या जीवन संघर्षाचे व प्रेरणांचे स्वरूप बदलणे स्वाभाविक आहे. " [४७]

८) " धर्म, संस्कृती, वीरपुरूष व त्यांचा मुक्तिसंग्राम याशिवाय आदिवासींची बोलीभाषा ही सुध्दा एक प्रेरणा होऊ शकेल. " [४८]

९) " आदिवासी समाजातील एक रसिक श्री. कृष्णाजी मरसकोल्हे आदिवासी साहित्य प्रेरणेबाबत म्हणतात, " पांढरपेशांना डावलून आम्हाला चालणार नाही. पांढरपेशांकडून मिळालेल्या स्फूर्तीचं स्मरण आपण ठेवलं पाहिजे. अभिजात साहित्याच्या वाचनानेच आपल्याला साहित्य निर्मितीची प्रेरणा मिळालेली आहे. हे प्रांजळपणे मान्य केले पाहिजे." [४९]



Scanned with CamScanner

## २.५ आदिवासी कविता निर्मितीमागील प्रेरणास्त्रोत

आदिवासी साहित्याची निर्मिती ही स्वातंत्र्योत्तर काळातील आहे. त्याअगोदर आदिवासी साहित्य नव्हते असे नाही. मात्र, मुळातच हा समाज आणि साहित्य स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही मोठ्या प्रमाणात उपेक्षित राहिले. आदिवासी साहित्याच्या आणि कवितेच्या प्रेरणा एकच आहेत. यासंदर्भात ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात. " स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढे देऊन त्यांची अस्मिता जागृत केली. त्यापाठोपाठ त्यांची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेच्या संरक्षक कवचाखाली आदिमेतर व आदिवासी जमातीतील विविध संस्था, व्यक्ती, सुधारणावादी मंडळी या सर्वांच्या अथक प्रयत्नांतून आदिवासी मुक्तीची चळवळ प्रथम निर्माण झाली, त्यातून चळवळीचा प्रवाह निर्माण झाला. " आदिवासी कवितेला पुरोगामी विचार, वीर पुरूषांची, निसर्गाची, जंगल, दऱ्या, जीवनपध्दती, रीतिरिवाज या प्रेरणा आहेत.

### १) <u>फुले, आंबेडकर - एक प्रेरणा</u>

आदिवासी साहित्य, कविता निर्मितीला फुले-आंबेडकरांचीही प्रेरणा लाभलेली आहे. डॉ. आंबेडकरांनी आयुष्य दीन-दलितांच्या उध्दारासाठी खर्ची घातले. त्याअगोदर म.फुले तत्कालीन समाज व्यवस्थेविरूध्द स्त्री, शेतकरी, कामगार, शूद्रांसाठी लढले. 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'तृतीय रत्न', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'अस्पृश्यांची कैफियत' इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. त्यातून सर्वसामान्यांविषयीची निष्ठा फुले व्यक्त करतात. आणि प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द बंड पुकारतात. बालहत्या प्रतिबंधकगृह ब्राह्मण विधवांसाठी त्यांनी सुरू करणारे म.फुले घरचा पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करतात. अस्पृश्य, स्त्रिया, शेतकरी, गरीब मुला-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून इंग्रजांना वेठीस धरणारे, प्रसंगी फटकारणारे फुले यांचे कार्य आदिवासी कवितेला प्रेरणा देणारे ठरले आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतातील उपेक्षित, वंचित, हीन-दीन समाजाला, ज्यांच्याकडे माणूस म्हणून कधीच पाहिले नाही, अशा सर्वांना सोबत घेऊन समाजकार्य केले. माणूस मूल्य, अस्तित्व प्राप्त होण्यासाठी संघर्ष केला. विविध ग्रंथांतून, प्रत्यक्ष कृतीतून, लढ्यांतून, वर्तमानपत्रांतून, भाषणातून कार्य केले. त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, साप्ताहिकांतून क्रांतिकारक विचार मांडले. 'शूद्र पूर्वी कोण होते', 'बुध्द ॲण्ड हिज धम्म इ. जागतिक दर्जाचे ग्रंथ लिहून अनेक चळवळींना, साहित्याला मोठी प्रेरणा दिली. त्याबरोबरच



Scanned with CamScanner

स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन असे महत्त्वाचे राजकीय पक्ष स्थापन करून भारतातील सर्व दलित, आदिवासी समाज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

आदिवासी कविता आंबेडकरी प्रेरणेने पेटून उठली आहे. ती आता कोणताही अत्याचार सहन करणार नाही. आंबेडकरी विचाराने प्रभावीत होऊन क्रांतीची मशाल हातात घेऊन आदिवासी कविता मार्गक्रमण करीत आहे.

## २) निसर्गाची प्रेरणा

निसर्ग ही आदिवासी कवितेची प्रेरणा आहे, कारण आदिवासी निसर्गाच्या सान्निध्यात वास्तव्य करीत असल्यामुळे आणि निसर्गाला आपले सर्वस्व मानत असल्याने त्यापासूनही प्रेरणा मिळालीच आहे. यामध्ये परिस्थितीजन्य वैशिष्ट्यांची छाप पडली आहे. प्राचीन समृध्द संस्कृती हा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. अनेक वादळी सामाजिक परिवर्तनांमुळे त्यांचे जीवन अस्थिर बनले आहे. निसर्गात राहणारा आदिवासी निसर्गाला आपले दैवत मानतो; म्हणून आदिवासी कवितेत निसर्गाचे विविधांगी दर्शन घडते. एकंदरीत आदिवासी कविता निसर्गाची देण आहेत. तेथील डोंगरदऱ्या, जंगल, पाणी, प्राणी, झाडे अशी विविध निसर्गाची रूपे आणि यावर होत असलेला हल्ला आदिवासी कवितेतून येतो. म्हणून निसर्ग ही आदिवासी कवितेची आद्य प्रेरणा ठरते. निसर्ग आदिवासी कवितेचे बलस्थान आहे, अधिष्ठान आहे.

## ३) आदिवासी वीर पुरुष : एक प्रेरणा

आदिवासी वीर पुरुषांचे कर्तृत्व, ब्रिटिश सत्तेविरूध्द दिलेले लढे, येथील जमीनदार, सावकारांविरूध्द केलेले उठाव आदिवासी कवितेची प्रेरणाच ठरते. संस्कृती, परंपरा, जीवन पध्दती या आदिवासी कवितेच्या प्रेरणाच म्हणाव्या लागतील. आदिवासींमध्ये अनेक पराक्रमी पुरूष-स्त्रिया होऊन गेल्या. त्यात बिरसा मुंडा, तंटया भिल्ल, राणी दुर्गावती, पुलेश्वर, मडावी इत्यादी आणि इतर अनेक वीर पुरूष आदिवासींमध्ये आहेत. हे क्रांतिवीर आदिवासी कवितेची प्रेरणा ठरले आहेत.

## ४) आदिवासी बोली : एक प्रेरणा

आदिवासी बोली हा आदिवासी कवितेचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे प्रचलित वाङ्मय प्रकारांमध्ये मध्यवर्ती भाषेतच गुणशैलींप्रमाणे लेखन करीत असताना निवेदने, वर्णन, संवाद बोलीभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द, वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्राक्कथा, दंतकथा



Scanned with CamScanner

समाविष्ट झालेल्या दिसतात. एकूणच आदिवासी बोलीभाषेतून कवितानिर्मिती व्हावी याकरिता अनेक आदिवासी साहित्यिक, विचारवंत, कवी मार्गक्रमण करीत आहेत. ही समाधानाची बाब आहे, कारण कवितेच्या माध्यमातून कवींना खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाचे अस्तित्व, आत्मसन्मान, अधिकार अभिव्यक्त करता येतो. म्हणून 'बोली' ही आदिवासी कवितेची एक महत्त्वाची प्रेरणा आहे.

## ५) ख्रिश्चन मिशनरी : एक प्रेरणा

महाराष्ट्रामध्ये ख्रिश्चनांनी शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्य केले. ठाणे जिल्ह्यातील 'कल्याण चर्च ऑफ दी ब्रेदरेन मिशन' या अमेरिकन संस्थेतर्फे रेव्हरंड ॲडम ए.बी. यांनी इ.स.१९०३ मध्ये वारलींकरिता दवाखाना, तर १९२० मध्ये याच मिशनतर्फे पालघर व डहाणूत शिक्षणाचे कार्य सुरू झाले. याशिवाय ठाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी ( राणी शिवगाव, पांचाली, आगवण, मुंडवली, कैनाड, तलासरी इत्यादी ) दवाखाने, प्राथमिक शाळा, वसतिगृहे इत्यादीतून आदिवासी जमातींना मदतकार्य केले आहे. तसेच पुणे, नाशिक, धुळे, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती (मेळघाट) या भागात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी आदिवासींची सेवा केली. यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आदिवासी जागृतीची चळवळ विकसित होत गेली आणि यातून आदिवासी कवी कवितेकडे वळले.



Scanned with CamScanner

## २.६ आदिवासी जीवनाची साहित्य अभिव्यक्ती

आदिवासी साहित्याच्या विकासात काव्यनिर्मितीला महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी कविता म्हणजे आदिम जीवनांनुभूतीचा आविष्कार होय. आदिम संवेदनेतून ती निर्माण झाली. आदिम संवेदना व्यक्त करणारी ही कविता होय. आदिवासी कवितेतून येणारे जीवन, प्रश्न, अडचणी त्यांचा निसर्गाशी असलेला घनिष्ठ संबंध, संस्कृती, रूढी, परंपरा या संदर्भातील अनुभवविश्व यात व्यक्त होते.

'आदिवासी' या नावाखाली मोडणाऱ्या आणि सारख्याच दु:ख-व्यथांनी वरबटलेल्या विभिन्न जमातीतील (गोंड, माडिया, कोरकू, भिल्ल, परधान, हलबा-हलबी इ.) जे नवशिक्षित आदिवासी तरूण आपापल्या अनुभूतीसह साहित्यनिर्मिती करू लागले आहेत त्यात डॉ. गोविंद गारे, ऋषी मसराम, नेताजी राजगडकर, वाहरू सोनवणे, प्रा.डॉ.विनायक तुमराम, व्यंकटेश आत्राम, भुजंग मेश्राम, डॉ.उत्तमराव घोंगडे, डॉ.तुकाराम रोंगटे इ. सर्व आदिवासी कवी-लेखक साहित्यक्षेत्रात आपापल्या प्रतिभेने वावरू लागले आहेत. शब्दांची पेरणी करू लागले आहेत." स्वातंत्र्याच्या सूर्योदयानंतरही अस्तित्व टिकवून असलेल्या काळोखाच्या विषारी दंशाने घायाळ झालेल्या आयुष्याचे दु:ख कवितेच्या रूपाने आज आकारात येऊ लागले आहे. " काळालाही बदलविण्याचे व एक नवी दुनिया जन्माला घालण्याचे प्रचंड सामर्थ्य शब्दांच्या ठायी आहे असे म्हणतात म्हणूनच आदिवासी प्रतिभेने शब्दांशी नाते जोडले आहे.

आदिवासींच्या कविताही संघर्ष घेऊन आल्या आहेत. अनुभूतीनी ही कविता ठासून भरलेली आहे. ती लढाऊ बाण्याची आणि भविष्याचा वेध घेणारी आहे. या कवितेला आदिवासी संस्कृतीचे संदर्भ आले आहेत. आदिवासींच्या दु:खांचा आणि रानातल्या वणव्याचा शोध घेते. आदिवासी कवीच्या द्रष्टेपणाची झाक तिच्यात आढळते. आदिवासींच्या वनवासाने ती चिंताक्रांत झाली आहे. म्हणूनच वनवासमुक्ती हे तिचे ध्येय स्वप्न आहे. रानावनांतील गिरीकुहरातील आदिवासी हुंकारांना शब्दरूप देणारी ती वादळी कविता आहे.

काव्यप्रातांत ज्या नवशिक्षित आदिवासी तरुणांनी दमदारपणे पाऊल टाकले आहे त्यात अनेक नावे आहेत. त्यातील काही आदिवासी कवींचे कवितासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. १९७६ मध्ये भुजंग मेश्राम यांचा, 'आदिवासी कविता' हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला. गोंडी भाषेतील कवितांचा हा विदर्भातील पहिलाच कवितासंग्रह होय. त्यामुळे गोंडी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने या कवितासंग्रहाला वाङ्मयीन मूल्य अधिक आहे.



Scanned with CamScanner

काव्याप्रमाणेच नाट्य क्षेत्राकडेही आदिवासी साहित्यिकांची वाटचाल सुरू झाली आहे. श्री.तोडसाम यांचे 'सोनता कुर्स' हे गोंडी भाषेतील नाटक तीन दशकांपूर्वी प्रसिध्द झाले. विठ्ठलराव कन्नाके या वैदर्भीय आदिवासी लेखकाने लिहलेले 'जय बुळहालपेन' हे गोंडी भाषेतील नाटक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. आपल्या स्वतंत्र प्रज्ञा-प्रतिभेने ज्यांनी नाट्यकक्षेत्रात दमदारपणे पाऊल टाकले आहे ते आदिवासी लेखक रवी कुरसंगे हे होत. त्यांची काही नाटके रंगभूमीवर गाजली असून प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

आदिवासी साहित्याने आपले पाय साहित्य क्षेत्रात अजून भक्कमपणे रोवलेले नाहीत. त्यामुळे या साहित्याच्या वाङ्मयीन अभिवृध्दीची सध्या मीमांसा करणे न्यासंगत ठरणार नाही. हजारो वर्षांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संस्कारांचा प्रभाव घेऊनच आदिवासी साहित्य अवतरणार आहे. तेव्हा भाषेच्या दृष्टीनेही हे साहित्य तितकेसे विकसित असणार नाही. म्हणूनच भाषाशास्त्रीय आणि वाङ्मयीन कसोट्यांवर या साहित्याला आज तरी तोलता येणार नाही. सौंदर्यशास्त्रीय दृष्टीने त्याकडे बघता येणार नाही. नुकत्याच जन्मलेल्या आणि उभे राहण्याचा सराव करू पाहणाऱ्या आदिवासी साहित्याकडून सध्या तरी फार मोठ्या अपेक्षा बाळगणे चूक ठरेल.

### *२.६.१ जीवनाचे संदर्भ*

मराठी कवितेच्या अभ्यासात प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन किंवा आधुनिक, साठोत्तरी आणि समकालीन मराठी कविता अशा प्रकारे कालदृष्ट्या अभ्यासाची मांडणी केली जाते. प्राचीन कवितेने आपल्या जीवनानुभवांबरोबरच अध्यात्म आणि पारलौकिक जीवनाला विशेष महत्त्व दिले. त्याचप्रमाणे आदिवासी कवितेमध्ये आदिवासी कवींनी त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक जीवनाला महत्त्व दिले.

आदिवासी कवींना सामाजिक जीवन जगत असताना आलेले अनुभव त्यांच्या कवितांमधून दिसून येतात. तसेच त्यांच्यावर असलेला त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव व बोलीचा प्रभाव त्यांच्या कवितांमधून लक्षात येतो.



Scanned with CamScanner

## संदर्भसूची


१)डॉ.वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २००९, पृ. क्र. १.

२) तत्रैव, पृ. क्र. ११.

३) तत्रैव, पृ. क्र. ११.

४) तत्रैव, पृ. क्र. १२.

५) तत्रैव, पृ. क्र. १२.

६) तत्रैव, पृ. क्र. १४.

७)डॉ.तुमराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती - २०१२, पृ. क्र. १.

८) तत्रैव, पृ. क्र. २.

९) डॉ.वाल्हेकर ज्ञानेश्वर, उनि, पृ. क्र. १४.

१०)तत्रैव, पृ. क्र. १४.

११)तत्रैव, पृ. क्र. १५.

१२)तत्रैव, पृ. क्र. १५.

१३)तत्रैव, पृ. क्र. १५.

१४)तत्रैव, पृ. क्र. १५.

१५)तत्रैव, पृ. क्र. १५.

१६)तत्रैव, पृ. क्र. १५.

१७)तत्रैव, पृ. क्र. १५.

१८)तत्रैव, पृ. क्र. १५.

१९)तत्रैव, पृ. क्र. १५.

२०)तत्रैव, पृ. क्र. १५.

२१)तत्रैव, पृ. क्र. १५.




Scanned with CamScanner

२२)तत्रैव, पृ. क्र. १६.

२३)तत्रैव, पृ. क्र. १६.

२४)तत्रैव, पृ. क्र. १६.

२५)तत्रैव, पृ. क्र. १६.

२६)तत्रैव, पृ. क्र. १६.

२७)तत्रैव, पृ. क्र. १६.

२८)तत्रैव, पृ. क्र. १६.

२९)तत्रैव, पृ. क्र. १६.

३०)तत्रैव, पृ. क्र. १६.

३१)तत्रैव, पृ. क्र. १६.

३२)तत्रैव, पृ. क्र. २.

३३) तत्रैव, पृ. क्र. २.

३४) तत्रैव, पृ. क्र. ३.

३५) तत्रैव, पृ. क्र. २५.

३६) तत्रैव, पृ. क्र. २५.

३७)तत्रैव, पृ. क्र. २७.

३८)तत्रैव, पृ. क्र. २८.

३९)तत्रैव, पृ. क्र. २८.

४०)तत्रैव, पृ. क्र. २९.

४१)तत्रैव, पृ. क्र. १६.

४२)तत्रैव, पृ. क्र. १७.

४३)तत्रैव, पृ. क्र. १७.

४४)तत्रैव, पृ. क्र. १७.

४५)तत्रैव, पृ. क्र. १८.



Scanned with CamScanner

४६)तत्रैव, पृ. क्र. १८.

४७)तत्रैव, पृ. क्र. १८.

४८)तत्रैव, पृ. क्र. १८.

४९)तत्रैव, पृ. क्र. १९.



Scanned with CamScanner

# प्रकरण तिसरे

# आदिवासी कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती

## ('आगाजा'च्या संदर्भात)



Scanned with CamScanner

# प्रकरण तिसरे

## आदिवासी कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती

## ( ' आगाजा'च्या संदर्भात )

---

३.१ आदिवासी कविता

३.२ आदिवासी कवितेचे स्वरूप

३.३ आदिवासी कवितेचे विशेष

३.४ आदिवासी कवितेची प्रेरणा ( 'आगाजा'च्या संदर्भात )

३.५ आदिवासी कवितेचा आशय ( 'आगाजा'च्या संदर्भात )

३.६ आदिवासी कवितेतील आदिवासी जाणिवा

३.७ आदिवासी कवितेतील जाणिवांचे वेगळेपण ( 'आगाजा'च्या संदर्भात )



Scanned with CamScanner

# प्रकरण तिसरे

# आदिवासी कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती

## ( ' आगाजा 'च्या संदर्भात )

## ३.१ आदिवासी कविता

आदिवासी आणि काव्य यांचा फार जवळचा संबंध आहे. आदिवासी सर्वात प्रथम बोलला तो काव्यांतूनच. जीवनात येणाऱ्या विविध प्रसंगांना धैर्याने तोंड देतांनाच त्याच्या तोंडून काव्यही तेवढ्याच सहजतेने बाहेर पडले आहे. प्रसंगानुरूप काव्यनिर्मिती करणारा आदिवासी केवळ रचियताच नाही तर तो गायक आणि नर्तकही आहे. गाणे, वाजविणे आणि नाचणे हे तर त्याच्या रक्तातच भिनलेले आहे. अनेक अनामिक आदिवासींच्या काव्यरचना काळाच्या उदरात गडप झाल्या व काही हाती लागल्या. त्यांना आपण ' लोकगीते ' म्हणून संबोधतो. काव्याच्या निर्धारित कसोट्यांवर ती उतरत नसली तरी ' सहजस्फूर्त प्रगटन ' असे त्यांचे वर्णन करता येईल. **'Poetry is the spontaneous flow of feelings '**[१], या विधानानुसार आदिवासींच्या पारंपरिक रचनाही या कविता ठरतात. प्रसंग कोणताही असो, त्याला अनुसरून आदिवासींची काव्यरचना आहेच. केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण भारतातील आदिवासी जमातींनी आपले हे मूलधन जिवाच्या मोलाने जपून पिढी दरपिढी हस्तांतरित करीत वर्तमानाच्या दारापर्यंत आणून पोहोचविले आहे. त्यांच्या या मूलधनाची झिरपणे आजही सुरू आहे. आदिवासींच्या पारंपरिक लोकगीतांचा अभ्यास व संग्रह अनेक मान्यवरांनी करून पुस्तकेही प्रसिध्द केली आहेत.

आदिवासींच्या प्राथमिक गरजाही पूर्ण झालेल्या नाहीत. व्यवस्थेनेही त्यांना उपेक्षित ठेवले आहे. सोयी, सवलती, सुविधांपासून आजही चार हात लांबच आहे. या सर्व बाबींचा ही कविता समाचार घेताना दिसते. आदिवासी हाल, दुःख, दारिद्र्य, उपासमारीने होणारे कुपोषण आणि कुपोषणातून होणारे अनेक आजार हे सर्व सोसत व्यवस्था बदलेल आणि पोटाला पोटभर जेवण मिळेल या आशेवर तो आजतगायत जिवंत आहे. केविलवाण्या अवस्थेत आदिवासी स्त्री जगताना दिसते. आदिवासी स्त्रियांचे अनेक प्रश्न आहेत. आदिवासी समाज आजही गुलामीचे जीवन जगत आहे. त्यात आदिवासी स्त्री गुलामांची गुलाम म्हणून प्रचंड अवहेलना, मानसिक, शारीरिक, लैंगिक अत्याचाराला बळी पडत आहे.



Scanned with CamScanner

आजही आदिवासी स्त्री म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेतील जनावरांच्या वासनेची भूक भागवण्याचे एक साधन समजले जाते. हे वास्तव आदिवासी कवितेतून दिसून येते. याविरूध्द ही कविता आवाज उठवताना दिसते. आदिवासी कवितेबद्दल विनायक तुमराम म्हणतात, " विद्यापीठीय व शालेय अभ्यासक्रमात आज 'आदिवासी कविता' रूजू झाली आहे. उद्या ती विश्वपातळीवर जाईल ही अभिमानाची गोष्ट आहे. हजारो वर्षांचे मुकेपण आज कवितेने सन्मानित झाले आहे, हे दृष्टीआड करण्यासारखी घटना नव्हे. या वाङ्मयीन यशाचे शिल्पकार हे गतकालीन आहेत. आदिवासी कवी आज ताकदीने व स्वयंस्फूर्तीने लिहू लागला आहे. स्वयंतेजाने चमकू लागला आहे. धनदांडग्या व मुजोर वर्गाशी आम्हीही आवाज चढवून बोलू शकतो, असा विश्वास या कवींनी पेरला आहे " [२] असे गौरवोद्‌गार विनायक तुमराम काढतात. आदिवासी कविता किती प्रगल्भ आहे, तिची दिशा व गती अचूक आहे हेच यावरून सिध्द होते. आदिवासी कविता ही मानवी चेहरे वाचणारी कविता आहे. या कवितेला रानगंध असल्याची सतत जाणीव होत राहते. आदिवासी कवितेची भाषा आणि शैलीसह सर्वच स्तरांवर तिची वेगळी ओळख आहे. आदिवासींची स्थिती-गती, दशा-दिशा, त्यांच्या जीवघेण्या समस्या, भावभावना, आशाआकांक्षा, दु:ख, वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्या मानसिकतेसकट सर्व जीवन-व्यवहारांवर अधिसत्ता गाजवणारी अदृश्य दहशत व तिच्याविरूध्द उफाळणारा संताप, नकार हे सर्वच या कवितेने व्यवस्थेपुढे मांडले आहे.

आदिवासी कवितेला मोठा सशक्त, सामर्थ्यशाली ऐतिहासिक वारसा आहे. आदिवासींच्या कंठात आकारलेल्या व त्यांच्या शेकडो पिढ्यातील लोक-गायकांनी जिवाभावाने जोपासलेल्या पारंपरिक लोकवाङ्मयाचा ती धनी आहे. भारत देश जसा विविधतेने नटलेला आहे असे आपण म्हणतो, तसाच तो अनेक जाती-धर्मांचा आणि माणसांना गुलामीत ठेवणारांचाही हा देश आहे. हे आदिवासी कवी विसरलेला नाही, तरीही काही आदिवासी बांधवांची फसवणूक आजही भारतात राजरोसपणे चालू आहे. त्याला पुन्हा कायद्याचा आधार घेतला जातो. मात्र, आदिवासी समाज या स्थितीला मूकपणे पाहण्याशिवाय काहीच करू शकत नाही. भारताच्या नकाशावरचे त्यांचे अस्तित्व सपुष्टात आणू इच्छिणारे या देशात कमी नाहीत. म्हणून आदिवासी कविता सावध होऊन आदिवासी बांधवांना येणाऱ्या भयावह अंधाराची जाणीव करून देत आहे एकूणच या प्रकरणामधून आदिवासी कवितेचा आशयात्मक अभ्यास करावयाचा आहे.



Scanned with CamScanner

## ३.२ आदिवासी कवितेचे स्वरूप

**आदिवासी** साहित्य मुळातच आदिम संस्कृतीचे साहित्य आहे. त्यात पुन्हा आदिवासी कविता इतर वाङ्मयीन प्रकारांपेक्षा अधिक सामर्थ्यवान दिसून येते. तिने आदिवासी जीवनाचा अधिक जीवनपट व्यापला आहे. आदिवासींचे एकूण जीवन राहणीमान, चालीरीती, परंपरा, सांस्कृतिक वारसा अशा अनेक प्रकारांत आदिवासी कवितेचे स्वरूप आपणास पाहायला मिळते. एकूणच या कवितेने आदिवासींच्या प्रत्येक अंगाचा आविष्कार केला आहे. आदिम जगणे हे आदिवासी कवितेचे महत्त्वपूर्ण स्वरूप म्हणता येईल. आदिवासी कविता ही निसर्ग कविता आहे, ती निसर्गप्रिय माणसाची, समाजाची, जमातीची कविता आहे. डोंगर-दऱ्या, जंगल हे या कवितेचे आधारस्तंभ आहेत.

आदिवासी सुख-दुःखांचे संदर्भ वेगळे आहेत. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह वेगळा ठरतो. या व्यथा-वेदनांची अभिव्यक्ती सुरूवातीला प्राथमिक स्वरूपात व विखुरलेपणाने निर्माण झालेली दिसते. आदिवासी समाज हा नागर समाजापासून दूर दुर्गम भागात वास्तव्य करून राहतो. त्यामुळे जगाच्या आधुनिक विकासापासून, भौतिक सुविधांपासून वंचित राहिला. आदिवासीमध्ये शिक्षणाचा प्रसार जसजसा झाला. तसतशा त्यांच्या भावना कवितेद्वारे व्यक्त झाल्या आहेत. गावापासून दूर आदिवासी स्वच्छंद जीवन जगणाऱ्या आदिवासींना आत्मभान आल्याने तरूण पिढीकडून साहित्य निर्मिती होत आहे. आदिवासींच्या साहित्याला वेगळेपणाचे वैशिष्ट्यपूर्ण कंगोरे आहेत. जमातनिहाय संस्कृतीच्या पातळीवरचे अनुभव भिन्न आहेत. बोलीभाषा, रीतिरिवाज वेगळे आहेत. आदिवासींच्या बोलीभाषेतील शब्दकळा आणि प्रतिभा सृष्टीने आदिवासी कविता बहरलेली आहे. याविषयी माहेश्वरी गावित म्हणतात, " एखाद्या वाङ्मयीन प्रवाहात विपुल प्रमाणात लक्षणीय साहित्यनिर्मिती होते. वेगळ्या जाणिवा, प्रेरणांतून साहित्यकृती निर्माण होतात. तेव्हा त्या साहित्य प्रवाहाची प्रगती व विकास घडतो. आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याचा विचार करता कविता या साहित्य प्रकारात साहित्य निर्माण होत असल्यामुळे हे दालन समृध्द झालेले दिसते. कथा, कांदबरी, नाटक, आत्मचरित्र या साहित्य प्रकारात कवितेच्या तुलनेत कमी साहित्य निर्माण झालेले दिसते. " [३] आदिवासी कवितेच्या व्याप्तीची कल्पना या विश्लेषणावरून कळण्यास नक्कीच मदत होते. म्हणूनच आदिवासी कवितेचे स्वरूप इतर आदिवासी वाङ्मयापेक्षा नक्कीच व्यापक आहे. यावरून आदिवासी कवितेची परंपरा खूप मोठी आहे असे जाणवते. १९७५ नंतर आदिवासी कविता बहरलेली दिसते. याअगोदर



Scanned with CamScanner

महादेव गोपाळ कडू व गंगाराम जानू आवारी यांनी 'आदिवासींची लोकगीते' नावाचे पुस्तक सन १९५७ मध्ये प्रसिध्द केले. त्याचबरोबर काही आदिवासी संतकवींची भक्तिकाव्यात्मक रचनाही या कालखंडात निर्माण झालेली दिसते. " संत मंगशुजी महाराजांचे साक्षात्कारी आत्मदर्शन, ' सुबोध भजनावली ' आणि ' आत्मप्रकाश भजनावली ' ही भक्तिकाव्यात्मक रचनांची पुस्तके १९५५-५६ मध्ये प्रसिध्द झाली. त्यानंतर सुखदेव बाबू उइके यांचे ' मेटा पुंगार ' अर्थातच ' पहाडी फूल ' हे समाज प्रबोधनात्मक गीतांचे पुस्तक १९६२ मध्ये २ भागांत प्रसिध्द झाले. भुजंग मेश्रामांनी संपादन केलेला ' आदिवासी कविता ' हा काव्यसंग्रह १९७५ मध्ये प्रसिध्द झाला, तर महाराष्ट्रातील आदिवासी कवीचा पहिला प्रातिनिधिक कवितासंग्रह ' माहोळ ' १९८२ मध्ये प्रकाशित झाला. " [४]

गोविंद गारे, वाहरू सोनवणे, विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, व्यंकटेश आत्राम, सुखदेव बाबू उइके, उत्तम घोंगडे, माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, प्रभू राजगडकर, दशरथ मडावी, उषाकिरण आत्राम, वामन शेळमाके, पुरूषोत्तम शेडमाके, ल.सु. राजगडकर, दामोदर इळपाते, सुभाष आडे, सुरेश धनवे, अमित गिरडकर, रवी कुरसंगे, वसंत कनाके, कुसुम आलाम, सुनील कुमरे, कृष्णकुमार चांदेकर, संघजा मेश्राम, सोपान सुरकुले, गोविंद गायकी, दादाराव डोलारकर, प्रबह्मानंद मडावी, जीवन गेडाम इत्यादी महत्त्वाच्या आदिवासी कवी, कवयित्रींचा उल्लेख आदिवासी कवितेच्या निमित्ताने करावा लागतो. वरील कवी-कवयित्रींनी आदिवासी कवितेलाच नव्हे, तर एकूण मराठी कवितेला एक सामर्थ्य देऊन वेगळी दिशा दिली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी काव्यसंग्रहांचा देखील उल्लेख करणे अगत्याचे ठरेल ते याप्रमाणे- पाखरं, वाळवण, रानपाखरांची संसद, माझी सनद कुठे आहे ? रान आसवांचे तळे इ. कवितासंग्रह महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर इतरही आदिवासी कवितासंग्रह अभ्यासपूर्ण आहेत.

आदिवासी कविता विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आली, परंतु तिचे स्वरूप फार पूर्वीचे अर्थातच आदिम आहे. शिक्षणापासून कोसो दूर व यातच भाकरीचा प्रश्न पिच्छा सोडत नव्हता, परंतु प्रतिभा मूळची सोबती असल्याने आणि निसर्ग, जंगल, नद्या, दऱ्याखोरी, शेतीनिष्ठा, मानवी मूल्यांची जोपासना या समाजामध्ये पूर्वीची दिसून येते. त्यामुळे आपले अनुभव आपल्या शब्दांत दमदारपणे मांडण्याचा प्रयत्न या काळात आदिवासी कवींनी केलेला दिसून येतो. आदिवासी कविता अशा कालखंडात उदयास आली की, ज्याकाळात भारतातील लोकशाही अस्थिर बनली होती. प्रस्थापित समाज हवालदिल झाला



Scanned with CamScanner

होता, परंतु येथील आदिवासी न डगमगता कवितेतून तो येथील समाज संघटित करीत होता. आदिवासी कवितेच्या स्वरूपाचा विचार करताना प्रामुख्याने आदिवासी ज्या ठिकाणी राहिला, जगला त्या निसर्ग, नदया, दऱ्याखोऱ्या, जंगल, प्राणी, शेती, शिकार, आदिम संस्कृती, आदिम देवता, पराक्रमी महापुरूष, सण-उत्सव, विधी यांच्याविषयी विचार करावा लागतो.



Scanned with CamScanner

## ३.३ आदिवासी कवितेचे विशेष

आदिवासी कवितेचा अभ्यास करताना आदिवासी कवितेच्या प्रेरणा, आदिवासी कवितेचे स्वरूप इ. गोष्टीचा अभ्यास तर करावाचा लागतो. त्याचबरोबर आदिवासी कवितेचे विशेष कोणते याचा देखील विचार करावा लागतो. आदिवासी कवितेचे विशेष लक्षात घेताना खालील मूद्यांचा विचार करावा लागेल.

१) कवितेचे आधारस्तंभ - निसर्ग

२) आदिम जीवन

३) आदिमांचे वास्तव

४) आदिवासी स्त्री जीवन

५) बोलीभाषा

६) आदिम संस्कृतीचे प्रकटीकरण

७) सामाजिक संवेदनशीलता

### १)कवितेचे आधारस्तंभ - निसर्ग

आदिवासी समाज निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे त्यांचे निसर्गाशी आत्मीयतेचे भाव/संबंध आहे. त्यामुळे आदिवासी कवितेमध्ये निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून आदिवासी कवितेचे आधारस्तंभ निसर्ग आहे. आदिवासी कविता ही प्रामुख्याने निसर्ग कविता आहे असे म्हणता येईल.

### २) आदिम जीवन

आदिवासी कवितेमध्ये जसे निसर्गाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्याचप्रमाणे आदिवासींचे जीवन हा घटक देखील आदिवासी कवितेमध्ये महत्त्वाचा आहे. या कवितांमधून आदिम जीवन कसे असते. हे लक्षात येते.

### ३) आदिमांचे वास्तव जीवन

आदिवासी कविता दु:ख, संकट, शोषण, पिळवणूक, उपेक्षित जीवन येथील प्रस्थापितांविरूध्द विद्रोह पुकारताना त्यांचे वास्तव जगणे जगासमोर आणण्याचे काम करते.



Scanned with CamScanner

### ४) आदिवासी स्त्रीचे जीवन

आदिवासी स्त्रियांना जीवन जगताना प्रचंड अवहेलना, मानसिक, शारीरिक अत्याचाराला बळी पडावे लागते. आदिवासी स्त्रियांचे दु:ख मांडण्याचे काम आदिवासी कविता करते. आदिवासी स्त्रियांच्या भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणजे आदिवासी कविता आहे असे म्हणता येईल.

### ५) बोलीभाषा

आदिवासी कवितेचे विशेष म्हणजे आदिवासी कवितेत येणारी आदिवासींची बोलीभाषा. आदिवासी कवितेमध्ये आदिवासी बोलीतील शब्द, म्हणी आदींचा मोठ्या प्रमाणात वापर होतो.

### ६) आदिम संस्कृतीचे प्रकटीकरण

आदिवासी संस्कृतीचे प्रकटीकरण करण्याचे काम आदिवासी कविता करते.

### ७) सामाजिक संवेदनशीलता

आदिवासी कविता सामाजिक संवेदना प्रकट करते. आधुनिक काळात जो प्रगत समाज आदिवासीविषयी जी कोरडी बांधीलकी व्यक्त करतो आहे, त्याचा उपहासही कविता व्यक्त करते.



Scanned with CamScanner

## ३.४ आदिवासी कवितेची प्रेरणा ( ' आगाजा 'च्या संदर्भात )

आदिवासी कवितांचे प्रमुख प्रेरणास्थान निसर्ग आहे. विनोद कुमरे यांच्या ' आगाजा ' कवितासंग्रहाचा विचार केला तर 'आगाजा' कवितासंग्रह निर्मितीमागील प्रेरणा खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) अरण्याविषयी प्रेम - एक प्रेरणा

२) भुजंग मेश्राम यांच्या कविता

३) स्त्री प्रश्न

४) बिरसा मुंडा यांचे कार्य

५) तंट्या भिल्ल यांचे कार्य

६) आधुनिकीकरण

### १) अरण्याविषयी प्रेम - एक प्रेरणा

कवी विनोद कुमरे यांच्या ' आगाजा ' कवितासंग्रहाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, जवळपास प्रत्येक कवितेमध्ये अरण्य/जंगलाविषयी माहिती आली आहे. यातून त्यांचे अरण्यावर असलेले प्रेम समोर येते. म्हणून अरण्य ही त्यांची कविता निर्मितीमागील प्रेरणा आहे.

### २) भुजंग मेश्राम यांच्या कविता

' आगाजा ' कवितासंग्रहाचा अभ्यास करताना असे लक्षात आले की, कवी विनोद कुमरे यांचे प्रेरणास्थान भुजंग मेश्राम आहेत. कारण विनोद कुमरे यांच्या कवितांवर क्रांतिकारी कवी भुजंग मेश्राम यांच्या कवितेचा प्रभाव अधिक जाणवतो.

### ३) स्त्रीचे प्रश्न

जीवन जगताना स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. स्त्रियांचे प्रश्न ' आगाजा ' कवितासंग्रहातील काही कवितांमधून समोर येतात. म्हणून स्त्री प्रश्न ही एक ' आगाजा ' कवितासंग्रहाच्या निर्मितीमागील प्रेरणा आहे असे म्हणता येईल.



Scanned with CamScanner

### ४) बिरसा मुंडा यांचे कार्य

क्रांतिसूर्य बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाचे प्रमुख नेते होते. त्यांनी आदिवासी समाजासाठी अनेक लढाया/चळवळी केल्या. या चळवळीचा व बिरसा मुंडा यांचा उल्लेख ' आगाजा ' कवितासंग्रहातील काही कवितामध्ये केला आहे. त्यामुळे कवी विनोद कुमरे यांचे प्रेरणास्थान बिरसा मुडा देखील आहेत.

### ५) तंट्या भिल्ल यांचे कार्य

विनोद कुमरे यांच्या ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये तंट्या भिल्ल यांच्या चळवळीचा उल्लेख आला आहे. म्हणून कवितासंग्रह निर्मितीमागे तंट्या भिल्ल यांची प्रेरणा आहे असे म्हणता येईल.

### ६) आधुनिकीकरण

'आगाजा' कवितासंग्रहामध्ये आधुनिकीकरणाला महत्त्वाचे स्थान आहे. इंटरनेट चे महत्त्व त्यांच्या कवितांमधून समोर येते. आधुनिक जग समोर ठेवून कविता निर्माण झाली आहे. म्हणून आधुनिकीकरण ही कविता निर्मितीमागील प्रेरणा आहे.



Scanned with CamScanner

## ३.५ आदिवासी कवितेचा आशय ( ' आगाजा 'च्या संदर्भात )

स्वातंत्र्योत्तर कालखंड परिवर्तनाचा होता. या काळात सामाजिक, राजकीय चळवळींनी नव्या विचाराने नवी तत्त्वे समाजात रूजवली. शिक्षणाचा प्रसार झाला. एक नवी दृष्टी मिळाली. शिक्षण, सामाजिक जागृती, नव्या विचारांचा परिचय, भारतीय राज्यघटनेने प्रस्थापित केलेली मूल्ये, सामाजिक चळवळ इत्यादी गोष्टींनी सामाजिक व सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडवले तसेच कला व साहित्याच्या क्षेत्रातही परिवर्तन घडून आले आहे. या सर्वांच्या संस्कारांनी नवशिक्षितवर्ग समृध्द झाला. ' माझे जगणे, माझे अनुभवणे व भोगणे मी माझ्या शब्दांत व्यक्त करणार ' या भावनेने तो लिहू लागला. हा तरुणवर्ग बहुजिनसी, बहुजातीय आणि बहुस्तरीय होता. आदिवासी कवितेतून प्रतीत होणारा अपूर्व आहे. मराठी साहित्यिकांनी आदिम भारताचे नाकारलेले, उपेक्षित, वंचित जनसमूहाचे दु:ख आदिवासी कवितेतून मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त होताना दिसते. नवी भाषा, नवी प्रतीके, नव्या मिथकांमधून साकार झाले आहे. पारंपरिक रूढ भाषासंकेताला छेद देण्याचे काम या कवितेने यथार्थपणे केले आहे. आदिवासी कविता आपली साहित्यविषयक वाटचाल स्वतंत्रपणे करताना दिसते.

गोंडी भाषेतील ' आगाजा ' या शब्दाचा अर्थ आवाहन असा होतो. महाराष्ट्रामध्ये ४७ जमाती आहेत. त्यापैकी गोंड ही जमात प्रमुख जमात आहे. त्यांची बोलीभाषा गोंडी आहे. गोंडी बोलीभाषेला स्वतंत्र लिपी आहे. विनोद कुमरे हे गोंडी जमातीतले. एका भूमिहीन शेतमजूर कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अर्थातच त्यांची मातृभाषा गोंडी आहे. म्हणून त्यांच्या कवितांवर गोंडी भाषेचा प्रभाव आहे. या भाषिक प्रयोगशीलतेमुळे कुमरे यांची कविता आदिवासी जीवनानुभवातील अस्सलपणा सहज टिपते.

आदिवासी समाजाला काहीशा अपरिचित जागतिकीकरणाच्या नव्या शोषण व्यवस्थेला ' आव्हान ' देणारी कुमरे यांची कविता स्वत:चे वेगळेपण निश्चितपणे सिध्द करणारी आहे. मी सत्ताधारी, मी कायदा लादणारा प्रशासक इ. 'स्वयंघोषित'पणाचा जुलूम जबरदस्तीचा नवा अर्थ प्रस्तुत कवितेतून साकार झाला आहे. अरण्यपासून बेदखलपर्यंत अशा एकूण २८ कवितांचा समावेश प्रस्तुत संग्रहामध्ये आहे. आधुनिकीकरणाच्या गतिमान पेचात अडकलेल्या सर्वसामान्य आदिवासी समूहाची व्यथा उलगडणारी कविता असे कुमरे यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य सांगता येईल. आदिवासींच्या वर्तमान कालातील सामाजिक जीवनाचे सखोल



Scanned with CamScanner

चिंतन केलेले या संग्रहातून जाणवते. आदिवासी कवितेचा आशय ( 'आगाजा'च्या संदर्भात ) खालील मुद्यांच्या आधारे अभ्यासता येते.

१) आवाहनाची कविता

२) निसर्ग कविता

३) नकार व स्त्री अत्याचारविषयक कविता

४) संघर्षशीलता

५) प्रश्नार्थक कविता

६) संस्कृतीविषयक कविता

७) सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक आढावा घेणारी कविता

८) परंपराविषयक कविता

## १) आवाहनाची कविता

आदिवासी कविता ही आवाहनाची आहे, तो तिचा आत्मबिंदू आहे. या कवितेतून आपल्या समाजबांधवांना एक प्रकारचे आवाहन केले आहे.

*" मार्क्स जंगला - जंगलात जाऊन बोलला,*
*या अरण्यावेटावरही लिहिता येतील अक्षरं ओळी*
*मांडता येईल त्याच्याही उद्ध्वस्तपणाचा इतिहास*
*सांगता येईल माण्सं जगातून हद्दपार झाल्याचं पुराण*
*करता येईल युध्द पुंजीवादी विचारांशी*
*मोडता येईल बंदुकीच्या जोरावर नपुंसक रूढी*
*पण अरण्य असू दे अभय जनावरांसाठी !*
*गाव - शहरांची झालीत जंगलं पुंजीवाद्यांची कुरणं*
*पुन्हा एकदा होऊ दे क्रांती जंगलापासून*
*गाव आणि जंगलात वसू दे समता - बिमता !*
*आणि बंदूक पण असू दे साथीला*



Scanned with CamScanner

*बंदुकीशिवाय नाही देव आणि धरम - बिरम*

*जग झालं आता एक बाजारपेठ*

*बाजार सूत्रं बाजार बसवे घुसखोर अट्टल*

*मात्र हे अरण्यबेट असू दे शाश्वत*

*बेटावरच्या माण्सांनाही असू दे शाश्वत*

*त्याशिवाय कशी खेळणार क्रांती - विंतीची चळवळ"* [५]

कवी विनोद कुमरे यांच्या ' आगाजा ' कवितासंग्रहातील ' अरण्य ' या कवितेतील वरील ओळी आहेत. या कवितेतून कवी विनोद कुमरे यांनी मार्क्सचे उदाहरण देऊन आदिवासी बांधवांना अरण्याच्या संरक्षणासाठी क्रांती करण्याचे आवाहन केले आहे. अरण्य अभय जनावरांसाठी असू द्या व त्यासाठी आदिवासी बांधवांनी प्रयत्न केले पाहिजेत असा आशय वरील ओळीतून व्यक्त होतो. तसेच ' आगाजा ' कवितासंग्रहातील ' लढा ' या कवितेतील काही ओळी आदिवासींना आवाहन करताना दिसून येतात.

*" तो म्हणाला*

*आम्ही आता अंगभर कापडं घातली पाहिजेत*

*जंगलातल्या वाटेवरच्या काट्यांना धडा शिकवला पाहिजे*

*शिकलं पाहिजे शिकवलं पाहिजे*

*जागा कन्व्हर्ट करणाऱ्यांना*

*बोगस व्हॅलिडिटीच्या विरोधात*

*लढा उभारला पाहिजे*

*आपली अस्मिता जपली पाहिजे*

*आपल्या हक्कांसाठी लढायला शिकलं पाहिजे "* [६]

या कवितेतून असे लक्षात येते की, आदिवासी जमातींमध्ये बोगस आदिवासी समाविष्ट होण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी आदिवासी समाजाने एकत्र येऊन बोगस व्हॅलिडिटी



Scanned with CamScanner

विरोधात लढले पाहिजे असे आवाहन कवी विनोद कुमरे आदिवासी बांधवांना करताना या कवितेच्या माध्यमातून दिसतात.

## २) निसर्ग कविता

आदिवासी कवितेमध्ये निसर्गाला महत्त्वाचे स्थान आहे. ' आगाजा ' कवितासंग्रहातील ' अरण्य ' या कवितेतील काही ओळी अरण्य आणि आदिवासी यांचे नाते चित्रित करतात.

*" काल दिमाखात या अरण्याच्या टेकडावर*

*उभा असणारा*

*माणूस आज करतोय चौकीवर चाकरी*

*मिळो अगर ना मिळो पोटासाठी भाकरी*

*' नाळ ' म्हणतात ती  अशीच गोष्ट असावी का ?*

*की त्याचा सुटता सुटत नै अरण्यातला जीव "*[७]

आदिवासींच्या वाड्या-पाड्यांवर बुलडोझर चालवून तिथे 'लवासा'सारख्या शहरांची निर्मिती होत आहे. या कथित विकासप्रक्रियेत आदिवासी माणूस मात्र हतबल होत आहे. प्राचीन काळापासून त्यांचं शोषण अनेक प्रकारे झालं. कधी अनुल्लेखाने त्यांचा अपमान करण्यात आला तर कधी त्यांचा अतोनात छळ झाला. आज तर त्यांना जंगलावरील हक्कांपासूनही वंचित ठेवण्यात येत आहे. विकासाच्या नावाखाली, कायद्यांच्या धाकाने आदिवासींच जंगलापासून जाणिवपूर्वक विस्थापन करण्यात येत आहे. ते पण पुनर्वसन न करता. आदिवासी समाजासमोर कुठे राहायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आदिवासी समाजाला निसर्गाच्या सान्निध्यात राहायला आवडत असले तरी कायद्याच्या भीतीने अरण्य सोडावे लागत आहे. त्यामुळे आदिवासी बांधव दुखावला गेला आहे.

*" हे अरण्य बेट*

*बदलतंय परिवर्तनाच्या चळवळीत*

*घडवत नेतं माणसांच्या प्रवृत्तीचं स्खलन*

*आता जंगलात माणसं कुठंच नाहीत शिल्लक*

*मोठी हेडलाईन भूकबळी अथवा नक्षलबळी*



Scanned with CamScanner

*महारोगासारखं पसरलेलं हे विचारांचं ग्लोबलायझेशन*

*अरण्यबेट सोसत राहतं आर्त किंकाळ्या*

*झाडापानांवर पेरलेली अवकाळी सुरूंगफळं*

*आणि परिवर्तनाच्या चळवळीत रापलेलं अरण्य बेट "*[८]

## ३) नकार व स्त्री अत्याचारविषयक कविता

आदिवासी कवितेचे नकार, विद्रोह हे एक आशयसूत्र आहेत. आदिवासी कवितेने विषमतेला नकार दिला आहे. जातिव्यवस्थेला, मानवतेच्या विकासाला आड येणाऱ्या गोष्टींना नकार दिला आहे. केवळ नकार देऊनच थांबत नाही, तर त्याविरूध्द विद्रोह प्रकट करताना दिसते. आदिवासी कवितेचा नकार येथील गुलामी, फसवणूक, अन्याय-अत्याचारांविरूध्द आहे. हा नकार व विद्रोह अहिंसक आहे. वाईटातून काही तरी चांगले घडावे म्हणून हा नकार व विद्रोह माणसाला माणूस न मानणाऱ्या प्रवृत्तीविरूध्द आहे.

' आगाजा ' कवितासंग्रहातील ' पाच ' ही कविता स्त्री अत्याचारांवर आधारित आहे. आदिवासी समाजातील अज्ञान व त्यामुळे झालेली फसवणूक हा आशय 'पाच' या कवितेचा आहे. ' पाच ' ही कविता भावनिक आवाहन करणारी आहे.

## ४) संघर्षशीलता

ज्याप्रमाणे आदिवासी कविता क्रांतीची आहे, तशीच ती संघर्षशील आहे. हे 'आगाजा' कवितासंग्रहातील अरण्य, फेसबुक, बेदखल आदी कवितांमधून लक्षात येते. ' फेसबुक ' कवितेमधून भूकबळीचा मोठा प्रश्न लक्षात येतो. आदिवासी जंगलात, निसर्गात राहत असताना त्याला अनेक वेगवेगळ्या संकटांना सामोरे जावे लागते. त्याचा संघर्ष भाकरीसाठी, आरोग्यासाठी, डोक्यावरील छत्रासाठी चालला आहे.

## ५) प्रश्नार्थक कविता

प्रश्नार्थक कविता हे आदिवासी कवितेचे आशयसूत्र म्हणता येईल. आदिवासी कविता आता केवळ वेदना, दुःख व्यक्त करीत नाही, तर त्याही पुढे जाऊन स्वतःला, आदिवासी समाजाला, प्रस्थापित समाजाला, जुलमी व्यवस्थेला ती अनेक प्रश्न विचारून भांबावून सोडते आहे. 'आगाजा' कवितासंग्रहातील 'निसटती' ही कविता याच आशयसूत्रात बसणारी आहे.



Scanned with CamScanner

*" लोक बोलत राहतात चारचौघं जमले की,*

*तो म्हणाला, आवेशात*

*आमचं एनजीओ आहे म्हणून हे जंगल टिकलं बघा*

*हे डोळ्यानं दिसतं हे !*

*हे आदिवासी हे झाडं तोडतात एका दारूच्या*

*बाटलीत लोकांसाठी*

*मीच चार पाचदा पकडून दिलं पोलिसांना*

*त्यावर मी विचारलं*

*मग या आदिवासींनी लाकडाचे जंगी वाडे किंवा घरं*

*उभी केली असतील या जंगलात ?*

*या प्रश्नावर त्याला काही बोलता आले नाही*

*ते अजूनही फाटक्या झोपड्यातच राहतात*

*केव्हापासून !*

*एवढंच त्याला सांगता आलं. "*[१]

या ओळींच्या मदतीने कुमरे यांनी समाजासमोर प्रश्न निर्माण केला आहे.

## ६) संस्कृती विषयक कविता

आपल्या आदिम काळापासून चालत आलेल्या मूळ प्रवाहापासून आपण दुरावत चाललो. आपली संस्कृती, भाषा, चित्र - नृत्यकला इत्यादीपासून वेगळे होत चाललोत ही खंत कुमरे यांची कविता व्यक्त करते. ' होमलॅण्ड ', ' निसटती ', ' रस्ता संपता सपत नाहीए ', ' पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट ' यांसारख्या कवितांतून आदिवासींच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडते.

'सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय' यासारख्या कवितेमधून कवीने पुरूषप्रधान संस्कृतीवर अत्यंत मार्मिक पध्दतीने भाष्य केले आहे. ' शूर्पणखा ', ' हेडंबा ' या प्राचीन काळातल्या आदिवासी वीरांगना. मातृसत्ताक कुटुंब पध्दतीच्या संस्कृतीमधील शूर अशा स्त्रिया आहेत ज्यांची पुरुषप्रधान संस्कृतीमुळे प्रचंड अवहेलना झाली. विनोद कुमरे यांनी '



Scanned with CamScanner

सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय ' या कवितेतून भिन्न काळातील स्त्रियांचा संवाद अत्यंत प्रयोगशील पध्दतीने घडवून आणला आहे.

*" बाई सुरपनखे हाय*

*एस् एम् एस् लेयन्याचे कारण का*

*दंडकारन्यात घुसले वनवास्ये*

*आता नाय देता येत कस्याचा भरोवसा*

*दादो लर्कानेश्वराले सांगतो*

*राहय म्हणा संभालून घेऊ नकु कोन्ती रिस्क*

*आन् तू पण घे कायजी*

*पडू नको इरेस*

*लर्कान्याची शान बाई सुरपनखे तुले आन*

*भुलू नोको नाक - नक्षावाल्या गोऱ्या माण्सायले !*

*व्हॉट्सअप ठेव ऑन "* [१०]

## ७) सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक आढावा घेणारी कविता

आदिवासींच्या समृध्द अशा सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक आढावा कुमरे यांच्या कवितेतून अत्यंत अर्थबध्द पध्दतीने घेतल्याचे दिसून येते. आदिवासींच्या परिसरात जेव्हा वनवास्ये, फिरंगे, व्यापारी इ. लोक घुसतात तेव्हा आदिवासींचे अस्तित्व धोक्यात येते. याविषयीची कुमरे यांची ' झेल ' ही कविता अत्यंत बोलकी वाटते.

*" अरे ये साला...आदेवासी...*

*ले...ले...पावडर...इस्नु...ले...ले...कंगी*

*एक शेर कुटकी में...ले...ले किलिप*

*एक किलो जेवारी में ले...ले किरिम...*

*एक बाटली सयद के बदले...*

*ले ले रिबिन...*



Scanned with CamScanner

*लाल लाल रिबिन...पिला पिली रिबिन..." [११]*

अशा प्रकारे किरकोळ व्यापारी वर्गापासून भांडवलदार वर्गापर्यत सर्वांनीच आदिवासींच्या व्यावहारिक अज्ञानाचा पुरेपूर फायदा घेतला.

## ८) परंपराविषयक कविता

आदिवासी समाजामध्ये 'मोहा'च्या दारूला पवित्र मानण्याचा प्रघात आहे. गर्भधारणेपासून तर अंत्यविधीपर्यतच्या सर्व धार्मिक संस्कारात मोहाच्या दारूला विशेष स्थान दिले गेले. जो दारू पीत नाही तो आदिवासी नाही. हे ' ढोल्या ' या कवितेतील काही ओळीवरून लक्षात येत.

*" परसंग मंजे*

*ढोसा मोवाची आन् ढोल, डफावर थाप*

*एवडावं पे मनला*

*म्या मनलं ' नाई पेत '*

*मनला ' तू कसा बे गोंड '*

*मोवाची मंजे टानिक*

*आपल्या मोठ्या दयेवाचं आवषिद्*

*पोळाची पोई दे मनलं तवा*

*खिस्शातला पोवा हातावर देल्ला*

*खि...खि...खि...हास्ला..." [१२]*

आदिवासी समाजामध्ये नवं स्वीकारायला कठीण जातं आणि जुनं नाकारायला जिवावर येतं. अशा मन:स्थितीमध्ये आजचा आदिवासी समाज जगत आहे. अशा मानसिकतेमधून तो वेळीच सावरला तर त्यांचा सामाजिक विकास होईल असे कवीला वाटते.



Scanned with CamScanner

## ३.६ आदिवासी कवितेतील आदिवासी जाणिवा

आदिवासी जाणिवेविषयी कवी भुजंग मेश्राम म्हणतात, " सर्वसाधारणपणे आपल्याकडे डिग्रांच्या पुंगळ्या धारण केलेला, चार बुकं शिकलेला व संपादित यशावर गर्वाचे निशाण लावणारा तो विद्वान मानला जातो, पण जगण्या-मरण्याची, समष्टीची, घळीची सांगोपांग माहिती असणारा आणि त्याचा कुठलाही गर्व न बाळगणारा आदिवासी अडाणी ठरवला जातो. या पार्श्वभूमीवर ' आदिवासी जाणीव ' तपासून घ्यायला हवी. " [१३] कवी भुजंग मेश्राम चिकित्सक पध्दतीने आदिवासी जाणिवेचा विचार करतात. प्रबळ समूह हा उपभोक्तावादी ग्राहक आहे. याउलट निसर्गाच्या अन्नसाखळीच्या समतोलावर जगणारा आदिवासी आहे. तो ' शेअर ॲण्ड केअर ' या भावनेतून निसर्गाकडे बघतो. ' ट्रस्टी ' म्हणून जगतो. प्रबळ समूह महत्त्वाकांक्षी आणि सत्ताकेंद्री असल्याने तो अतिक्रमण करणारा होतो.

आदिवासींची मूल्यव्यवस्था स्वयंशासित आणि लोकाभिमुख आहे, तर प्रबळ समूहांची व्यक्तिवादी, औद्योगिक विकासाचे गणित मांडणारी आणि निसर्गाच्या साधनावर ऐश्वर्याचा स्वर्ग उभारणारी आहे. ग्लोबलायझेशनच्या टोळधाडीला आदिवासी जाणीवच अधिक सक्षम ठरणार असून फुले-आंबेडकरी व्यूहरचनेची विचारशास्त्रे त्या संघर्षासाठी अत्यंत अचूक ठरण्यासाठी चळवळीचा स्वीकार करणे गरजेचे आहे.

अन्यायाला वाचा फोडणारी, सामाजिक, आर्थिक, राजकीय अन्यायाला, अंधश्रध्देला विरोध करणारी जाणीव या कवितेतून प्रकट होते. दैववाद, भोळेपणा, गुलामगिरी, दुष्ट परंपरा यांच्याविरूध्द बंडाला, लढ्याला उद्युक्त करणारी ती आदिवासी जाणीव होय. यातून वास्तव दर्शन घडवणारे साहित्य ते आदिवासी साहित्य होय, हीच आदिवासी कवितेची जाणीव आहे. आदिवासी कविता केवळ आदिवासींसाठीच नव्हे तर सर्वच उपेक्षितांसाठी, वंचितांसाठी, दु:खितांसाठी, शोषितांसाठी अवतरलेली आहे. जे माणसाला महत्त्वाचे मानतात त्या सर्वांसाठी आहे.आदिवासी जाणिवेला हजारो वर्षाची परंपरा आहे. ती जल, जंगल, जमीन अनुरूप अशी मूल्यव्यवस्था आहे. तसेच बाजाराचे विनिमय टाळणारी आहे. आदिवासी जाणीव ही हिंसेवर विश्वास नसणारी आणि अहिंसा मनापासून जपणारी, समूहमनाची एक जीवन पध्दती आहे. तिला फुले-आंबेडकरी विचारांची जोड दिल्याने ती अधिक सबळ, डोळस आणि गतिमान झाली आहे.



Scanned with CamScanner

## ३.७ आदिवासी कवितेतील जाणिवांचे वेगळेपण ( 'आगाजा'च्या संदर्भात )

आदिवासी साहित्य, कविता यातून प्रकट होणारे जाणिवांचे अनुभवविश्व मराठी साहित्यासारखे सौंदर्यवादी, कलावादी, मनोरंजनवादी, दृष्टिकोनाचे चित्रण नाही. आदिवासी कवितेतून आदिवासीचे वनवासीपण, व्यथा, वेदना, आक्रोश, छळ, अन्याय-अत्याचार, भूक, दारिद्र्य या सर्वाचे चित्रण होते.

मराठीतील सौदर्य, शृंगार आदिवासी साहित्यात, कवितेत नाही. आदिम जीवन, संस्कृती, व्यथा-वेदना, सबंध आयुष्याचा आक्रोश हा आदिवासी कवितेचा केद्रबिंदू आहे. मराठी साहित्यकांनी नाकारले, आपल्या अनुभवांपासून आदिवासी प्रश्नांना दूर ठेवले. मराठी साहित्यिकांचा हा नाकर्तेपणा व सांस्कृतिक दरी भेदण्याचे काम प्रथम दलित साहित्याने व नंतर आदिवासी साहित्याने केले. यातूनच आदिवासी कवितेचे वेगळेपण सिध्द होते. आदिवासी कवितांतून विविध जाणिवा वेगवेगळ्या अंगाने, विविध दृष्टिकोनांतून अभिव्यक्त होतात. याविषयी विनायक तुमराम म्हणतात, " नवशिक्षित आदिमाची प्रज्ञा, प्रतिभा आदिम वेदनेशी नाते जोडण्यास धजावत आहे. पुराण मूल्यांना जाणीवपूर्वक नकार देणारी नवी पिढी आदिवासींमध्ये उदयाला येऊ लागली आहे. प्रखर वास्तवाचं भान राखणारी ही पिढी आहे. या पिढीच्या जीवनजाणिवा टोकदार व विद्रोही आहेत. "[१४]

आदिवासी कवितेतून वेगळ्या जाणिवेतून व्यथा, वेदना, नकार ही महत्त्वाची जाणीव येताना दिसते. अज्ञानामुळे झालेली फसवणूक स्त्री वेदना, हतबल झालेल्या मातेच्या जीवनाची जाणीव खालील कवितेतून व्यक्त होते.

*" तिनं पायात बांधला उडत्या पंखातला वारा*

*डोयात दाटली आसवं वैनाटीत दाटे पारा*

*झालं गेलं बालपण तिथं लगोऱ्या पडल्या*

*मैना वढत्या पायानं उभी मायच्या आंगणी*

*इचू-साप जरी हाये आसरमशायेच्या जंगली*

*मैना वढत्या पायानं उभी मायच्या आंगणी*

*माय सपनात पाही मैना जाते हापिसात*

*तिथं फायलीच्या मंदी हिरव्या जिनगानीची आस*



Scanned with CamScanner

*धान इकून मायनं केला शायेचा बजार*
*आता दाव्वीत लेकरू आन् उदयाचाचं वारं*
*जाय जाय घिऊन भाऊ आसरमशायेत मैनेले*
*तिथं लेयनं लेवाले न्यानी पुस्तकं शिकाले "* [१५]

वरील ओळीतून आईचे मुलींवरील प्रेम लक्षात येते. आपल्या मुलींला शिकवण्यासाठी आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे तिला आश्रमशाळेत टाकण्याचा विचार या ओळीतून लक्षात येतो. आईला शाळेविषयी ज्ञान नसल्यामुळे तिची झालेली फसवणूक पुढील ओळीतून लक्षात येईल.

*" मायी मयना शिकनं उद्या सायबीन व्हनं*
*माया पिढीचा उद्दार साऱ्या लोकात करनं*
*नोको जंगलाचा बोजा नकु फाटकी जिनगानी*
*उडून जाईन पाखरू शयरात भुर्रूशानी*

*बाई नोको सोडू धीर तुया मैनेले नेईन*
*तुया कायजाचा तुकडा सुखरूप पोचविनं*
*त्यानं केली गाडी सुरू मैना मागून बैसली*
*तिच्या डोयात आसवं माय पाऊन दाटली*

*बन सागाचं बांबूचं आन् तिरक्या बाभुळी*
*दाट जंगलाचा रस्ता गेली मांजल आडवी*
*कशी का गा वाटंमंधी मामा गाडी उभी केली ?*
*त्यानं वढलं हाताले तिले झाडीमंदी नेली*

*त्यानं लुटलं मैनेले जंगल खामोस झालं सारं*
*तिच्या तुटल्या पैजणी पिसाट जिनगानीचं वारं*
*जीव रक्ताडून गेला जिनगानी ओस झाली*
*तिथं वाकल्या फांदीसी मैना लटकून मेली*


Scanned with CamScanner

*तू गा धरमाचा भाऊ तुया इसवास केला*
*सुरा कायजाच्या मंदी कोण्या दुस्मानी भोकला ? "* [१६]

या कवितेतून स्त्री वेदनेची जाणीव स्पष्ट होते. फसवणुकीमूळे स्त्रीला भोगावे लागणारे दू:ख लक्षात येते. मनाला भावुक करणारी ही कविता आहे.

*" १९४७ ते २०४७ साजरा करू म्हणतोय क्रांतीचा शतकोत्सव*
*आतापर्यंत न सुटलेल्या प्रश्नांसाठी*
*घेऊ आढावा समस्या-बिमस्यांचा संशोधन-बिंशोधन*
*कायदेबियदे नि घडामोडी केलेले वायदे*
*विकासाच्या आर्थिक उलाढालीचा*
*होळीच्या फागात मांडला जातो हिशोब तसा "* [१७]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात लोकशाहीचा पुरस्कार केलेल्या भारताने आजपर्यंतच्या सामाजिक, राजकीय प्रवासात काय कमावले आणि काय गमावले याचा हिशोब मांडणाऱ्या विनोद कुमरे यांच्या ' आगाजा ' या काव्यसंग्रहातील ' शतकोत्सव ' कवितेतील या काही ओळी. जे आदिम काळापासून घनदाट जंगल, अरण्यातील दऱ्या-खोरे, कड्या-कपारीच्या अवघड आश्रयाने विनातक्रार जीवन जगत आहेत. त्या अभावग्रस्त आदिवासी जमातींच्या जीवनजाणिवांचा शोध कुमरे यांनी प्रस्तुत संग्रहाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आधुनिकीकरणाच्या गतिमान पेचात अडकलेल्या सर्वसामान्य आदिवासी समूहाची व्यथा उलगडणारी कविता असे कुमरे यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य सांगता येईल. आदिवासींच्या वर्तमान कालातील सामाजिक जीवनाचे सखोल चिंतन या संग्रहातून प्रकर्षाने जाणवते. कवी विनोद कुमरे यांनी वास्तवानुभवाला शब्दांची जोड दिल्यामुळे त्यांच्या ' आगाजा ' कवितासंग्रहातील कवितांची मांडणी प्रभावी झाली आहे. ' मोटिफ : एक होता राजा ' यांसारख्या कवितांना आदिवासी लोकगीतांची जोड मिळाल्यामुळे एक वेगळे अनुबंध सिध्द होतात. आदिवासींच्या पारंपरिक जीवनाचा, अस्मितेचा शोध घेताना कवी म्हणतो,



Scanned with CamScanner

*" तो शोधतोय आपल्या राजवस्त्रातले धागे*
*नागांच्या भूमीत नागालँडमध्ये*
*दंडकारण्यात, गोंडवनाच्या बेटा-बेटांवर*
*गळ्यातील सर्पाच्या दातातील विष पाझरताना*
*त्याला होतच किळसवाणं*
*कमरेला गुंडाळलेल्या व्याघ्रचर्माला*
*लागल्यास मुंग्या*
*देव बनून, दगड बनून, लिंगयोनीची प्रतिमा बनून*
*माणसाचा देव झाल्याचा एका राजाचा इतिहास "* [१८]

एकूणच ' आगाजा ' कवितासंग्रहामधून विविध जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत. कवीचे अरण्यावरील प्रेम, व्यथा, क्रांती, स्त्री अत्याचार, समाजाला केलेला प्रश्न, जागतिकीकरणाचा जंगलांवर झालेला परिणाम आदी बाबींची जाणीव ' आगाजा 'तील कवितांमधून होते.



Scanned with CamScanner

# संदर्भसूची

१) डॉ. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१२, पृ.क्र.२५.

२) डॉ. बोथीकर सुधाकर, आदिवासी कविता रूप आणि बंध, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१३, पृ.क्र.१००.

३) तत्रैव, पृ.क्र.१०२.

४) तत्रैव, पृ.क्र.१०४.

५) प्रा. कुमरे विनोद, आगाजा, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती - २०१४, पृ.क्र.६.

६) तत्रैव, पृ.क्र.७९.

७) तत्रैव, पृ.क्र.२.

८) तत्रैव, पृ.क्र.६.

९) तत्रैव, पृ.क्र.१५.

१०) तत्रैव, पृ.क्र.३३.

११) तत्रैव, पृ.क्र.३६.

१२) तत्रैव, पृ.क्र.४०.

१३) डॉ. बोथीकर सुधाकर, उनि, पृ.क्र.१३७.

१४) तत्रैव, पृ.क्र.१३९.

१५) प्रा. कुमरे विनोद, उनि, पृ.क्र.६०.

१६) तत्रैव, पृ.क्र.६१.

१७) तत्रैव, पृ.क्र.७५.

१८) तत्रैव, पृ.क्र.३०.



Scanned with CamScanner

# प्रकरण चौथे

# ' आगाजा 'तील आदिवासी कविता : वाङ्मयीन मूल्यमापन



Scanned with CamScanner

# प्रकरण चौथे

## ' आगाजा 'तील आदिवासी कविता : वाङ्मयीन मूल्यमापन

४.१ ' आगाजा ' कवितासंग्रहातील मूल्यात्मकता

४.२ ' आगाजा ' कवितासंग्रहाची भाषा

४.३ ' आगाजा 'मधील शब्द, म्हणी, प्रतिमा यांचा अभ्यास

४.४ आदिवासी कवितेचे सौदर्यशास्त्र

४.५ ' आगाजा 'मधील व्यक्तिचित्रे

४.६ ' आगाजा 'तील आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती



Scanned with CamScanner

# ' आगाजा 'तील आदिवासी कविता : वाङ्मयीन मूल्यमापन

## ४.१'आगाजा ' कवितासंग्रहातील मूल्यात्मकता

' **आगाजा** ' कवितासंग्रहातील मूल्यात्मकतेचा विचार करता या संग्रहातील कविता आदिवासीच्या सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांना आपल्या केंद्रस्थानी ठेवून आविष्कृत होताना दिसते. वैश्विक मानवी मूल्ये हा तिचा प्राण आहे. ती आपल्या भूतकाळाशी संवाद साधत वर्तमानकालीन जीवनाचे संदर्भ वेचत वैश्विकतेकडे आपली वाटचाल करीत जाते.

या कवितासंग्रहामध्ये आदिम मानवी मूल्ये सर्वत्र आविष्कृत होताना दिसतात. संग्रहातील कवितेची अभिव्यक्ती ही कृत्रिम नाही. कवितेच्या रचनेचा विचार केला असता असे लक्षात येते की सामाजिक प्रश्न समोर आणणाऱ्या कविता या संग्रहामध्ये आहेत. दाहक अनुभवांच्या अभिव्यक्तीने ती वाचकाच्या ऱ्हदयाला भिडते. वाचकाच्या भावनात्मकतेला आव्हान देणारी तिच्यातील शक्ती अफाट आहे. वैचारिकता आणि भावनात्मकता यामध्ये योग्य समतोल साधत आपल्या अंगभूत सौदर्याने हा कवितासंग्रह आविष्कृत झाला आहे.

या कवितासंग्रहामध्ये कल्पनाविश्वाला अधिक महत्त्व न देता वास्तवाला अधिक जवळ केले आहे. मानवी जीवनातील होणाऱ्या पडझडीवर ती दाहक भाष्य करते. अशा वेळी कधी कधी श्लील-अश्लील शब्दांचा विचार न करताही परखडपणे अभिव्यक्त होणारा हा कवितासंग्रह आहे. अशा वेळी सामाजिक नैतिक मूल्यांचा ' आगाजा ' कवितासंग्रहाने विसर पडू दिला नाही.

" आदिवासी कवितेच्या अंतरंगातील दु:ख विवक्षित, देशकालातील न राहता वैश्विक पातळीवर आदिवासी दु:खाशी संवाद साधू पाहते. म्हणूनच दक्षिण अमेरिकेतील आदिवासी, आफ्रिकेतील निग्रो आदिवासी आणि नेल्सन मंडेला व त्यांची आदिवासी मुक्ती चळवळ हे आदिवासी कवितेच्या जिव्हाळ्याचे विषय झाले आहेत. " [१]

' आगाजा 'मधील काही कवितांचा विचार केला तर त्यामध्ये सांस्कृतिक परंपरा, सामाजिक प्रश्न, सामाजिक जीवन यांचा विचार केला आहे. आपले सामाजिक जीवन मांडत असताना मानवी मूल्यांच्या व विवेकाच्या पातळीवर त्याला तपासताना आढळते. यातील काही कविता सर्जनशीलतेतून आपल्या जीवनाचा शोध घेताना दिसते. आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांच्या विरूध्द संघर्ष करताना काही कवितांमधून कळते.



Scanned with CamScanner

## ४.२ ' आगाजा ' कवितासंग्रहाची भाषा

" महाराष्ट्रातील आदिवासी कवींच्या कवितांचा विचार केला तर या कविता गोंडी, भिल्ली, देहवाली आणि मराठी अशा चार भाषांतून लिहिल्या गेल्या आहेत. " २

' आगाजा ' या कवितासंग्रहामध्ये एकूण २८ कवितांचा समावेश आहे. या कवितांची भाषा मराठी असली तरी समजण्यास कठीण जाते. कारण यामध्ये गोंडी शब्द आलेले आहेत तसेच इंग्रजी, ग्रामीण, प्रमाण शब्दांचा वापर या कवितासंग्रहामध्ये केलेला आढळून येतो.

या कवितासंग्रहातील कवितांची भाषा जेवढी कलात्मक आहे तेवढीच अकृत्रिम, उत्स्फूर्त, नैसर्गिक व सहज-सुलभ अशा स्वरूपाची असलेली दिसून येते. या काव्यभाषेतून दांभिकतेचा स्फोट घडवून आणला जातो. आपल्या जीवन वास्तवातल्या भाषेबरोबरच उपहास आणि नकार व विद्रोह या कवितेतल्या भाषेतून अभिव्यक्त होतो. आपला सांस्कृतिक अभिनिवेश ही भाषा आविष्कृत करीत जाते. आपल्या जीवन व्यवहारांतल्या उत्स्फूर्त भाषेबरोबरच उपयोगात आणल्या गेलेल्या कलात्मक भाषेतून मांडली जाणारी प्रतिमा, व्यक्तिचित्रे हे कवितांच्या सौंदर्यात भर घालणारे आहे. यामुळे आशय सशक्तपणे मांडला जातो.

या कवितांची भाषा प्रभावी, उपरोधिक व प्रसंगी अश्लील शब्दांचा वापर करतानाही दिसून येते. ही भाषा अपरिहार्यपणे येत असून त्यातून कवींच्या भावनांचा आवेग, आवेश आणि त्याच्या मनात आपल्यावरील अन्याय-अत्याचारांविषयी निर्माण होणारी घुसमट व्यक्त होते.

' आगाजा ' या कवितासंग्रहाची भाषा आत्मनिष्ठेकडून समूहनिष्ठेकडे मार्गक्रमण करीत जाते. पण या कवितांसग्रहाची भाषा कठीण असल्यामुळे कवितांचा आशय समजण्यास अडचण निर्माण होते. ' आगाजा ' कवितासंग्रहातील कवितांवर गोंडी भाषेचा प्रभाव आहे असे म्हणता येईल.

कवी विनोद कुमरे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीतून ' आगाजा ' कवितासंग्रहाच्या साहाय्याने अरण्याविषयी प्रेम व्यक्त केले. तसेच भूकबळीसारखा मोठा प्रश्न समाजासमोर आणण्याचे काम या कवितासंग्रहाने केले.



Scanned with CamScanner

## ४.३ ' आगाजा 'मधील शब्द, म्हणी, वाक्प्रचार ,प्रतिमा यांचा अभ्यास

मुळातच आदिवासी कविता येथील मातीतील व आदिम आहे. अनेक बोलीतून आलेली ही कविता शब्द, म्हणी, प्रतिमा या घटकांनी परिणामकारक ठरली आणि त्यामुळे कवितेचा आशय अधिक भारदस्त होतो. आदिवासी साहित्यामध्ये म्हणी, वाक्प्रचार,प्रतिमा यांना महत्त्वाचे स्थान आहे. आदिवासी लोकांच्या सांस्कृतिक जडण-घडणीतून, आदिवासी बोलीच्या माध्यमातून मौखिक परंपरेने म्हणी, वाक्प्रचार यांचा जन्म होत राहिला आणि तो परंपरागत पध्दतीने पुढे संक्रमित होत आहे. आदिवासी लोकांचे साहित्य सण-उत्सव, देव-देवता, दिवाळी-दसरा, लग्न, रूढी, प्रथा, परंपरा यांच्या अनुषंगाने निर्माण होत गेले. या साहित्याचा निर्माण एक नाही तर ही समूह निर्मिती आहे.

कोणत्या भाषेचा वापर किती विविध प्रकारे केला जातो यावर आणि आशयाची अभिव्यक्ती किती समर्थपणे केली जाते यावर भाषेचे सामर्थ्य निश्चित करता येते. खेड्यातील लोक आपल्या व्यवहारांसाठी जी भाषा बोलतात त्या भाषेत म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा इत्यादी गोष्टीचा अगदी सहजपणे उपयोग करतात, या वापरामुळे भाषेला सौदर्य प्राप्त होते. त्याचप्रमाणे ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये शब्द, म्हणी, वाक्प्रचार, वेगवेगळ्या प्रतिमांचा वापर करण्यात आला आहे.

### १) शब्द :

मानवी कल्पना,विचार मांडण्यासाठी भाषेची पर्यायानेच शब्दांची गरज असते. आदिवासी कविता ही डोंगरदऱ्यांची, निसर्गाची आहे. त्यामुळे तिच्यामध्ये शब्दांचे वैभव पाहायला मिळते. आदिवासी कवितेत येणाऱ्या त्यांच्या जीवन व्यवहारांतील शब्दांमुळे मराठी कवितेच्या शब्दभंडारात भर पडली असून यामुळे मराठी भाषेचे शब्दभंडार समृध्द होण्यास हातभार लागला आहे. 'आगाजा' कवितासंग्रहातून येणारी हे काही महत्त्वाची शब्द पूढीलप्रमाणे- मर्दुमकी, बलांट, चेदूक, पुंजीवादी, कायोपुंगार, लिंगो, वल्गना, विजिगीषू, लक्तर, उलगुलान, बिलिचभर, कोंची, भैण, पाटा, माडे, तंतर, आदेम, ठाणा, वैनाटी, कायज, फितुर, ढेमसा, बटवडा इ.

### २) म्हणी :

आदिवासी साहित्यामध्ये म्हणी, उखाणे व वाक्प्रचार यांना महत्त्वाचे स्थान आहे. आंध आदिवासी लोकांच्या जडणघडणीतून, आदिवासी बोलीच्या माध्यमातून मौखिक परंपरेने



Scanned with CamScanner

म्हणी, उखाणे , वाकप्रचार यांचा जन्म होत राहिला आणि संक्रमित होत आहे. आदिवासी लोकांचे साहित्य सण , उत्सव , देव, देवता, दिवाळी , दसरा , लग्न रूढी ,प्रथा , परंपरा यांच्या अनुषंगाने निर्माण होत गेले.

## म्हणीची व्याख्या :-

१.**डॉ.तारा भवाळकर,** "समूहमनाचा संचित आविष्कार म्हणजे म्हण."[३]

२.**डॉ.शरद व्यवहारे,** " लोकमानसाने आत्मसात केलेली उक्ती म्हणजे म्हण होय."[४]

३.**क्रॉप,**" शक्य तितक्या मोजक्या शब्दांत विदारक सत्य प्रकट करणारे वचन म्हणजे म्हण."[५]

४.**विश्वनाथ नरवणे,** " कहावत ऐसे युग की देन है, जब मानस भविष्य कथन, जादुटोणा आदि से छुटकरा पाकर तर्क और बुध्दि के निर्माण में लगा हुआ था l "[६]

' म्हणी ' हा भाषेचा एक महत्त्वाचा अलंकार आहे. म्हणीमुळे कवितेला अर्थपूर्ण आशय प्राप्त होतो. लोकजीवनात म्हणींचा नेहमीच उस्फूर्त वापर केला जातो. ग्रामीण भागातील अशिक्षित स्त्री सुध्दा अगदी सहज बोलता बोलता जीवनातील एखादा अनुभव म्हणीतून सांगून टाकते. ऐवढ्या म्हणी लोकांच्या अंगवळणी पडल्या आहेत. म्हणीमध्ये जीवन व्यवहाराचे, अनुभवांचे आणि विचारांची अत्यंत मोजक्या शब्दांत गुंफण केलेली असते. लोकमान्यता व सार्वत्रिकता हे म्हणीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

इतर समाजाप्रमाणे आदिवासी समाजातही म्हणींचा वापर अधिक प्रमाणात केलेला दिसतो. खरे तर म्हणीचे स्वरूप विश्वव्यापक असे आहे. आदिवासी समाजामध्ये विपुल प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या म्हणी लिखित स्वरूपात न आढळता मौखिक परंपरेने उपलब्ध होतात. 'आगाजा' कवितासंग्रहामध्ये दोन म्हणींचा समावेश आहे. त्या खालीलप्रमाणे

-"नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ विचारू नये"[७]

-"गांधील माशी न गुणगुण बसी"[८]

## ३) वाक्प्रचार :

वाक्प्रचार वाक्यसंप्रदाय असेही म्हटले जाते. वाक्प्रचारांची निर्मिती मानवाच्या जीवन पध्दतीतून होते.म्हणी व वाक्प्रचार यांची अभिव्यक्ती थोड्या फार फरकाने सारखीच वाटते. म्हणींच्या तुलनेत वाक्प्रचार कमीत कमी शब्दांत निर्माण केलेले दिसतात.



Scanned with CamScanner

डॉ.शरद व्यवहारे यांच्या मते,"मोजक्या शब्दांत अनेक संदर्भीय अर्थ व्यक्त करणारा शब्द समुदाय म्हणजे वाक्प्रचार असे म्हणता येईल."[९]

व्यवहारे यांच्याद्द वरील मतानुसार स्पष्ट होते की, वाक्प्रचार कमीत-कमी शब्द योजून त्याव्दारे अधिकाधिक आशय अभिव्यक्त करणे हे वाक्प्रचाराचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

म्हणीप्रमाणेच भाषेमध्ये वाक्प्रचाराला ही महत्त्वाचे स्थान आहे.'आगाजा' कवितासंग्रहामध्ये वाक्प्रचार आढळून आला आहे.

-" पाण्यावर काह्री मारल्यानं फाकत नाही."[१०]

### ४) विशिष्ट वाक्ये :

'आगाजा'कवितासंग्रहामध्ये नावीण्य पूर्ण वाक्यांचा समावेश आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

-" मावा नाटे मावा राज "[११]

-" हया फडापेनाला दे नवस कोंबडीचा आनू टाक उतारा ओवाळून "[१२]

-" हयो तर लालभडक आगीचा गोळ"[१३]

-" मंग मी जंगलात पळून जाईन "[१४]

### ५) प्रतिमा :

प्रतिमासृष्टी ही संवेदना प्रकट करण्याची एक प्रभावी भाषिक योजना आहे. अबोध मनाची क्रिया भाषेच्या स्तरावर पकडण्याचे कौशल्य प्रतिमा करत असते. या प्रक्रियेत रूढ वाच्यार्थ पार्श्वभूमीला जाऊन आदिम संवेदनपर अर्थ व्यक्त होत राहतो. बोधनाचा ताजेपणा आणि टवटवीतपणा प्रतिमांमधील अर्थमिश्रिततेमुळे व्यक्त होत असतो.

नागर समाजापासून दूर जंगलांत राहणाऱ्या आदिवासींचे भावविश्व हे निसर्गाशी एकरूप झालेले आहे. आदिवासी निसर्गाला ईश्वर मानतो. निसर्गसृष्टीतील वनस्पती, पशुपक्षी यांना ते आपले मानतात. म्हणूनच तर डोंगऱ्यादेव म्हणून डोंगराची पूजा करतात. तसेच हिरव्या गवताची पूजा ते करतात. याचाच अर्थ आदिवासींच्या जीवनात वृक्षवेली, झ ाडे-झुडपे, डोंगर, पशुपक्षी यांना महत्त्वाचे स्थान आहे. अशा निसर्गावलंबी जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या भावविश्वातील, निसर्गसृष्टीच्या प्रतिमा आदिवासी साहित्यात विपुल प्रमाणात येतात. वनस्पती, डोंगर-दऱ्या, जलप्रवाह याविषयीच्या कल्पना तसेच पाऊस-पाणी,



Scanned with CamScanner

ऊनवारा, मेघ आणि वीज यांचा समावेश यात झालेला आहे. या प्रतिमा त्यांच्या जीवनाचे आदिमपण सिध्द करतात.

कवी विनोद कुमरे यांनी ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी या कवितासंग्रहामध्ये अनेक प्रतिमांचा वापर केला आहे. प्रवृत्तीचे अवकाळी वादळ, बोन्साय झाडाचं पोडियम गार्डन, धूर ओकणारी जीपगाडी, बुध्दाच्या बोधिवृक्षासारखे, परिवर्तनाच्या चळवळीत रापलेले अरण्यबेट, आग ओकणारा वादळी ड्रॅगन, राखेतील लाल तप्त निखारे, माणूस ठरला बळीचा बकरा, खोल मुळासारखेच वटलेले आपले प्रश्न, निळ्या आभाळाची आशा, खोबऱ्याचा डोल, अस्मितेचं थडगं, रेलगाडी सुटून जाते वाऱ्यासारखी, झोपडीच्या छतांचे तारे, गाजर गवतासारखं हे रूजत जाणारं ग्लोबलायझेशन इत्यादी प्रतिमा आल्या आहेत. तसेच शब्दांचं चांदण, मातीच काळीज या प्रतिमा देखील या कवितासंग्रहामध्ये आल्या आहेत.



Scanned with CamScanner

## ४.४ आदिवासी कवितेचे सौंदर्यशास्त्र

साहित्य क्रांतिकारक असते, पण ते क्रांतिशास्त्र नसते. साहित्य क्रांती करीत नाही, क्रांतीला उद्युत करते, तर क्रांतिशास्त्र क्रांती कशी करायची ते शिकवते. दलित साहित्य विद्रोही असल्यामुळेच त्याने प्रतिक्रांतीच्या साहित्यापाशी सौंदर्यशास्त्राचे हत्यार आहे तर विद्रोही साहित्यापाशी मात्र ते नाही हे लक्षात घ्यायला पाहिजे. सौंदर्यशास्त्र हे साहित्यिक वा कलावंत निर्माण करू शकत नाही हे खरे पण , परिणत साहित्यिक वा कलावंत बनण्यासाठी साहित्याचे वा कलेचे शास्त्र शिकावे लागते हेही खरे. मग ते गुरूवाचून असो. साहित्याचे साहित्यशास्त्र आहे, संगीताचे संगीतशास्त्र आहे, चित्रकलेचे चित्रकलाशास्त्र आहे,शिल्पकलेचे शिल्पकलाशास्त्र आहे, आर्किटेक्टचे वास्तुकलाशास्त्र आहे इ. त्यांची थिअरी आहे व रियाज आहे. गॉर्की म्हणतो की, परिणत साहित्यिक वा कलावंत बनण्यात प्रतिभेचा वाटा १ टक्का असतो आणि मेहनत वा रियाजचा ९९ टक्के.

"सर्व कलाशाखांच्या शास्त्रांना सामावणारे आणि त्यांना तत्त्वज्ञानात्मक उंचीवर नेणारे शास्त्र म्हणजे सौंदर्यशास्त्र होय."[१५] सौंदर्यशास्त्र हे विषयवस्तू व सौंदर्यवस्तू यांच्या परस्परसंबंधांची दार्शनिक मीमांसा करते. विषयवस्तू ही सामाजिक वास्तवाचा एक भाग असते, साहित्यिक वा कलावंत तिचा कलावस्तूत आविष्कार करतो. आणि रसिक तिचा सौंदर्यवस्तूत. हे संबंध व आविष्कार चैतन्यवादी असतात की भौतिकवादी हे सांगण्यातून सौंदर्यशास्त्राचे विविध संप्रदाय निर्माण होतात. भारतीय चैतन्यवाद वा अध्यात्मवाद हा वर्णजात स्त्रीदास्य समर्थक असल्याने आणि भारतीय भौतिकवाद बाह्यार्थवाद वर्णजातस्त्री दास्यविरोधी असल्याने विषयवस्तूंचा वा संबंधित सामाजिक वास्तवतेच्या कलात्मक आविष्कारात व आस्वादनात सौंदयशास्त्रांतर्गत संघर्ष सुरू होतो. म्हणून सौंदर्यशास्त्र हे एकात्म वा वर्णजातवर्गातील कधीही राहू शकत नाही.

"सौंदर्यशास्त्र हे कलाकृतीचे आस्वाद घ्यायचे व त्याची दार्शनिक मीमांसा करायचे शास्त्र आहे."[१६] " एडमंड हुसेर्लच्या घटितार्थ शास्त्र वा अनुभवशास्त्राच्या (Phenomenology) संप्रदायाची सौंदर्यमीमांसा सांगते की, प्रत्येक कलाकृती इंद्रियगम्य मूर्त कलावस्तू (Art Object) व रसिकसापेक्ष अमूर्त सौंदर्यवस्तू या व्दैताने बनलेली असते आणि तिचा रसिकाशी समागम होताच ती आपले सौंदर्यमूल्य प्रसवते. पण,सौंदर्य मूल्यांचा जनक सर्वस्वी रसिक असतो, हे या समीक्षेचे प्रमेय विश्वचैतन्यवादी असल्याचे आम्हाला



Scanned with CamScanner

वाटते. कलाकृतीत ओतले जातात असे प्रतिपादन आहे. पण , त्याची नेणीव अभिव्यक्त असते आणि म्हणूनच रसिकाला तिची जाणीव होते."[१७]

जातिव्यवस्था जख्खड झाल्यामुळे आणि तिच्या विघटनावाचून आधुनिक भांडवलदारी विकास होऊ शकत नसल्यामुळे भारतात युरोपसारख्या तत्त्वज्ञानांचा उदय व विकास होऊ शकला नाही. युरोपमधील भांडवलदारी युगाच्या तत्त्वज्ञानांनीच सौंदर्यशास्त्राचा विकास केला.

आदिवासी कवितेच्या रूपतत्त्वाची एक वेगळी दिशा आहे. आदिवासी जीवनाच्या मुळाशीच कलात्मकता असल्यामुळे ती त्यांच्या कवितेतूनही आविष्कृत होते, या कवितेतून वास्तव जीवन मांडले जात असले तरी तिला कलात्मकतेचे वावडे नाही. आदिवासी कविता आपला स्वतंत्र विचार घेऊन जन्माला आली आहे. म्हणून तिचे सौंदर्यशास्त्रही वेगळ्या पध्दतीने मांडले जाणे महत्त्वाचे ठरते. प्रत्येक संस्कृतीच्या सौंदर्याच्या कल्पना कमी-अधिक फरकाने भिन्न असतात. आदिवासी जीवन व संस्कृती यातील वेगळेपण लक्षात घेता सौंदर्यशास्त्राचा विचार महत्त्वाचा ठरतो. मराठी साहित्याचे सौंदर्यशास्त्र हे संस्कृत साहित्याचे सौंदर्यशास्त्र आहे. संस्कृत साहित्याने आदिवासींच्या पूर्वजांना राक्षस म्हणून हिणविले, त्यांच्या जीवनाची अवहेलना करून वाईट, विकृत त्यांचे रूप रेखाटले म्हणून अशा साहित्याच्या सौंदर्यशास्त्राने आदिवासी साहित्याचा विचार करता येणार नाही.

आदिवासी कवितेच्या बाबतीत आदिवासी जीवनाशी व जीवनाच्या संदर्भातच सौंदर्य कल्पना लक्षात घेणे महत्त्वाचे जाते. या कवितेचे बीज हे मूल आदिवासी जीवन आहे, या जीवनाला रेखाटताना तिच्यात नवे कलात्मक सामर्थ्य निर्माण होते.

'आगाजा ' कवितासंग्रहामध्ये आदिवासींचे जीवन निसर्गाशी एकरूप असलेले आहे, कवितांतून जंगल, अरण्य, झाडे, जंगलातील जीवन प्रकर्षाने उमटले. त्यांचे दु:खही जंगलाशी एकरूप होते. तसेच आदिवासींच्या प्रथा, परंपरा या कवितांमधून समोर आल्या आहेत. अकृत्रिम जीवन व अकृत्रिम नैसर्गिक सौंदर्य हे कवितेच्या मध्यवर्ती आहे. या कवितासंग्रहातील कवितांची मांडणी कलात्मक पध्दतीने केली आहे. पुरूषप्रधान संस्कृती दाखविण्यासाठी ' सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय ' ही कविता या कवितासंग्रहामध्ये आली आहे.



Scanned with CamScanner

## ४.५ ' आगाजा 'मधील व्यक्तिचित्रे

' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये असे शब्द, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा आल्या आहेत तशी काही व्यक्तिचित्रेही आली आहेत. ' अरण्य ' या कवितेमध्ये कोलंबसने लावलेला नवा शोध याचे चित्रण आले आहे. तसेच अमेरिगो व्हेस्पीसी ही देखील व्यक्तिरेखा या कवितेमध्ये आली आहे. मार्क्सने जंगला जंगलात जाऊन केलेले प्रबोधन यामध्ये आले आहे.

' होमलँड ' या कवितेमध्ये एकलव्य यांची लोकगाथा आली आहे. तंट्या भिल्ल व बिरसा मुंडा, नेल्सन मंडेला यांच्या कार्याचा उल्लेख या कवितेमध्ये आला आहे. ' पाहादी पारी कुपार लिंगोची गोस्ट ' या कवितेमध्ये लिंगोच्या जीवनाची कथा चित्रीत केली आहे. 'आभासी' या कवितेमध्ये पारबता आजीच्या कथेचा उल्लेख केला आहे.

' सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय ' या कवितेमध्ये सुरपनखा, हेडंबा यांच्या जीवनातील दु:ख चित्रित केले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीला किती वेदना सहन कराव्या लागतात हे सुरपनखा व हेडंबा यांच्या व्यक्तिरेखामधून लक्षात येते. ' झेल ' या कवितेमधून वेगवेगळ्या वस्तू विकणाऱ्या मणेरीवाला उस्मानभाई यांचे व्यक्तिचित्रण आले आहे.

'जंगो ' या कवितेमधून जंगोचे आजीवरील प्रेम लक्षात येते. जंगो ही व्यक्तिरेखा या कवितेमध्ये आली आहे. ' चुट्टा ' या कवितेमधून जीवन जगताना खचून गेलेल्या व्यक्तीचे चित्रण आले आहे. ' पाडा ' या कवितेमधून समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्त्री चे व्यक्तिचित्रण आले आहे. तसेच मास्तर ही व्यक्तिरेखा या कवितेमध्ये आली आहे.

'तुझ्याभोवती ' या कवितेमध्ये अरण्यावर विश्वास असणाऱ्या स्त्रीची व्यक्तिरेखा आली आहे. ' सखीच्या कविता ' या कवितेमधून चळवळीवर प्रेम असणाऱ्या सखीचे चित्रण आले आहे. ' पाच ' या कवितेमधून शिक्षणाची आवड असणाऱ्या मैनेचे व्यक्तिचित्रण आले आहे. तसेच मैनेवर जिवापाड प्रेम करणाऱ्या तिच्या आईची व्यक्तिरेखा या कवितेमधून समोर येते.

'कविता ' या कवितेमध्ये सुरपनखा, यरम्मा, कजाग बाई यांचा उल्लेख आला आहे. 'शतकोत्सव ' या कवितेमध्ये बिरसा मुंडा, तट्यामामा यांचा उल्लेख आला आहे. 'लढा' या कवितेमधून वाल्या कोळी ही व्यक्तिरेखा आली आहे. ' भाषण ' या कवितेमधून मार्क्स, बुध्द, लिंगो, येशू यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. ' कोया पुंगार ' या कवितेमध्ये पारबता गोंडीन ही व्यक्तिरेखा आली आहे. ' अनुभव ' या कवितेमध्ये रहीम चाचा ही व्यक्तिरेखा आली आहे.



Scanned with CamScanner

## ४.६ ' आगाजा 'तील आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती

' आगाजा 'तील आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्तीचा अभ्यास करताना ' आगाजा ' कवितासंग्रहात आलेले, सामाजिक प्रश्न व त्यांचे स्वरूप तसेच ' आगाजा ' कवितासंग्रहाचे वेगळेपण यांचा विचार करावा लागेल.

### ४.६.१ ' आगाजा ' कवितासंग्रहात आलेले सामाजिक प्रश्न व त्यांचे स्वरूप यांचा अभ्यास

' आगाजा ' कवितासंग्रह हा अनेक प्रश्नांनी व्यापलेला आहे. कवी विनोद कुमरे यांचा जन्म आदिवासी जमातीमध्ये झाल्यामूळे त्यांनी आदिवासी समाजातील समस्या, जीवन जगताना निर्माण होणारे प्रश्न जवळून अनुभवले आहेत. म्हणून या कवितासंग्रहातील कवितांमधून अनेक सामाजिक प्रश्न समोर येताना दिसतात.

' अरण्य ' या कवितेमधून जंगलाच्या संरक्षणाचा प्रश्न समोर येतो. कारण आधुनिकीकरणामूळे जंगलतोड करून त्या ठिकाणी कारखाने निर्माण करण्यात येत आहेत. त्यामुळे जंगलतोड कशी थांबवायची व जंगलांचे संरक्षण कसे करायचे हा मोठा प्रश्न या कवितेमधून समोर येतो. कवीची अरण्याच्या संरक्षणासाठीची तळमळ या कवितेतून लक्षात येते.

' होमलॅंड ' या कवितेमधून सध्याचा ज्वलंत प्रश्न समोर येतो तो म्हणजे स्त्री संरक्षणाच कारण समाजामध्ये जास्त तर लोक स्त्रियांकडे वाईट नजरेने पाहतात म्हणून त्यांच्यापासून स्त्रीचे संरक्षण कसे करायचे हा मोठा प्रश्न निर्माण होतो. सर्वांनी स्त्रियांचे संरक्षण केले पाहिजे असे कवीला वाटते.

' निसटती ' या कवितेमधून आदिवासी समाजावर होणारे खोटे आरोप कसे दूर करायचे हा प्रश्न आला आहे. समाजामध्ये असे लोक पण आहेत जे आदिवासी समाजाच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांच्यांवर खोटे आरोप करतात. उदा. जंगलतोडीचा आरोप इत्यादी या खोट्या आरोपातून आदिवासी समाज कसा बचावला जाईल यांची चिंता कवीला वाटते. हे ' निसटती ' या कवितेमधून लक्षात येते.

' रस्ता संपता संपत नाहीए ' या कवितेमध्ये समाज व्यवस्थेचा प्रश्न समोर आला आहे. समाजव्यवस्थेमुळे आदिवासी समाज मागासलेला राहत आहे. तसेच या समाज



Scanned with CamScanner

व्यवस्थेचा परिणाम जंगलावर होत आहे. यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत असे कवीला वाटते.

' मोटिफ : एक होता राजा या कवितेमध्ये देवावर असणाऱ्या श्रध्देचे रुपांतर अंधश्रध्देत होताना दिसते. ' सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय ' या कवितेमधून पुरुषप्रधान संस्कृती समोर येते. या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री सन्मानाचा प्रश्न निर्माण होतो. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना कमी लेखले जाते हे लक्षात येते.

' झेल ' या कवितेमधून आदिवासींचा अज्ञानी असण्याचा प्रश्न समोर येतो. आदिवासी अज्ञानी असल्यामुळे त्यांची फसवणूक कशी केली जाते हे ' झेल ' या कवितेमधून समोर येते. फसवणूक थांबवण्यासाठी आदिवासी समाजाने शिक्षण घेतले पाहिजे असे कवीला वाटते.

' माड्या ' या कवितेमध्ये आदिवासी समाजावर होणाऱ्या अत्याचारांचा प्रश्न समोर येतो. आदिवासी समाज शिक्षणापासून वंचित असल्यामुळे त्यांच्यावर अत्याचार होतो असे कवीला वाटते. ' ढोल्या ' या कवितेमध्ये आदिवासींच्या अंधश्रध्देवर प्रकाश टाकला आहे. हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. कोणताही कार्यक्रम असला की मोहाची दारू पिली पाहिजे ही एक अंधश्रध्दाच म्हणावी लागले. मोहाची दारू नाही पिली तर कार्यक्रम पूर्ण होणार नाही. असे आदिवासी समाजातील लोक मानतात. आदिवासी समाजामध्ये अंधश्रध्देचे प्रमाण जास्त असल्याचे ' ढोल्या ' या कवितेमधून लक्षात येते.

' पाडा ' या कवितेमध्ये पाड्यावर जीवन कसे जगायचे हा प्रश्न समोर येतो. आदिवासी समाजातील लोकांना पाड्यावर जीवन जगताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत. त्यात आर्थिक, शैक्षणिक समस्यांचा समावेश आहे. सरकारने आदिवासी समाजाचा विकास होण्यासाठी पाड्यांची सुधारणा केली पाहिजे असे कवीला वाटते.

' पाच ' ही कविता भावनिक करून डोळ्यांत अश्रू आणणारी कविता आहे. या कवितेमध्ये स्त्रीवर होणारा अत्याचार हा ज्वलंत प्रश्न समोर आला आहे. आपल्या मुलीला अधिकारी बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आडाणी आईची होणारी फसवणूक या कवितेतून समोर येते. स्त्रियांवर होणारा अत्याचार रोखला पाहिजे असे कवीला वाटते.

' फेसबुक ' या कवितेमधून कुपोषणाचा प्रश्न समोर येतो. हा प्रश्न ज्वलंत आहे. आदिवासी समाजाला पुरेसे अन्न खायला मिळत नसल्यामुळे त्यांच्या बालकांना कूपोषण



Scanned with CamScanner

जास्त प्रमाणात होत असल्याचे लक्षात येते. गरोदर मातेला पोषक अन्न न मिळाल्यामुळे त्यांना कुपोषित बालक जन्माला येते. आदिवासी समाजामधील कुपोषण हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. तरी सद्यःस्थितीला सरकारने अनेक उपाययोजना केल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून येते.

' लढा ' या कवितेमधून भूकबळीचा प्रश्न व जनावरांच्या संरक्षणाचा प्रश्न समोर येतो. आदिवासी समाज मागासलेला असल्यामुळे त्यांना पूरेसे अन्न मिळत नाही म्हणून भूकबळीचा प्रश्न निर्माण होतो. तसेच जंगलतोडीमुळे जनावरांनी कुठे जायचे हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे जंगलांतील जनावरे असुरक्षित झाली आहेत.

### ४.६.२ ' आगाजा ' कवितासंग्रहाचे वेगळेपण

१. ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये वैशिष्ट्यपूर्ण भाषा व लेखनशैली आली आहे.

२. ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये गोंडी शब्द, ग्रामीण शब्द, इंग्रजी शब्दांचा वापर केला आहे.

३. गोंडी बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द-रचनांमुळे कुमरे यांच्या कवितेला वेगळे रूप, अर्थ आणि भावसौंदर्य प्राप्त होते.

४. समाजाला जागृत करण्याचे काम हा कवितासंग्रह करतो.

५. आदिवासींच्या रूढी, परंपरांची माहिती या कवितासंग्रहातून मिळते.

६. समाजाला स्त्री अत्याचार, कुपोषण, अंधश्रध्दा या सारख्या ज्वलंत प्रश्नांवर विचार करायला लावण्याचे काम ' आगाजा ' कवितासंग्रह करतो. विविध प्रश्नांच्या संदर्भाने ' आगाजा ' कवितासंग्रह निडरपणे व्यक्त होतो.

७. आदिवासी जमातींच्या जीवन, जाणिवांचा शोध कुमरे यांनी प्रस्तुत संग्रहाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

८. आदिवासी जीवनानुभवांतील अस्सलपणा सहज टिपण्याचे काम या कवितासंग्रहाने केले.

९. ' आगाजा ' हा कवितासंग्रह आशय, अभिव्यक्ती आणि रूपबंधाच्या बाबतीत निश्चितपणे वेगळा आहे.



Scanned with CamScanner

१०. आदिवासी समाजाला काहीशा अपरिचित असलेल्या जागतिकीकरणाच्या नव्या शोषण व्यवस्थेला ' आव्हान ' देणारा कुमरे यांचा कवितासंग्रह आहे.

११. आदिवासींच्या वर्तमान कालातील सामाजिक जीवनाचे सखोल चिंतन करणारा हा कवितासंग्रह आहे.

१२. आदिवासींच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम ' आगाजा ' कवितासंग्रह करतो.

१३. आपली संस्कृती, भाषा, चित्र-नृत्यकला इत्यादीपासून आपण वेगळे होत चाललोत ही खंत कुमरे यांचा कवितासंग्रह व्यक्त करतो.

१४. मानवी संस्कृतीचे संवर्धन तथा रक्षण करण्याचे ज्यांच्याकडे सामर्थ्य आणि कौशल्य आहे. असा आदिवासी समाज या भू-भागावरून कदापिही नष्ट होणार नाही. हे त्रिकालाबाधित सत्य कुमरे यांच्या कवितेतून व्यक्त होते.

१५. आदिवासींच्या समृध्द अशा सामाजिक जीवनाचा ऐतिहासिक आढावा कुमरे यांच्या कवितेतून अत्यंत अर्थबध्द पध्दतीने घेतल्याचे ' आगाजा ' कवितासंग्रहातून दिसून येते.

१६. वास्तवानुभवाला शब्दांची जोड देण्याचे काम या कवितासंग्रहाने केले आहे.



Scanned with CamScanner

# संदर्भसूची


१. अधि. कुमरे विनोद, आधुनिक कालखंडातील आदिवासी मराठी साहित्याचा अभ्यास, अप्रकाशित प्रबंधिका, पृ.क्र.१५५.

२. तत्रैव, पृ.क्र.१५६.

३.भवाळकर तारा,मायवाटेचा मागोवा, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर प्रथमावृत्ती,१९८९ ,पृ.क्र.७३.

४.व्यवहारे शरद, लोकसाहित्य संकलन व स्वरूप, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा,औरंगाबाद,प्रथमावृत्ती जानेवारी १९९९,पृ.क्र.१९६.

५.भागवत दुर्गा,लोकसाहित्याची रूपरेखा,वरद बुक्स प्रकाशन, व्दितीय आवृत्ती,१९७७ पृ.क्र.३००.

६.नरवणे विश्वनाथ,कहावतों की दुनिया में, विश्वगंगा प्रकाशन,पुणे,१९९९ पृ.क्र.१५.

७. प्रा.कुमरे विनोद, आगाजा, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथमआवृत्ती-२०१४,पृ.क्र.१४

८. तत्रैव, पृ.क्र.८०.

९. वाघ विठ्ठल , व-हाडी म्हणी लोकधर्म, लोकवाङ्मयगृह,पृ.क्र.३.

१०. प्रा.कुमरे विनोद, आगाजा, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती-२०१४,पृ.क्र.८२.

११ तत्रैव, पृ.क्र.८०.

१२. तत्रैव, पृ.क्र.८०.

१३.तत्रैव, पृ.क्र.८०.

१४.तत्रैव, पृ.क्र.८०.

१५.श्री.पाटील शरद , अब्राह्मणी साहित्याचे सौदर्यशास्त्र, पृ.क्र.६

१६.तत्रैव पृ.क्र.६३.

१७.तत्रैव पृ.क्र.६५.




Scanned with CamScanner

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष



Scanned with CamScanner

# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष

" **आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती ( कवी विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' कवितासंग्रहाच्या संदर्भात )** या विषयातील/प्रबंधिकेतील शेवटचे प्रकरण निष्कर्षांचे आहे. निष्कर्ष म्हणजे विवेचनाच्या शेवटी उदधृत अथवा गृहीत विचार, निश्चिती, तात्पर्य अथवा सार. मराठी विश्वकोशातील लेखक म.पुं.रेगे हयांच्या मतानुसार ' आपण युक्तिवाद करतो ते एखादे विशिष्ट विधान सत्य आहे असे दाखवून देण्यासाठी किंवा ते सत्य आहे हे इतरांना पटविण्यासाठी जे विधान सत्य आहे असे आपण युक्तिवादाने दाखवून देऊ पाहतो, त्याला त्या युक्तिवादाचा निष्कर्ष म्हणतात.

" **आदिवासी कवितेची प्रकृती आणि प्रवृत्ती " ( कवी विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' कवितासंग्रहाच्या संदर्भात )** या अभ्यासविषयाच्या अनुषंगाने मागील चार प्रकरणांतून जो अभ्यास मांडला त्यानुसार या अभ्यासाचे पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविता येतात.

आदिवासी साहित्यामध्ये ' आगाजा ' कवितासंग्रहाचे स्थान महत्त्वाचे आहे. कारण या कवितासंग्रहातून आदिवासी जीवन, अज्ञानीपणा, आदिवासी महिलांवरील अत्याचार, भूकबळीचा प्रश्न, कुपोषण, अरण्याचा संरक्षणाचा प्रश्न इ. गोष्टींवर प्रकाश टाकला आहे.

१. आदिवासी जमातींपैकी काही जमाती विकसित आहेत असे म्हणता येईल.

२. ' आदिवासी ' या शब्दाच्या व्याख्येविषयी विचारवंताचे एकमत नसल्याचे जाणवते.

३. डॉ. रिव्हर्स यांनी केलेल्या आदिवासींच्या व्याख्येत भारतीय समाज व्यवस्थेतील " विविधतेतील एकता " हे मूल्य आहे.

४. मदन व मुजुमदार यांनी आदिवासींची केलेली व्याख्या दिशाहीन व वरवरची आहे, कारण आदिवासींच्या बोलीभाषा समान नाहीत.

५. रोमन लोकांच्या मते, जमात या शब्दाचा अर्थ अनेक जिल्हे मिळून जमलेला एक वर्ग होय.

६. सर्वच आदिवासी जंगलवासी असतात असा गैरसमज समाजामध्ये आढळतो.

७. आदिवासी समाजातील प्रत्येक जमातींच्या सामाजिक जीवनामध्ये वेगळेपणा आढळतो.



Scanned with CamScanner

८. आदिवासी समाज आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहणारा आहे.

९. आदिवासी समाजातील वेगवेगळ्या बोलींमुळे त्यांचा शैक्षणिक विकास जास्त प्रमाणात होत नाही.

१०. आदिवासी समाज जीवनातील समस्यांमुळे आदिवासी समाजाचा आवश्यक तेवढा विकास

झाला नसल्याचे वाचनातून समजते.

११. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, इंटरनेटचा वापर आदिवासी समाजामध्ये अत्यंत कमी प्रमाणात आहे.

१२. आदिवासी समाजातील प्रत्येक जमातींची भाषा, सणोत्सव, नृत्य, पोशाख, विवाह पध्दती वेगवेगळ्या आहेत.

१३. गोंड जमातीमध्ये सुखदु:खाच्या प्रसंगी मोहाच्या दारूला विशेष महत्त्व आहे.

१४. आदिवासींचे सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यापूर्ण असून त्यांचे नृत्य, संगीत, वाद्ये याबाबत विविधता आढळते.

१५. प्रत्येक लोकसमूहाला स्वत:ची ओळख असते. सामाजिक, सांस्कृतिक, रूढी, प्रथा, परंपरा यांच्या वेगळेपणातून स्वतंत्र संस्कृती उदयास आलेली असते. आदिवासी संस्कृतीलाही अशी स्वत:ची ओळख आहे. आदिवासी समूहांतल्या प्रत्येक जमातीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची ओळख स्वतंत्र वाटत असली तरी त्यांच्यात अनेक बाबतीत सारखेपणा दिसून येतो.

१६. आदिवासी जीवन अभ्यासाला बोलीभाषेमुळे मर्यादा निर्माण होते.

१७. आदिवासी समाजामध्ये अंधश्रध्दा आढळून येते.

१८. डॉ. गोखले यांच्या आदिवासी साहित्यविषयक व्याख्येतून असे लक्षात येते की दलित व आदिवासी साहित्य स्वतंत्र आहे.

१९. डॉ. विनायक तुमराम यांच्या आदिवासी साहित्यविषयक व्याख्येतून असे लक्षात येते की, आदिवासी साहित्य व वनसंस्कृतीचा जवळचा संबंध आहे.

२०. आदिवासी साहित्यामध्ये वनसंस्कृतीला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे.



Scanned with CamScanner

२१. आदिवासी साहित्य इतर साहित्याच्या तुलनेत प्राचीन आहे. परंतु दुर्लक्षित स्वरूपाची आहे.

२२. आदिमांच्या वेदना व्यक्त करण्याचे काम आदिवासी साहित्याने केले आहे.

२३. दलित आणि आदिवासी साहित्य प्रवाहांमध्ये मित्रत्वाचे नाते आहे.

२४. आदिवासींच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणांचा विचार करताना मात्र काही गोष्टी प्रकर्षाने पुढे येतात. आदिवासींची व्यवस्थेकडून झालेली फसवणूक, जीवनातील अठराविश्वे दारिद्र्य, दु:ख, अवहेलना व जीवनाच्या सर्व स्तरांवर होत असलेली उपेक्षा यामधून आपले अस्तित्व जगापुढे मांडण्यासाठी सृजनशील मनाचा आविष्कार साहित्यरूपात घडून आला असे आदिवासी लेखकांच्या लेखनाचे स्वरूप अभ्यासले की लक्षात येते.

२५. आदिवासी कवितेने आदिम विश्वाची दखल घेतली गेली आहे.

२६. आदिवासी कवींच्या कवितेतून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचे दर्शन घडते तसेच या जीवनाचा विचार आदिवासींसाठी प्रेरणादायी म्हणूनही येतो.

२७. आदिवासी कविता आपल्या अंतरंगातून निसर्गाला सचेतन करते.

२८. नकार, विद्रोह आणि उलगुलान ही आदिवासी कवितेची आशयसूत्रे ठरतात.

२९. आदिवासी कवितेची भाषा, वाङ्मयीन सौदर्य मराठी कवितेत वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

३०. आदिवासी स्त्री चे दु:ख व्यक्त होण्याचे एक प्रभावी साधन कविता आहे.

३१. आदिवासी कवितेने आदिवासी जीवनाचा अधिक जीवनपट व्यापला आहे.

३२. आदिवासी कवितेचे आधारस्तंभ निसर्ग आहे.

३३. कवी भुजंग मेश्राम चिकित्सक पध्दतीने आदिवासी जाणिवेचा विचार करताना दिसतात.

३४. ' आगाजा ' कवितासंग्रहामध्ये कल्पनाविश्वाला अधिक महत्त्व न देता वास्तवाला अधिक जवळ केले आहे.

३५. ' आगाजा ' कवितासंग्रहातील कविता निसर्ग, आदिम प्रतिमा, म्हणी, बोलीभाषेतील शब्द, ऐतिहासिक, पौराणिक संदर्भ इत्यादी भाषिक वैभवातून हया कविता व्यक्त होतात.

३६. या कवितांची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे.

३७. ' अरण्य ' या कवितेतून जंगलाचा संरक्षणाचा प्रश्न मांडण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

३८. ' होमलॅंड ' या कवितेमधून स्त्री संरक्षणाचा ज्वलंत प्रश्न मांडण्यात आला आहे.

३९. ' निसटती ' या कवितेमधून आदिवासी समाजावर होणारा अत्याचार मांडण्यात आला आहे.

४०. ' रस्ता संपता संपत नाहीए ' या कवितेतून समाज व्यवस्थेचे चित्रण करण्यात आले आहे. व्यवस्थेविषयी सावध राहण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

४१. ' पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट ...' या कवितेमधून लिंगोचा इतिहास मांडण्यात आला आहे.

४२. ' मोटिफ : एक होता राजा ' या कवितेमधून आदिवासी समाजात असणारी अंधश्रध्दा लक्षात येते.

४३. ' आभासी ' कवितेमधून पारंपरिक रचना प्रकार आला आहे.

४४. ' सूरपनखेचा हेरंवेस व्हॉट्सअप रिप्लाय ' या कवितेमध्ये पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची होणारी अवेहलना मांडण्यात आली आहे.

४५. आदिवासी लोकांच्या भोळेपणाचा फायदा कसा घेतला जातो हे ' झेल ' या कवितेमधून लक्षात येते.

४६. ' माडया ' कवितेमधून भ्रष्ट अधिकाऱ्याकडून आदिवासी लोकांवर होणारा अन्याय-अत्याचार मांडण्यात आला आहे.

४७. आदिवासी समाजामध्ये मोहाच्या दारूला महत्त्व दिले जाते हे ' ढोल्या ' कवितेतून लक्षात येते.

४८. ' मुखवटा ' या कवितेमध्ये शहरात राहत असून जंगलाविषयी असणारी ओढ कशी असते हे मांडण्यात आले.

४९. ' पाडा 'मधून पाड्यावरील आदिवासी समाजाचे जीवन मांडण्यात आले.

५०. ' सखीच्या कविता ' या कवितेमधून चळवळीचे महत्त्व व्यक्त केले आहे.

५१. ' पाच ' या कवितेतून स्त्रियांची व्यथा मांडण्यात आली आहे. तसेच स्त्री वेदनेची जाणीव होते.

५२. ' कविता ' या कवितेमधून कवीचे कवितेवरील प्रेम व्यक्त होते.

५३. ' फेसबुक ' या कवितेमधून ' कुपोषणाचा प्रश्न ' समोर येतो.



Scanned with CamScanner

५४. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात लोकशाहीचा पुरस्कार केलेल्या भारताने आजपर्यंतच्या सामाजिक, राजकीय प्रवासात काय कमावले आणि काय गमावले यांचा हिशोब ' शतकोत्सव ' या कवितेतून मांडण्यात आला.

५५. ' लढा ' या कवितेमधून भूकबळीचा प्रश्न व जनावरांच्या संरक्षणाचा प्रश्न मांडण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

# संदर्भ ग्रंथसूची



Scanned with CamScanner

# संदर्भ ग्रंथसूची


- कुमरे विनोद, आगाजा, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती - २०१४.
- कुमरे विनोद, आधुनिक कालखंडातील आदिवासी मराठी साहित्याचा अभ्यास, अप्रकाशित प्रबंधिका.
- गारे गोविंद, आदिवासींचे प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन,औरंगाबाद प्रथमावृत्ती-१९९४.
- चव्हाण ज्योती, प्रकाशित आदिवासी साहित्याचा विवेचक अभ्यास, अप्रकाशित प्रबंध.
- जाधव सुधाकर, भारतातील आदिवासी समाज, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २०१२.
- तुमराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती - २०१२.
- तुमराम विनायक, आदिवासी साहित्य:उद्गम आणि व्याप्ती, हरिवंश प्रकाशन,चंद्रपूर,प्रथमावृत्ती-१९९९.
- नरवणे विश्वनाथ ,कहावतों की दुनिया में, विश्वगंगा प्रकाशन,पुणे,१९९९.
- पाटील शरद , अब्राह्मणी साहित्याचे सौदर्यशास्त्र.
- बोथीकर सुधाकर, आदिवासी कविता रूप आणि बंध, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमआवृत्ती - २०१३.
- भवरे महेंद्र ,मराठी कवितेच्या नव्या दिशा,लोकवाङ्मयगृह प्रकाशन,मूंबई प्रथमावृत्ती-२००७.
- भवाळकर तारा ,मायवाटेचा मागोवा, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर प्रथमावृत्ती,१९८९.
- भागवत दुर्गा ,लोकसाहित्याची रूपरेखा,वरद बुक्स प्रकाशन, व्दितीय आवृत्ती,१९७७.
- मुनघाटे प्रमोद,आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या,प्रतिमा प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती-२००७.
- मून संजय,शैली:दलित कवितेची,गोदा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती-२००९
- रसाळ सुधीर,कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशनगृह,मुंबई, प्रथमावृत्ती-१९८२.




Scanned with CamScanner

- रोंगटे तुकाराम ,आदिवासी कवितेचा उष:काल आणि सद्यस्थिती, संस्कृती प्रकाशन, पुणे,प्रथमावृत्ती-२००७.
- वाघ विठ्ठल , व-हाडी म्हणी लोकधर्म, लोकवाङ्मयगृह प्रकाशन.
- वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमआवृत्ती - २००९.
- व्यवहारे शरद, लोकसाहित्य संकलन व स्वरूप, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद,प्रथमावृत्ती जानेवारी १९९९.




Scanned with CamScanner